# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दि. १६/०४/२००७

आज दि. १६/०४/२००७ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०१ दि. ०४/०४/२००७ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. निर्मला बाबुराव सावळे | महापौर |
| २) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | उपमहापौर |
| ३) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सभागृह नेता |
| ४) | श्रीम. संगिता विजय म्हात्रे | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ५) | श्री. चिंतामण कमलाकर पाटील | सभापती, गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती |
| ६) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ७) | श्री. अनंत रामचंद्र पाटील | सदस्य |
| ८) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| ९) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| १०) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| ११) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| १२) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १३) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| १४) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| १५) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| १६) | श्री. रोहिदास शंकर पाटील | गटनेता |
| १७) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| १८) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| १९) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| २०) | श्री. पांडे हंसु कमलकुमार | गटनेता |
| २१) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| २२) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| २३) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| २४) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| २५) | श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर ऊर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| २६) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| २७) | श्री. गावंड आत्माराम बाळाराम | सदस्य |
| २८) | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| २९) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ३०) | श्रीम. जयाबाई यशवंत भोईर | सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ३१) | श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव | सदस्य |
| ३२) | श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड | सदस्या |
| ३३) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ३४) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| ३५) | श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन | अध्यक्षा, प्रभाग समिती क्र. ०४ |
| ३६) | श्रीम. उमा विश्वनाथ सपार | सदस्या |
| ३७) | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| ३८) | श्री. रोहिदास आत्माराम पाटील | सभापती, आरोग्य परिरक्षण समिती |
| ३९) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ४०) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४१) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०१ |
| ४२) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| ४३) | श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन | सदस्य |
| ४४) | श्री. शशिकांत रतिलाल शहा | सदस्य |
| ४५) | श्रीम. शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ४६) | श्रीम. चौहाण महेंद्रसिंग | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०२ |
| ४७) | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ४८) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ४९) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ५०) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ५१) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ५२) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ५३) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | गटनेता |
| ५४) | श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर | सदस्या |
| ५५) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ५६) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ५७) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ५८) | श्री. तुळशिदास दत्तु म्हात्रे | सदस्य |
| ५९) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ६०) | श्रीम. शाह रक्षा एस. | सदस्या |
| ६१) | श्री. ठाकूर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य (सभापती, शिक्षण मंडळ) |
| ६२) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| ६३) | श्री. पांगे संजय नारायण | नामनिर्देशित सदस्य |
| ६४) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |
| ६५) | श्री. टेरी पॉल परेरा | नामनिर्देशित सदस्य |

**गैरहजर सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मेन्डोसा स्टिवन जॉन | सभापती, स्थायी समिती |
| २) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| ३) | श्रीम. गोहिल शानु | सदस्या |
| ४) | श्री. सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| ५) | श्री. नलावडे दिनेश दगडू | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०३ |
| ६) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| ७) | श्री. रविंद्र भीमदेव माळी | गटनेता |
| ८) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ९) | श्री. आसिफ गुलाम पटेल | सदस्य |
| १०) | श्रीम. ऊर्मिला कोमल भामरे | सदस्या |
| ११) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |
| १२) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| १३) | श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ | सदस्य |
| १४) | श्री. पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| १५) | श्री. जैन रमेश धरमचंद | सदस्य |

**रजेचा अर्ज दिलेले सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. पाटील परशुराम दामोदर | विरोधी पक्षनेता |
| २) | श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी | सभापती, पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती |
| ३) | श्रीम. मेंडोंसा मायरा गिल्बर्ट | प्रथम महापौर |
| ४) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |

(राष्ट्रीयगीत वंदे मातरम् नंतर महासभेला सुरुवात झाली.)

**मा. महापौर :-**

नमस्कार, दि. १६ एप्रिल २००७ ची महासभा सुरु होत आहे. या सभागृहात उपस्थित असलेले या शहराचे मा. उपमहापौर श्री. चंद्रकांत वैतीसाहेब मंचावर उपस्थित असलेले या शहराचे मा. आयुक्त श्री. सुदामराव गायकवाडसाहेब, सभागृहनेते श्री. हॅरल बोर्जीस साहेब, सर्व प्रभाग समितीचे अध्यक्ष, सर्व विशेष समित्यांचे सभापती, सर्व पक्षाचे गटनेते, उपस्थित असलेले सर्व उपआयुक्त, सर्व पदाधिकारी, अधिकारी वर्ग, नगरसेवक-नगरसेविका, आजच्या महासभेमध्ये विषय पटलावरील अनेक महत्त्वाच्या विषयावर चर्चा करण्यासाठी व आपण शहराच्या विकासासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी ही आजची सभा बोलावण्यात आलेली आहे. विशेष करुन नालेसफाई पावसाळ्यापूर्वी होणे आवश्यक आहे या दृष्टीने आज हा विषय ठेवलेला आहे. विषयपटलावर इतरही विषय आहेत. आपण या विषयावर सर्वांनी चर्चा करुन, खेळीमेळीच्या वातावरणात भाग घेउन ही सभा पार पाडावी. विशेष करुन गेल्या महिन्यामध्ये कॉमन वेल्थ लोकल गर्व्हमेंट फॉर लंडन, यू.के या संस्थेने न्यूझीलंड येथे दौरा आयोजित केलेला होता. या दौऱ्यामध्ये दि. २२/०३/२००७ ते दि. २९/०३/२००७ या दौऱ्यासाठी देशातील विविध ठिकाणाहून येणाऱ्या महापौरांना, आमदारांना, मंत्री महोदयांना पाचारण करण्यांत आलेले होते. कॉमन वेल्थ गर्व्हमेंटमध्ये आपल्या देशाचेसुद्धा सदस्यत्व असल्यामुळे मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे मा. महापौरांना पाचारण करण्यांत आलेले होते. या कार्यक्रमाला आपल्या सर्वांच्या प्रतिनिधी म्हणून मी त्या ठिकाणी उपस्थित राहिलेली होती. कॉमन वेल्थ लोकल गव्हमेंट फोरम यांचे जे उद्दिष्ट आहे त्या उद्दिष्टानुसार त्यांनी आपल्या शहराचा विकास व शहराला विविध मार्गाने उत्पन्नाचे स्त्रोत कसे वाढवता येतील? अशा विविध विषयांवर चर्चासत्र आयोजित केलेले होते. दर दोन वर्षांनी जगांतील ही परिषद घेतली जाते. पूर्ण जगातून या परिषदेसाठी सदस्य उपस्थित राहतात. ही परिषद दर दोन वर्षानंतर ह्यावेळेस न्यूझीलंड येथे घेण्यात आलेली होती. तेथील पंतप्रधान श्री. मार्क ब्रेटन यांनी सर्व सदस्यांचे स्वागत करुन या परिषदेला सुरुवात केली. या परिषेदच्यावेळी श्री. मार्क ब्रेटन, व श्री. रॉबर्ट ब्रेटन, श्री. सॅम्युअल एव्हल, श्री. बेसीन मॉरिसन व डॉ. टेन्यूओ बोर्ज इत्यादी प्रमुख मंत्र्यांची तिथे उपस्थिती होती. त्यांनी त्या शहरातील भाषा 'माउल' भाषेमध्ये स्वागत करुन सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करुन स्वागत केले. नगरपरिषद ऑकलन शहर यांच्यावतीने कार्यक्रमाचे संचालन व स्वागत ऑकलन शहराचे मा. महापौर श्री. डी. बी. हार्बर, श्री. मार्क ब्रेटन यांनी उत्तमरित्या केले. तसेच, न्यूझीलंड देशाची लोकसंख्या जवळजवळ सव्वाशे करोड आहे. हा देश सुंदर व टेकडीवर वसलेला आहे. सतत बसणाऱ्या भूकंपाच्या धक्क्यामुळे येथील घरे म्हणजे विशेषतः बंगल्याच्या स्वरुपात असणारी घरे लाकडी स्वरूपाची आहेत. त्यांनी शहराच्या मध्यभागी उत्तम दर्जाच्या उंच आणि सुंदर इमारती उभ्या केलेल्या आहेत. शहराचे विशेष आकर्षण म्हणजे तेथील भूमिगत गटार योजना ही आहे. त्यांनी ही योजना सुंदररित्या राबवलेली आहे. तिथे देशातील प्रत्येक व्यक्तीला महत्व दिले गेलेले आहे. तिथे सुरक्षितता आणि ट्रॅफिकच्या बाबतीत अत्यंत तुरळक लोकसंख्या असल्यामुळे तिथे ट्रॅफिक किंवा सुरक्षिततेची कुठल्याही प्रकारची गैरसोय होत नाही. कुठलीही व्यक्ती किंवा पंतप्रधान रस्त्यावरून एकटा चालू शकतो. तिथे इथपर्यंत सुरक्षिततेची हमी दिली गेलेली आहे. प्रत्येक ठिकाणी, प्रत्येक शहरामध्ये, न्यूझीलंड देशामध्ये यंत्रणा चांगल्याप्रकारे राबवली गेलेली आहे. त्या त्या महानगरपालिकेचे बजेटही उत्तम आहे. बहूतेक भारतवासी या देशामध्ये लोकसंख्या कमी असल्यामुळे नोकरी मिळवण्यासाठी बऱ्याच प्रमाणात आढळून आलेले आहेत. मोठया प्रमाणात यांत्रिकीकरण होत असल्यामुळे प्रत्येक विषयासाठी आणि प्रत्येक प्रोजेक्टसाठी मनुष्यबळ कमी असल्यामुळे यंत्राचा वापर अधिकाधिक केला जातो. आम्ही तेथील घनकचरा प्रकल्पाला भेट दिली. तेव्हा तेथील घनकचरा प्रकल्प रासायनिक पद्धतीने त्याच्यावर प्रक्रिया करुन त्याची खतामध्ये निर्मिती केली जाते. तेथील शेती गवताची केली जाते. त्यांचा मुख्य व्यवसाय पशूपालन असल्यामुळे दूधापासून उत्पन्न तयार केले जातात. विशेष आकर्षण म्हणजे तिथे मोठया प्रमाणात पर्यटन व्यवसाय चालतो. त्या देशाचे मूळ उत्पादन पशुपालन असल्यामुळे पशुपालनामुळे जे दूध मिळते. त्या दूधापासून अनेक प्रकारचे प्रोडक्ट तयार करुन त्याच्यापासून मोठया प्रमाणावर त्या देशाचे उत्पादन वाढवता येते. हा देश एक बेट असून चारही बाजूंनी पाण्याने वेढलेला आहे. न्युझीलंड देशाची सौदर्यता, तेथील आकर्षण आणि तेथील विविध विकास कामे आपल्याला शब्दामध्ये टिपता येत नसलेतरी अतिशय, सुंदर, रमणीय आणि पूर्ण बाजूंनी विकास झालेला देश आहे. या देशाची लोकसंख्या कमी असल्यामुळे त्यांनी चांगल्याप्रकारे प्रगती साध्य केलेली आहे. त्या परिषदेमध्ये त्यांचा मुळ असा उद्देश होता की संपूर्ण जगातील ५३ देश जे सदस्य आहेत. आपण त्यांच्यापर्यंत विकास कामे पोहोचवणे, त्यांना विकासाचे स्त्रोत उपलब्ध करुन देणे आणि आताच्या ज्या भेडसावणाऱ्या समस्या आहेत की उत्पन्न कसे उभे करायचे? आणि लोकसंख्या या समस्या कशा सोडवल्या जातील? त्यांनी या गोष्टींवर अधिक भर दिलेली आहे. मी आपल्या माहितीसाठी हे महासभेमध्ये सादर केलेले आहे. आपण सर्वांनी आजच्या सभेमध्ये सर्व विषयांवर चर्चा करुन विषय पूर्ण करायचे आहेत. आपण सर्वांनी सहकार्य करायचे आहे तशी मी तुमच्याकडे अपेक्षा करते आणि माझे दोन शब्द संपवते. धन्यवाद. जय हिंद जय महाराष्ट्र.

(नगरसचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

सौ. हेलन जॉर्जी, सौ. मायरा मेंन्डोसा, सौ. भानू भगवान पाटील आणि श्री. परशुराम दामोदर पाटील यांचे आजच्या सभेसाठी चार रजेचे अर्ज आलेले आहेत. प्रश्नोत्तराचा विषय निरंक आहे.

**मा. उपमहापौर :-**

आपल्याकडे भारतीय जनता पार्टी यांनी विनंती केलेले पत्र आलेले आहे. दि. १६/०४/२००७ रोजीच्या महासभेमध्ये श्री. गजानन लक्ष्मण भोईर यांची 'भारतीय जनता पार्टी' गटनेता म्हणून मी घोषणा करित आहे.

**हॅरल बोर्जीस (सभागृहनेता) :-**

या सभागृहात आमचे परममित्र श्री. गजानन लक्ष्मण भोईर यांची भारतीय जनता पक्षाच्यावतीने गटनेते पदी मा. पिठासिन अधिकाऱ्यांनी निवड जाहिर केलेली आहे. मी सभागृहाच्यावतीने त्यांचे हार्दिक अभिनंदन करतो आणि त्यांना त्यांच्या सभागृह आणि सभागृहाच्या पुढील बाहेरच्या कार्यासाठी शुभेच्छा देतो. मा. आयुक्त साहेबांना माझी अशी विनंती आहे की सभेला सुरुवात करण्यापूर्वी मागील मा. महासभा दि. २० जून २००६ रोजी सभागृहात जो पदनिर्मितीच्या प्रस्ताव होता. त्या पदनिर्मितीच्या प्रस्तावाबाबत ठरावाच्या बाबतीत या सभागृहात अतिशय वादंग निर्माण झालेला होता. एकंदर सभागृहामध्ये अशी परिस्थिती निर्माण झालेली होती की सभागृहनेत्यांनी किंवा विरोधी पक्षनेत्यांनी कुठेतरी एखाद्या चुकीच्या ठरावावर सही केलेली होती. त्यावेळेच्या पिठासिन अधिकाऱ्यांनी त्यावेळेला अशाप्रकारचे चित्र क्रिएट केलेले होते. भारतीय सदस्य यांनी पक्षाच्यावतीने आणि श्री. मिलन म्हात्रे यांनी संबंधित पोलिस स्टेशनमध्ये तशाप्रकारच्या तक्रारी दाखल केलेल्या होत्या.

**मा. महापौर :-**

सन्मा. सभागृहनेते श्री. हॅरल बोर्जीस अनुपस्थित विषयाला सुरुवात केलेली नाही आणि आपल्याला बोलायला परमिशन दिलेली नाही. त्यामुळे तुम्ही खाली बसा. विषयपटलावर विषय सुरु झाल्यानंतर तुम्हाला बोलायला वेळ दिला जाईल.

**हॅरल बोर्जीस (सभागृहनेता) :-**

ही सभागृहातील अत्यंत महत्त्वाची बाब आहे. सभागृहातील चूक असेल तर सुधारली पाहिजे.

**आसिफ शेख :-**

सभागृहनेता हा सगळ्यांचा नेता असतो. या सदनाचा अपमान करु नका. सभागृह नेत्याचा अपमान होईल असे काहीही करु नका.

**प्रभात पाटील :-**

सभागृह नेता हा सभागृहनेता आहे.

**आसिफ शेख :-**

सभागृहनेता हा सभेचा सभागृहनेता असतो. तुम्ही सभागृहनेत्याला इथे बोलू शकत नाही.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही सभागृहनेत्याला बसवू शकत नाही.

**हॅरल बोर्जीस (सभागृहनेता) :-**

जे सत्य या सभागृहात घडलेले होते. या सभागृहाला ते सत्य सांगणे आवश्यक आहे.

**मा. महापौर :-**

या सभागृहात विषय चालू केल्यावर तुम्हाला वेळ दिली जाईल. परंतु, तुम्ही आता खाली बसा.

**आसिफ शेख :-**

आपण असे बसवू शकत नाही.

**मोहन पाटील :-**

मा. महापौरांची परिस्थिती बिघडलेली आहे असे मला वाटते.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

इस हाउसको जानकारी देनी जरुरी है।

**हॅरल बोर्जीस (सभागृहनेता) :-**

तुम्ही सदर ठरावाशी संबंधित होतात. त्याचप्रमाणे ती आणि विरोधी पक्षनेते अशी तीन माणसे या ठरावाशी संबंधित होते. सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे आणि सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी तक्रार दाखल केलेली आहे. तसेच, या शहराचे मा. आमदार श्री. मुझफ्फर हुसेन साहेब यांनी हा प्रश्न विधानपरिषदेमध्ये उपस्थित केलेला होता. शिवाय, आजसुद्धा हे प्रकरण हस्ताक्षर तज्ञांकडे प्रलंबित आहे. आपण ज्यावेळेला पिठासिन अधिकाऱ्यांनी सह्या न देता स्पष्टपणे हे प्रकरण नाकारलेले होते. तुम्ही त्याही पलिकडे जाउन हे प्रकरण हस्ताक्षर तज्ञांकडे पाठवलेले आहे.

**मा. महापौर :-**

सचिवसाहेब, आपण विषयाला सुरुवात केलेली आहे ना.

**आसिफ शेख :-**

तुम्ही असे करु शकत नाही. तुम्ही सभागृहनेत्यांना बोलण्याची संधी द्या.

**मा. महापौर :-**

तुम्हाला बोलण्याची परमिशन दिलेली नाही.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. उपमहापौर महोदय, यह स्थिती पुरे हाउसमे बनाये जाये ऐसे हम लोग चाहते है। आप जैसे आपकाही मनोधैर्य खो चुकी है।

**मा. महापौर :-**

मगर हम लोगोंने आपको बोलनेकी परमिशन नही दी है।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

हमारे पास महापौर है तो कुछ प्रॉब्लेम नही है। मगर हमारे प्रॉब्लेम सॉल्व्ह करने के लिये उपमहापौर है। मा. महापौर मॅडम, आपको यहाँपर बैठने का अधिकार नही है। हम लोगोंको यह सुचना इस हाउसको देनी है।

**मा. महापौर :-**

आपको सभागृहने बोलनेकी परमिशन नही दी है।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मुझे आपके परमिशनकी जरुरत नही है। आपने हमारी नगरपालिकाके उपर अविश्वास दिखाया है।

**आसिफ शेख :-**

मा. महापौर मॅडम तुम्ही आधी ठरावावर सही केलेली होती. तुम्ही नंतरही सही माझी नाही असे बोललात आणि आताही सही माझी आहे असे बोलता हे योग्य नाही म्हणजे यांना भावनेची कदर नाही.

**रोहिदास पाटील :-**

याठिकाणी कदर नसली तर गोषवारा निश्चितच आलेला होता.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

आपने अधिकारीयोंको और सभागृहनेताको झुठा साबीत किया है। आपने विरोधी पक्षनेता और श्री. रोहिदास पाटीलजी को भी झुठा साबीत किया है। ऐसेमें आपको यहाँपर बैठनेका अधिकार नही है। इसलिए हमारी यहाँ माँग है की आप डायसपर नही बैठेंगे। आपने यह पदनिर्मिती की सिस्टिम आरक्षण के बिना हाउसके देते हूए आपने इललिगल किया है।

**रोहिदास पाटील :-**

त्यांचे मत असे आहे की ही सिस्टिम आहे. परंतु, त्यांनी सभागृहात असे काही बोलू नये असे आमचे मत आहे. जरी तो पक्षांतर्गत विषय असला तरी आम्ही त्यावेळेला या सभागृहात उपस्थित होतो. म्हणून आम्ही तुम्हाला सांगतो की तुम्ही नियमबाह्य बोलता हे योग्य नाही हे ऐकू शकत नाही.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

हमारा यह निवेदन है की आप लोग पिठासिन अधिकारी बदलकर उस महापौर को सभा चलाने का अधिकार दिया जाए।

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही पिठासिन अधिकाऱ्यांना सांगायला पाहिजे.

**हॅरल बोर्जीस (सभागृहनेता) :-**

श्री. रोहिदास पाटील, तुम्ही पिठासिन अधिकाऱ्यांना अशाप्रकारे पाठीशी घालणे योग्य नाही. मा. पिठासिन अधिकाऱ्यांच्या विरोधात संबंधित पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल केलेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

श्री. हॅरल बोर्जीस साहेब, तुम्ही सभागृहनेते आहात. आम्ही तुमचा मान ठेवतो. मा. महापौरांचा मान ठेवतो आणि तुम्ही सभा चालते असे सांगता. परंतु, ही सही खोटी असे तुमचे म्हणणे योग्य नाही.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही सभा चालवण्यासाठी असमर्थ आहात. त्यामुळे तुम्ही तुमच्या पदाचा त्याग करुन तुमच्या ठिकाणी जावे. असे आमचे मत आहे. तुम्ही एकदा सांगितले की ही माझी सही नाही आणि पुन्हा ही सही माझी आहे असे सांगता.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

यह विषय इम्पॉर्टन्ट है। आप मा. उपमहापौर साहबको आपके साथ आगे बैठने की सुचना दिजिये। और आप हमारे साथ आकर बैठिये। फिर हम लोगोंको कोईभी प्रॉब्लेम नही है। आप आपका पुरा अधिकार मा. उपमहापौर साहबजी को दिजिये। आपने आपके पुरे कर्मचारीयोंके उपर अविश्वास किया है। आपने सचिव के प्रती अविश्वास किया है। आपको जो बोला है आप वही किजिये।

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चौहाण, आप नीचे बैठिये। आपको आपका सजेशन बताने के लिये समय दिया जायेगा तब आप बोलिये।

**आसिफ शेख :-**

मा. आयुक्तसाहेब, आजची सभा मा. उपमहापौर साहेबांनी चालवावी.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मुझे समयकी जरुरत नही है। हम लोगोकी यह राय आपसे माँगने की जरुरत नही है। आप हमारे साथ आकर बैठिये। हम लोग आपका स्वागत करते है। यह बात शहरके लिये इम्पॉर्टन्ट है।

**मा. महापौर :-**

आता हा विषय विषयपटलावर घेतलेला नाही. ह्या विषयावर महासभेमध्ये चर्चा झाल्यानंतर मा. आयुक्तांनी संबंधित विषयावर तोडगा काढण्यासाठी समिती गठित करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

**हॅरल बोर्जीस (सभागृहनेता) :-**

मा. महापौर मॅडम, या सभागृहात सहीच्या विषयावर चर्चा झाल्यानंतर तुम्ही याच सभागृहात ही सही माझी नाही असे सांगून नाकारत होते. परंतु, हा या सभागृहाचा विषय नाही.

**मा. महापौर :-**

या विषयासाठी समिती स्थापन केल्यानंतर कमिटीने तो निर्णय घ्यायचा आहे.

**फॅरो ग्रिटा :-**

हे पूर्णपणे खोटे आहे. कमिटीने निर्णय फेटाळलेला आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

तुम्ही या सभागृहामध्ये वक्तव्य केलेले होते. तसेच, तुम्ही प्रशासनाला पत्रसुद्धा दिलेले होते.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. महापौर मॅडम, आपको हटाया गया है। और यह पार्टीका निर्णय है। इसलिये आप हमारे साथ आईये। आप नगरसेवकको खुर्चीपर आकर बैठिये। आपकी अधिकारीयोंके साथ कितनी बार डायरेक्शन हो चुकी है। आपने अधिकारीयों को बार नीचे दिखाया और फिरसे उपर दिखाया यह कौनसा तरिका है? फिर भी अधिकारी हम लोगोंका नही सुनते है।

**हॅरल बोर्जीस (सभागृह नेता) :-**

मा. महापौर मॅडम, आपको हटाया गया है, और यह पार्टीका निर्णय है। इसलिये आप हमारे साथ आईये। आप नगरसेवककी खुर्चीपर आकर बैठिये। आपकी अधिकारीयोंके साथ कितनी बार डायरेक्शन हो चुकी है। आपने अधिकारीयों की एक बार नीचे दिखाया और फिरसे उपर दिखाया यह कौनसा तरिका है? फिरभी अधिकारी हम लोगों का नही सुनते है।

**हॅरल बोर्जीस (सभागृह नेता) :-**

मा. महापौर मॅडम, मी दि. २० जूनच्या सहीच्या प्रकरणावर या सभागृहामध्ये वक्तव्य करित असताना एकही शब्द चुकीचा बोललो नव्हतो.

**मा. महापौर :-**

मा. सभागृहनेता, तुम्हाला बोलायला नंतर वेळ दिला जाईल.

**हॅरल बोर्जीस (सभागृह नेता) :-**

मी या सभागृहामध्ये सहीच्या विषयावर एकही शब्द चुकीचा बोललो नाही.

महेंद्रसिंग चौहाण :-

आपको आजकी सभा चलाने का अधिकार नही है।

**मा. महापौर मॅडम :-**

तुम्ही खाली बसून घ्या. तुम्हाला बोलायचा अधिकार नाही.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही सभा चालवण्यासाठी असमर्थ आहात. तुम्ही आता सभा न चालवणे हिताचे आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. महापौर मॅडम, आप हमारे साथ आकर बैठिये और मा. उपमहापौरजीको सभा चलाने का अधिकार दिजिये। अगर आपके शहरके विकासकी चिंता है तो आप निचे आईये।

**हॅरल बोर्जीस (सभागृहनेता ) :-**

हा एवढा संवेदनशील विषय होता की ज्यावेळेला मा. महापौरांनी प्रशासनाला पत्र दिले. त्यावेळेला मा. सभागृहात माझी सही नाही असे सांगितलेले होते.

**मा. महापौर :-**

या सभागृहात विषयाला सुरुवात झालेली नाही. त्यामुळे सभेला सुरुवात झालेली नाही.

**हॅरल बोर्जीस (सभागृह नेता) :-**

या सभागृहाला वेळ वाया गेलेला आहे आणि या सभागृहाची दिशाभूल करण्यांत आलेली आहे.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही या ठिकाणी सर्वांचा अपमान केलेला आहे. तुम्हाला या ठिकाणी बसण्याचा नैतिक अधिकार नाही.

**मा. महापौर :-**

सर्व सन्मा. सदस्यांनी बसून घ्यावे. एकदा विषयाला सुरुवात झाल्यानंतर प्रत्येकाला बोलण्याची वेळ दिली जाईल.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

जबतक आप नगरसेवकोंकी खुर्सीपर आकर नही बैठेगी तबतक हम लोग नही बैठेंगे। हम लोग बहिष्कार करेंगे। आप नगरसेवककी सीटपर आकर बैठिये। आप आपका अधिकार मा. उपमहापौरजी को अधिकार दिजिये ऐसे हम सब लोगोंका मत है।

**मा. महापौर :-**

तुम्ही हे ठरवणारे कोण? तुम्हाला हे ठरवण्याचा ह्या सभेमध्ये अधिकार आहे का?

**आसिफ शेख :-**

मा. महापौर मॅडम, तुम्हाला सभा चालवण्याचा नैतिक अधिकार नाही.

**मा. महापौर :-**

तुम्ही या सभागृहात गोंधळ करण्यासाठी आलेले आहात का? एकाएकाने बोला बाकीच्यांनी बसून घ्या.

**आसिफ शेख :-**

आपण या संपूर्ण सभागृहाची फसवणूक केलेली आहे. दिशाभूल केलेली आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

आपने पुरे शहर की दिशाभूल की है।

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, आपण जर सभागृहामध्ये बोलला असाल की ही माझी सही नाही व आपण लिखित महाराष्ट्र सरकारकडे लिहून दिले असेल की, ही माझी सही आहे ते खरं आहे की, खोटं ते तरी आपण आम्हांला सांगा. काहीतरी क्लिअर करा.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

खतगांवकर साहेब, के पास बोला की, यह आपकी सही है।

**आसिफ शेख :-**

आयुक्त साहेब, आपण यावर खुलासा करा.

**हॅरल बोर्जीस :-**

संबंधित प्रश्न प्रशासनाशी संबंधित आहे. त्याकरिता आयुक्तांनी खुलासा करावा. ह्याच सभागृहामध्ये मा. महापौरांनी सही नाकारली होती.

**आसिफ शेख :-**

आयुक्त साहेब, आपण या संदर्भात खुलासा करावा.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. आयुक्त साहेब, कही ठराव ऐसे है, बगीचे खेल के मैदान का भी दोन वेगवेगळे ठराव पर स्वाक्षरी केलेली आहे ही सुद्धा बाब अतिशय गंभीर है। इसतरह के ठराव इन्होंने हाउस को विश्वास मे ना लेकर ऐसा कार्य किया है।

**जेन्वी अल्मेडा :-**

ह्या सभागृहाची दिशाभूल करत आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

तिसरा, इन्होंने सभा मे खाली बसवलेल्या अधिकाऱ्यांना ह्यांनी पुन्हा स्टेजवर बसवले. वह एक तरह की इन्सल्ट थी। निचे बिठाने मे इनका कौनसा मतलब था और दुबारा उपर बिठानेका क्या मतलब? यह कही बार हाउस को विश्वास मे ना लेते हूए ऐसा कार्य किया है। इसलिए आपको वहा पर हमारी पार्टी से आप चुनकर आए है। राष्ट्रवादी कॉग्रेस से चुनीए। आप आईए, नगरसेवक के पद पर बैठिए और उपमहापौर को अधिकार दिजिए।

**आसिफ शेख :-**

आजची सभा मा. उपमहापौर साहेबांनी चालवावी. आयुक्त साहेब, याबाबत आपण खुलासा करा की मागे जे सही प्रकरण झाले व सन्मा. पिठासिन अधिकाऱ्यांनी शासनाला कळविले की, ही सही माझी होती आणि सभागृहात सांगितले की, सही माझी नव्हती त्यांनी संपूर्ण सभागृहाची दिशाभूल केलेली, जनतेची दिशाभूल केली व शासनाची दिशाभूल केली आहे. ह्यांना नैतिक अधिकार नाही याठिकाणी बसण्याचा.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

आपने खुद सचिवालय मे जवाब भेजा है की, यह मॅडम का सिग्नेचर है। यह छह महिने के बाद क्यो? छह महिने के बाद क्या बात हो गयी है। क्या कोई खास बात हो गयी थी। इतने अधिकारीयो का जो प्रमोशन हूआ वह मॅडम, से क्यो हूआ? क्या तकलिफ थी उस समय सिग्नेचर करनके लिए। कृपया इसका स्पष्ट उत्तर दिजीए।

**हॅरल बोर्जीस :-**

मा. आयुक्त साहेब, कृपया आपण सभागृहामध्ये निवेदन करावे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

यह आपका सिग्नेचर है। अधिकारीयो पर अविश्वास मत करिए। आपका हाउस लिडर है। आपका विरोधी पक्षनेता इन लोगोंने ठराव किया। बोला नही यह मेरा सिग्नेचर नही है। यह शब्दो मे इन्होंने बोला और छह मे के बाद उठकर बिना किसी हाउस को, विश्वास मे लेकर बोल दिया की, यह हो गया। इसका मतलब क्या हूआ क्या अधिकारीयो से बातचीत हो गई थी क्या?

**आसिफ शेख :-**

आयुक्त साहेब, आपण खुलासा करावा।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

ऐसा तीन बार हो चुका है। आप इन तिनों का जवाब दिजिए। पार्टीने आपको निश्वासित किया है। आप कम से कम निचे आकर हमारे नगरसेवकोके साथ बैठिए। आज उपमहापौर जी को सभा चलानेका अधिकार दिजीए। आयुक्त साहेब, आप खतगांवकर साहब से पुछिए की, हमने तिसरे दिन मॅडम को क्या बोला? आपकी स्वाक्षरी है, आप इसे मानिए लेकिन नही, उन्होंने कहा की, यह मेरी स्वाक्षरी नही है।

**हॅरल बोर्जीस :-**

कमिश्नर साहेब, पदनिर्मितीच्या ठरावाच्या व्यतिरिक्त खेळाचे आणि बगीचांचे आरक्षण खाजगीकरणातून विकसित करायची होती. त्या ठरावावर देखिल सन्मा. पिठासिन अधिकाऱ्यांच्या दोनदा सह्या झालेल्या आहेत. अशाप्रकारे जर कामकाज होत असेल तर आम्हाला आपल्याकडून ह्या सभागृहामध्ये निवेदन पाहिजे की, सहीच्या प्रकरणावर मा. महापौरांनी सभागृहाची दिशाभूल केलेली आहे, जनतेची दिशाभूल केलेली आहे. शासनाला आणि तुम्हाला त्यांनी पत्र दिलेले आहे. नियमाप्रमाणे पिठासिन अधिकाऱ्यावर प्रशासनामार्फत आपण काय कार्यवाही करणार? हे कृपया सभागृहामध्ये सांगावे.

**आसिफ शेख :-**

साहेब, आपण प्रशानाच्यावतीने याठिकाणी खुलासा करावा.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

पुरे हाउस का अपमान किया गया है। यह दो सब्जेक्ट जो आरक्षण के किए उसमे बिना किसीको बताए हूए...

**रोहिदास पाटील :-**

सभागृह नेते ज्या पद्धतीने बोलता, त्यांच्या अमुक भावनेशी आम्ही सहमत असू शकतो पण ते अर्धवट माहितीबद्दल बोलत असतील तर आम्ही त्यांच्याशी सहमत होउ शकत नाही.

**आसिफ शेख :-**

आम्ही फक्त दोन प्रश्न विचारले आहेत. त्यावर सन्मा. आयुक्त साहेबांनी खुलासा करावा की, सभागृहात मा. महापौरांनी सांगितले होते की, ही सही माझी नाही. नंतर शासनाला पत्र पाठवून सांगितले की, ही सही माझी आहे. ह्या संदर्भामध्ये आपण सभागृहाला आणखी काही सांगा.

**रोहिदास पाटील :-**

कारण ह्याच गोष्टीचे तुम्ही आतापर्यंत समर्थन करत होते.

**हॅरल बोर्जीस :-**

ज्यावेळेला पिठासिन अधिकाऱ्यांनी प्रशासनाला पत्र दिले त्यावेळेला सर्व सभागृहाने हा प्रश्न विचारलेला आहे. तोपर्यंत हा विषय प्रलंबित होता. आम्ही कुठे ही पिठासिन अधिकाऱ्यांना पाठीशी घातलेले नाही. पाठीशी तुम्ही घालत आहात.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही तुमच्या प्रश्नाशी सहमत नाही. तुम्ही फसलात म्हणून आम्हाला फसवू नका.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

नगरी नगरी ढुंढे रे सावरीया। कल जाकर मॅडम, इन्ही के पास बैठी थी और आज यह इन्ही के भाषा मे बोल रहे है।

(सभागृहात गोंधळ)

**हॅरल बोर्जीस :-**

पिठासीन अधिकारी सभागृहाचा वेळ वाया चालला आहे आणि आमची सभागृहासमोर एकच मागणी आहे की, सदर विषय प्रशासनाशी संबंधित आहे. प्रशासनाने या विषयावर काय कार्यवाही करेल ते आम्हाला सन्मा. आयुक्त साहेबांकडून निवेदन पाहिजे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

साडे चार वर्ष तक मॅडम, आपके पास थी। हमने आपको कभी नही बोला। एक दिन हमारे पास बैठ गई तो आपको तकलिफ हो गई। आप अपनी लढाई लढो। हमारे को छेडनेकी कोशिश मत करो।

**आसिफ शेख :-**

हम यही कह रहे है की, आपके कथनी और करनी मे फरक कैसा हो गया?

**रोहिदास पाटील :-**

आपण जरी एक तास बोलले तरी मॅडम, खाली येउन बसणार नाही हे तुम्हाला नक्की माहित आहे. मग आपण परत परत तेच कशाला बोलता? तुम्हाला जे विचारायचे आहे तेच विचारा ना। मॅडमनला खाली उतरवण्याचा तुम्हाला अधिकार नाही.

**आसिफ शेख :-**

या संपूर्ण सभागृहाला सर्व अधिकार आहेत. त्यांनी गैरवर्तन केलेले आहे. त्याबद्दल प्रशासन खुलासा करेल ना.

**रोहिदास पाटील :-**

नियमात जे असेल व आम्हाला जे योग्य वाटेल त्याचे आम्ही समर्थन करु, नसेल तर आम्ही गप्प बसू. पण जे नियमात नाही तर उगाच कशाला बोलता?

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य आपण चुकीच्या ठिकाणी समर्थन करीत आहात.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, आज जो यह मुद्दा आपके सामने उपस्थित हुआ है, यह मुद्दा ना बीजेपी का है ना शिवसेना का है, ना कॉंग्रेस का है, ना राष्ट्रवादी का है। यह मुद्दा है सभागृह के प्रोटोकॉल का और जब पिठासीन अधिकारी कौनसे प्रोटोकाल को तोडती है, कोई भी एक्सवायझेड पिठासीन अधिकारी रहने दो। जब उस प्रोटोकल का, नियम का सभागृह का जो कायदा कानून होता है वह कायदा कानून के खिलाफ जाकर नगरसेवक होने दो या खुद पिठासीन अधिकारी होने दो या छोटासा अधिकारी रहने दो। सभागृह के शांतता की या सभागृह के अस्मिता का उल्लंघन करता है उसको अपनी नैतिकता समजके उसको इस चीज को आपने आप छोडना चाहिए। यह तालीयॉ बजानेका कोई मौका नही है, या ना किसीकी तारीफ करनेका मौका है। मौका यह है की, कोई एक पिठासीन अधिकारीने, विरोधी पक्षनेता उस मिटींगमे भी मैने बोला था की, महापौरका दो दो स्टेटमेंट आ रहा है। एक बार बोलती है की, मै बिमार थी तब मेरे पास सिग्नेचर करनेके लिए आए। दुसरी बार व्हायटींग लगाने का ऐसे दो मुद्दे उस वक्त उपस्थित हो रहे थे। उस वक्त सभागृह नेता और विरोधी पक्षनेता के उपर उँगली हो रही थी की, यह दोनो ने मिलकर कुछ कर्मकांड हुए। लेकिन उसके बाद मे यह मुद्दा चाहे किसीने भी पुलिस स्टेशन तक लिया। हर नगरसवेक, हर नागरीक को यह अधिकार है की, यह लोकशाही है की, अगर कोई ऐसा सामाजिक मुद्दा जो समाज को अलग तरीके से लेकर जा रहा है, यह तो सभागृह का मुद्दा है, यह मिरा भाईंदर के लोगोंने हमको चुनकर भेजा है। यहॉ का पिठासीन अधिकारी अगर कोई गलत काम करता है और गलत बात बोलती है की, यह सिग्नेचर मेरा नही है यह बहुत बडी गैरकानुनी बात है। और वही हस्ताक्षर उन्होने खुद किया है। बादमे उन्होने पुलिस स्टेशनमे कबुल भी किया की, यह हस्ताक्षर मेरे है और मेरेसे गलती हो गई है। इससे कोई शर्मजनक बात नही है। हमे यह सभागृह को बोलनेकी जरुरत नही है की, उनको पिठासीन के पदपर बैठनेका अधिकार है या नही। कायदे मे क्या तरतुद है? कायदा क्या बोलता है? लिगली वे क्या है? लेकिन जब हमे जनता यहा चुनकर भेजती है। सभागृहने चुनकर आपको वहा बिठाया तो वह आपकी नैतिक फर्ज बनता है की, सभागृह को कैसे चलाना लेकिन आप वह सभागृह चलाने मे नाकामयाब हो गयी है। और आपने जो हस्ताक्षर मैने नही किया है वह नादानीभरी बालीशभरी बात आपने सभागृह मे की वह आज सारी झुठी साबित हुई है। यह मुद्दा ना कोई मानवता का है ना लोकशाही का है, ना समाजका है। सभागृह के अस्मिता का मुद्दा है। इसकी नैतिक फर्ज समजके आपको पिठासीन अधिकारी का पद छोडकर निचे आकर बैठना चाहिए।

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे की, बऱ्याच वेळेपासून वादविवाद चाललेला आहे. या सभागृहामध्ये एका ठरावावर मा. पिठासीन अधिकाऱ्यांनी सांगितले की, ही सही माझी नाही आणि त्यानंतर बऱ्याचशा अशा दोन तीन मिटींग गटनेत्यांना बोलावून महापौरांच्या दालनामध्ये झाल्या. त्याला सर्व गटनेते उपस्थित होते. काही एक दोन नव्हते. पण त्यावेळेलासुध्दा आपण ती जबाबदारी स्वतः तोंडाने म्हटले नाही की, ही माझी सही आहे. त्यावेळेला आमच्यासमोर सांगण्याचा अधिकार नाही. तुम्हाला मी फक्त एवढेच सांगितले की, आपण सभागृहामध्ये सांगितले. तर आपण सभागृहामध्येच उत्तर द्या. ही माझी सही आहे. तुम्ही ह्या सभागृहाला खोटेपणा आणला आहे. तुम्ही बसलेल्या त्या त्या खुर्चीला अपमानित केले आहे. मिरा भाईंदर मधील सात लाख जनतेचा विश्वासघात आपण केलेला आहे. आपण त्या खुर्चीवर बसून त्या खुर्चीचे पावित्र्य नष्ट केले आहे. कारण आपण पिठासिन अधिकारी म्हणून तिथे होता. तिथे तुम्ही खोटी वाच्यता केलेली आहे आणि सर्वांनीच आणि सर्वांना तुम्ही या सभागृहातील नगरसेवकांना अपमानित केले आहे. आपण सरकारकडे आता लेखी दिलेले आहे आणि परत सांगता की, ही माझी सही आहे. आपण असे करुन काय मिळवले? या जनतेचा तुम्ही विश्वासघात केलेला आहे. तुमची नैतिक जबाबदारी आपण स्वतःने सांभाळा काय आहे ते आम्ही सांगायची गरज नाही. प्रशासन ठरवेल आपण त्या खुर्चीवर बसणार आहात की, नाही.

**आसिफ शेख :-**

आयुक्त साहेब, आपण याबाबत खुलासा करावा.

**बालाजी खतगांवकर साो. :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महासभा प्रकरण क्र. ४१ ठराव क्र. ३४ दि. २०/०६/०६ या ठरावाची अंतिम मंजूरी इतिवृत्तांत कायम करणे वेळेस मा. महासभेमध्ये हे प्रकरण आले त्यावेळेस मा. महापौरांनी सदर ठरावावरील सहीबाबत आक्षेप नोंदविला होता आणि सभागृहात खूप मोठया प्रमाणात चर्चा घडून आली होती. त्या अनुषंगाने सचिव, मिरा भाईंदर महानगरपालिका ह्यांनी सदर कामकाज विचारात घेउन मा. आयुक्त साहेबांकडे मा. महापौरांच्या सहीचा नमुना तज्ञ विभागाकडून तपासण्याचा प्रस्ताव सादर केला होता. मा. आयुक्तांच्या मंजूरीने सदरची सही तपासण्यासाठी अन्वेषण विभाग, हस्ताक्षर तज्ञ, पुणे यांच्याकडे हा प्रस्ताव सादर केला होता. दरम्यानच्या काळात महासभेच्या बैठका झाल्या, त्याही बैठकाबाबत याबाबतची चर्चा घडून याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा अशी रुलिंग दिली होती. त्या अनुषंगाने मा. आयुक्तांच्यावतीने गटनेत्यांची बैठक बोलावण्यात आली होती. सभागृह नेता तसेच विरोधी पक्षनेता यांचे या ठरावावर सुचक आणि अनुमोदक म्हणून स्वाक्षऱ्या त्यांच्या असल्याचे त्यांनी मा. महासभेमध्येही आणि संबंधित गटनेत्याच्या बैठकीत सभागृह नेता यांनी मान्य केलेले होते. त्यामध्ये प्रशासनाच्या अहवालातून मा. प्रधान सचिव नगरविकास, मंत्रालय यांना हा ठराव वस्तूस्थितीप्रमाणे झाल्याचे मा. प्रधान सचिव ह्यांना कळविण्यात आले होते. दरम्यानच्या काळामध्ये या प्रकरणामध्ये सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे ह्यांनी भाईंदर पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दिली होती त्या अनुषंगाने संबंधित लोकांचे जवाब सन्मा. पोलिस निरीक्षक ह्यांच्याकडून घेण्यात आलेले आहे. या कालावधीच्या दरम्यान मा. आयुक्तांनी, मा. महापौरांनी दि. १५/०३/०७ ला गटनेत्यांची बैठक आणि या कामकाजाच्या अनुषंगाने विविध महासभेमध्ये झालेल्या चर्चा ह्या विचारात घेउन त्यांचा हा जो आक्षेप होता तो त्यांनी निकाली काढलेला आहे आणि सदर अंमलबजावणी करण्याकरिता कोणतीही हरकत नाही व मी घेतलेले माझे आक्षेप मागे घेत आहे यात माझी कोणतीही शंका नाही असे लेखीपत्र आयुक्तांना दिल्यामुळे हा प्रश्न प्रशासनाच्या स्तरावर संपूष्टात आलेले आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

साहेब, आपण त्या पत्राचे सभागृहाचे वाचन करा.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

इससे पूर्व खतगांवकर साहब, आपने सामने जाकर मॅडम, को पुछा तो उन्होंने क्या बोला? मै, खतगांवकर साहब और सेक्रेटरी गए थे उस समय मॅडमने आपको क्या बोला?

**आसिफ शेख :-**

आपण ते पत्र वाचून दाखवा.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

साहब, इस पत्र के विरोध मे बोला था।

**बालाजी खतगांवकर :-**

प्रभाग समिती सभापती ह्यांनी याठिकाणी नमुद केल्याप्रमाणे मॅडमच्या समोर आम्ही वस्तूस्थिती मांडली होती की, सही आपली आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

साहेब, गेल्या सहा महिन्यापासून आपण पिठासिन अधिकाऱ्यांना वस्तूस्थिती त्यांच्यासमोर मांडत होता. सहा महिने पिठासिन अधिकाऱ्यांचे मत परिवर्तन का झाले नाही? तुम्ही गेल्या सहा महिन्यापासून बाजु मांडत होतो.....

**मा. महापौर :-**

सभागृह नेता, मा. महासभेने कमिटी गठीत केली व मा. महासभेमध्ये हा निर्णय झाला व कमिटीमध्ये निर्णय घेण्यात आलेला आहे.

**आसिफ शेख :-**

मॅडम हा आपल्या नैतिकतेचा प्रश्न आहे. कमिटीचा प्रश्न उपस्थित होत नाही.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

खतगांवकर साहेब, यह पत्र पढनेकी जरुरत नही है। पर आप खुद गए थे ना।

**जेन्वी अल्मेडा / ग्रिटा फॅरो :-**

आपण ते पत्र वाचून दाखवा.

(सभागृहात गोंधळ )

**रिटा शाह :-**

आमचा प्रश्न ऐका नंतर तुम्ही ते वाचा. साहेब, तुम्ही आता बोलले की मॅडमला आम्ही कळविले होते की, सही तुमचीच आहे असे कळविले त्यानंतर...

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या आपण खाली बसून उपायुक्त (मु.) यांना पत्राचे वाचन करु द्या. त्यानंतर आपण आपले प्रश्न मांडा.

**रिटा शाह :-**

आपण सभागृहाचे माईक बंद करु शकत नाही. पहिल्यांदा माईक चालू करा.

**आसिफ शेख :-**

आपण सभागृहाचा आवाज बंद करु शकत नाही.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सचिव, आपण आपल्या सर्व सदस्यांना प्रशिक्षण दौऱ्याला घेउन जातो व उपायुक्त (मु.) खतगांवकर साहेबांनी त्यांचे निवेदन केल्यानंतर आपण सभागृहाचे नियम पाच मिनिटासाठी सांगावे. पिठासिन अधिकारी बोलत असताना मधे बोलणे हे कितपत योग्य आहे.

**जेन्वी अल्मेडा :-**

तुम्हांला शिस्त नाही. आम्हाला शिस्त आहे.

(पत्र जा.व.क्र. मनपा/महापौर/७२६-२००६-०७ दि. १५/३/०७ विषय-मा. महासभा ठराव क्र. ३४ दि. २०/६/०६ बाबत आयुक्त साहेबांना दिलेल्या पत्राचे मा. उपायुक्त (मु.) ह्यांनी सदस्यांच्या मागणीनुसार सभागृहासमोर वाचन केले.)

**रिटा शाह :-**

साहेब हे असे झाले की कुठल्याही कोर्टाच्या एका जजने फाशीची शिक्षा सुनावली व त्याला फाशी झाली आणि नंतर बोलता की मी चुकले त्याला फाशी करायला नको होती असे निर्माण झालेले आहे. प्रशासन म्हणून ही चुक पिठासिन अधिकाऱ्यांनी केले आणि त्याच्यावर आपण काय कार्यवाही केली ते मला पहिल्यांदा सांगा.

**हॅरल बोर्जीस :-**

आम्हाला आपल्याकडून एवढेच अपेक्षित आहे की, ह्या सभागृहामध्ये सन्मा. मिठसिन अधिकाऱ्यांनी सहीचे स्वतःहून नाकारलेले आहे. काही महिन्याच्या कालावधीनंतर ह्याच पिठासिन अधिकारी ती सही स्वतःची असल्याचे मान्य करत आहे. सभागृहामध्ये सदस्यांची दिशाभूल झालेली आहे. आमच्यावर आक्षेप झालेला आहे. पोलिस स्टेशनपर्यंत प्रकरण गेलेले आहे. विधानपरिषदेमध्ये मा. आमदार साहेबांनीही प्रश्न उपस्थित केलेला आहे. तद्नंतर मा. महापौरांनी ज्यावेळेला आक्षेप घेतला त्यामुळे काही कर्मचाऱ्यांची प्रमोशन थांबली. ते अक्षरक्षः मॅडमकडे रडत यायचे की, मॅडम ही सही आपलीच आहे. आपण कृपया हा ठराव पुढील कार्यवाहीसाठी पाठवावा. काही कर्मचाऱ्यांची प्रमोशन थांबली. अशाप्रकारे घुमजाव परिस्थितीमुळे आम्हाला काही लोकांना फेस करायला भारी झालेले आहे. त्याच्यामुळे जे सत्य आहे ते सभागृहासमोर यायला पाहिजे व आम्हाला एवढेच अपेक्षित होते की, सन्मा. पिठासिन अधिकाऱ्यांनी प्रशासनाला जर असे पत्र दिलेले आहे तर आम्हाला त्यांच्याकडून एवढेच अपेक्षित आहे की, ह्याच सभागृहामध्ये ह्याच पिठासिन अधिकाऱ्यांनी वक्तव्य करुन हेच स्टेटमेंट द्यायला पाहिजे होते. त्यांनी तुम्हाला गुपचूप पत्र दिले व त्यांच्या कार्यालयामध्ये मिटींग झाली त्याचे त्यांनी तुम्हाला जे पत्र दिले ते पत्र सभागृहासमोर द्यायला पाहिजे होते.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

आयुक्त महोदय, नैतिकता के आधार पर मॅडम को हमारे साथ यहॉ नगरसेवक मे बैठकर, उपमहापौर को आज के कार्यकाल के लिए, क्योंकि शहरमे ऐसे बहुतसे सवाल है, पानी वगैरा जो बहुत आवश्यक प्रश्न है। इसलिए उपमहापौरजी को जिम्मेदारी दी जाए और नैतिकता के आधार पर मै मॅडमसे भी निवेदन करुंगा अगर वह ज्यादा उसमे न जाकर नैतिकता के आधार पर यहा आकर बैठे।

**आसिफ शेख :-**

आयुक्त साहेब, मी आपल्याला विचारतो की, सन्मा. मिठासिन अधिकाऱ्यांनी याठिकाणी अशाप्राकरचे वर्तन केलेले आहे. संपूर्ण सभागृहाची दिशाभूल केली. जनतेची दिशभूल केली. पोलिस सटेशनपर्यंत प्रकरण गेले. शासनाला चुकीची माहिती दिली गेली. पुन्हा सांगितले की, ही माझीच सही होती. मग अशापध्दतीने आपण आयुक्त म्हणून या संदर्भात महापौरांच्या विरुध्द शासनाला का कळविले नाही की, महापौरांची जी वर्तणूक आहे ती योग्य नाही. सभा चालवण्यासाठी असमर्थ आहे. आपण प्रशासनाला हे कळवायला पाहिजे होते आणि आता त्यांना नैतिक अधिकार नाही. एकदा म्हणायचे माझी सही, एकदा म्हणायचे माझी नाही नाही. प्रथम नागरिक जर असे करायला लागले तर झाले कल्याण.

**याकुब कुरेशी :-**

सन्मा. सभागृहामध्ये अशाप्रकारचे वक्तव्य करत असताना थोडाफार तरी विचार केला पाहिजे. सही करताना मा. महापौर मॅडम विसरल्या होत्या का, त्याची माहिती द्यावी.

**ग्रिटा फॅरो :-**

औषध घेतले होते का? की नशेमध्ये होत्या की, आजारी होत्या व गुंगीचे औषध जास्त झाले होते.

**संगिता म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते, जेव्हा आपण ही सही केली आणि मी बोलली की, ही जर आपली सही असेल तर आपल्यावर काय कार्यवाही केली जावी? असे मी त्यावेळेस वक्तव्य केले होते. आता काय कार्यवाही करावी हे आपणच सांगावे.

**मा. आयुक्त :-**

आपण निवदेन करुन प्रशासनाकडून जी माहिती विचारली होती, ती माहिती मा. उपायुक्त (मु.) यांनी आपल्यासमोर सांगितलेली आहे आणि जी वस्तुस्थिती आहे ती वस्तुस्थिती आपल्यासमोर सांगितलेली आहे. ह्याच्यापेक्षा आणखीन माझ्याकडून, प्रशासनाकडून खुलाशाची काय आपेक्षा आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

आयुक्त महोदय, मै इंटरप्शन करता हु, इन्होने ही कहा था यह सिग्नेचर मेरा नही है। मै ऐसा करुंगी, वैसा करुंगी।

**ग्रिटा फॅरो :-**

एकाएकी आठवण कशी झाली की ही सही माझी आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

खतगांवकर साहब, यह मैं अनेक मुँहपर बोल रहा हूँ, पुछीए, मैं आप और सेक्रेटरी महोदय ऐसे तिन्हो गए थे और उनको समझाया की, यह ठिक नही है। पुरे हाउस की अवमानना है। मेरी अवमानना नही सबकी अवमानाना है।

**हॅरल बोर्जीस :-**

आयुक्त महोदय, सभागृहामध्ये कायदेशीर तज्ञ याठिकाणी उपस्थित आहेत. अशा स्थितीमध्ये कायदेशीर मार्गाने प्रशासनामार्फत मा. पिठासिन अधिकाऱ्यांवर काय कार्यवाही होउ शकते याचा कृपया खुलासा करावा.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

आपका वही स्टाफ है और वही सारे लोग है। दुबारा कहा से इनकी वस्तूस्थिती आ गई।

**आसिफ शेख :-**

अगोदर सुसंवाद झाला नव्हता नंतर सुसंवाद झाला. अशाप्रकारे सुसंवाद साधून जर शहराची वाट लावायची असेल तर त्यांना याठिकाणी राहण्याचा अधिकार नाही.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

आज हाउस चलानेकी जिम्मेदारी उपमहापौर साहब को दिजीए। जैसे आप न्युझीलंड जाते वक्त जिम्मेदारी देकर गई थी वैसे आज मा. उपमहापौर साहब को हाउस चलानेकी जिम्मेदारी दिजीए। नैतिकता के आधार पर अगर जरासी भी नैतिकता हो, अगर आपने साहित्य पढा हो। मा. लालबहादूर शास्त्री का साहित्य पढा हो या किसी बडे नेता को पढा हो। यह तो आपने हाउसपर घोर अन्याय किया हूआ है। आपमे जरासी भी नैतिकता हो तो आप निचे आकर बैठीए और मा. उपमहापौरजी को जिम्मेदारी दिजीए।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

सन्मा. सदस्यांनी खाली बसून घ्यावे. आपण जो विषय सभागृहामध्ये उपस्थित केलेला आहे तो खुलासा केलेला आहे.

**हेलन गोविंद :-**

समाधान झाल्याशिवाय खाली बसणार नाही.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

१५ साल के रेकॉर्ड मे स्टाफ के उपर कभी भी ऐसा ऐलिगेशन किसीने हाउस लिडर के उपर, विरोधी पक्षनेता के उपर नही किया है।

**मा. महापौर :-**

मा. महासभा, ठराव क्र. ३४ दि. २०/०६/०६ रोजी जो पदोन्नतीचा ठराव झालेला होता. त्या ठरावामध्ये त्यावेळेस मी घेतलेला जो आक्षेप होता त्या आक्षेपावर चर्चा करण्यासाठी हा विषय इतिवृत्तांतामध्ये जेव्हा आला त्यावेळेस महासभेपुढे मी माझी सुचना व ठरावामध्ये जी पदोन्नती होती त्याच्या संख्येतील असलेली तफावत ही सभागृहामध्ये निर्देशनास आणून दिली होती.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

उससे पहिले हमलोग आपके साथ बैठे थे।

**मा. महापौर :-**

आपण ऐकून घेण्याची मनःस्थिती ठेवा. पिठासिन अधिकारी बोलत असताना सदस्यांनी ऐकून घ्या.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

यह आपके अकेले मन की चोरी है।

**मा. महापौर :-**

आपण खाली बसून घ्या आणि ऐकून घ्या, काय होते ते, नंतर आपल्याला बोलण्याची संधी दिली जाईल.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

आपने पुरे हाउस का विश्वास खो दिया।

**मा. महापौर :-**

दि. २०/०६/२००७ रोजी मा. महासभेमये झालेल्या चर्चेमध्ये त्यानंतर हा इतिवृत्तांत सभागृहामध्ये आल्यानंतर त्याच्यावर बऱ्याचशा सर्व सन्मा. सदस्यांनी चर्चा केली आणि या संबंधित विषयासाठी एक कमिटी गठित करण्यांत आली. त्या कमिटीमध्ये महापौर दालनामध्ये सभा लावण्यात आली आणि या सभेमध्ये असा निर्णय घेण्यात आला की, पदोन्नतीसाठी ज्यांचे ज्यांचे प्रमोशन आलेले आहे. ह्या केवळ एका विषयामध्ये त्यांचे प्रमोशन थांबले गेले होते आणि त्याच्या अगोदरच आदरणीय कोर्टाचा स्टेसुध्दा आला होता. त्यामुळे पाच सहा महिने कोर्टाचा स्टे असल्यामुळे त्यांचे प्रमोशन होउ शकले नाही हे मी येथे सभागृहामध्ये निर्दशणास आणू इच्छिते. आपल्याला वाटते की, ह्या ठरावामुळे प्रमोशन झाले तसे कुठल्याही प्रकारचे प्रमोशन झालेले नाही. कोर्टाचा स्टे असल्यामुळे त्यावेळेस त्या व्यक्तींना प्रमोशन देता आले नाही आणि शासनाकडून जी मंजुर पदे होती त्याच पदासाठी ..........

(सभागृहात गोंधळ)

**याकुब कुरेशी :-**

कोर्टाचा प्रश्न नाही. तुमच्या सहीचा प्रश्न आहे. त्याच्यावर तुम्ही निर्णय द्या. आपल्याला कोर्टापर्यंत न्यायची गरज नाही. आपण सांगितले की, ही सही माझी नाही आणि नंतर ही सही तुमची कशी झाली?

**मा. महापौर :-**

मी तेच सांगत आहे ते तुम्ही ऐकून तर घ्या. आपण ऐकण्याची मनस्थिती ठेवा.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

पदोन्नती बराबर है। लेकिन विरोधी पक्षनेता और हाउस लिडरका जो अपमान किया है और हमसब लोगों का भी अपमान किया है।

**आसिफ शेख :-**

आपण याठिकाणी आता कितीही फिरवा फिरवी केली तरी उपयोग होणार नाही.

**मा. महापौर :-**

या कमिटीमध्ये निर्णय झाल्यानंतर हे पत्र मी आयुक्त व सचिवांच्या नावाने इश्यू केलेले आहे. माझी हरकत मी मागे घेत आहे. महापौरांना शहानिशा करुन घेण्याचा अधिकार आहे. त्यावेळेस वाटले की ही सही माझी नाही. त्यावेळेस ते मी सभागृहात निदर्शनास आणून दिलेले आहे. ठरावामध्ये झालेली तफावत आणि सहीबद्दल मी सभागृहापुढे स्वतः बोललेली आहे. त्यानंतर त्याची शहानिशा करुन हे मी कबूल केलेले आहे. हे पत्र शासन तसेच आयुक्तांना सुद्धा दिलेले आहे आणि त्यावर कार्यवाही सुद्धा झालेली आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

विरोधी पक्षनेता, सभागृह नेता का इसमे कही नाम नही है।

**हॅरल बोर्जीस :-**

मॅडम, तुम्हाला पूर्ण अधिकार आहे की, एखाद्या गोष्टीची शहानिशा करण्याचा पूर्ण अधिकार आहे. परंतु, ह्या केसमध्ये वेगळ्या पद्धतीने शहानिशा झालेली आहे. ही शहानिशा व्हायला सहा महिने गेले. जर आपण हेच सहा महिन्याअगोदर केले असते तर आज मा. उपमहापौर साहेब सभागृहामध्ये मागणी आहे की, पिठासिन अधिकाऱ्यांनी या सभागृहामध्ये पिठासिन अधिकारी म्हणून बसून कामकाज पाहण्याचा त्यांचा नैतिक अधिकार संपलेला आहे. त्यामुळे आमची मागणी आहे की, आपण या सभेमध्ये पिठासिन अधिकारी म्हणून कामकाज पाहावे अशी मी आमच्या पक्षाच्या नगरसेवकांच्यावतीने मागणी करत आहोत.

**मा. महापौर :-**

सचिव पुढील कामकाजाला सुरुवात करा.

**आसिफ शेख :-**

कामकाज कसे सुरु होईल.

**याकूब कुरेशी :-**

कसे काय?

**महेंद्रसिंग चौहाण :-**

आयुक्त महोदय, इस तरह के ठराव से लगता है की मॅडम की मनःस्थिती बराबर नही है। हमलोग कार्य नही कर सकते। हमने जो ठराव किया है की, उपमहापौर को कायम करनेका उसका आज उनको अधिकार दिजीए। और इनकी मनःस्थिती सही हो जाए उसके बाद इनको बिठाईए।

**मा. महापौर :-**

आप डॉक्टर है क्या?

**महेंद्रसिंग चौहाण:-**

हम डॉक्टर नही है लेकिन आपको डॉक्टर के पास जाना है।

**मा. महापौर :-**

पहिले आपको भेजना पडेगा। बादमें तो मैं जाउगी। परंतु, पहिले आपको जरुरत है।

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सचिवांनी पुढील कामकाजास सुरुवात करावी आणि ज्या सदस्यांना मा. महासभेच्या विषयामध्ये चर्चा करण्याकरिता भाग घ्यायचा असेल त्यांनी खुशाल सभागृह सोडून जावे.

**आसिफ शेख :-**

मॅडम, आपल्याला सभागृह सोडून जावे लागेल. आपला नैतिक अधिकार संपलेला आहे. आपण पिठासिन अधिकारी म्हणून असमर्थ आहात.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलत आहे की, या गोष्टीला जवळ जवळ पाच सहा महिने झाले आणि तुम्ही बोलल्या होत्या की नगरसेवक मिलन म्हात्रे ह्यांनी मला शिवी दिली व राष्ट्रवादी पक्षाच्या नगरसेवकांनीही सांगितले की शिवी दिली तर ते खरं होतं का खोटं होते तेही डिक्लर करा. कारण त्यावेळेला तुमच्यामुळे माझी मुलं घरी सुट्टीकरिता आली होती व मी सुद्धा तुमच्यामुळे दोन-तीन दिवस घरातून फरार होती. मग ते खरं होते का खोटे होते तेही डिक्लर करा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या नयना म्हात्रे आता इथे विषय नाही. तो विषय कोर्टात गेला आहे त्यामुळे आपण त्या विषयावर नंतर बोलू.

**हॅरल बोर्जीस :-**

विषय नसला तरी तो विषय आपल्याशी संबंधित आहे.

**नयना म्हात्रे :-**

त्यावेळेला राष्ट्रवादीच्या नगरसेवकांनी पोलिस स्टेशनमध्ये जावून हंगामा केला तो तुमच्या सांगण्यावरुन केला तर तुम्हाला कोणाची ऑर्डर होती म्हणून केला होता तेही डिक्लर करा.

**आसिफ शेख :-**

आपण हे पण सांगितले की, प्रथम महापौर ह्यांनी आपल्याला दमदाटी केली ती ही घरी येउन तर हे असे होउ शकते का? विनाकारण आपण नको, नको ते खोटे आरोप लावले. सभागृहाची दिशाभूल केली.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आता सभागृहामध्ये हे विषय नाही.

**आसिफ शेख :-**

आपण त्यांना ''आई'' म्हणत होत्या आणि अशी ''आई'' आपल्याला शिवी देईल का?

**मा. महापौर :-**

मा. महासभेमध्ये हे विषय नाही.

**याकूब कुरेशी :-**

आपण दिलेली मुलाखात ईतिवृत्तांत आले.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मनःस्थिती मेरी खराब है या इनकी डॉक्टर के पास इनको जाना चाहिए।

**आसिफ शेख :-**

डॉक्टर के पास जाने की जरुरत क्या है? यह सुर्यप्रकाश की तरह सच साबित हो गया है। इधर डॉक्टर की जरुरत ही नही है।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

फिलहाल आप अपना अधिकार उपमहापौर महोदय को दिजीए। जिससे शहर के विकास के कामकाज का कार्य हो सके।

**आसिफ शेख :-**

सन्मा. उपमहापौर साहेब, आपण या संदर्भामध्ये वक्तव्य करावे. जर पिठासिन अधिकारी मानसिक दृष्टया सक्षम नसतील, असमर्थ असतील तर काय करायला पाहिजे? आपण कृपया याचा खुलासा करावा.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

छह महिने बाद इनकी परिस्थिती बदली इसका कारण क्या है?

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १ चे सभागृहासमोर वाचन केले.)

**महेंद्रसिंग चौहाण :-**

हमलोग सन्मानपुर्वक बोल रहे है की नैतिकता का आधार मानकर कम से कम आज हाउस चलानेका अधिकार मा. उपमहापौर महोदय को दिजीए।

**आसिफ शेख :-**

काका, हा आपल्या अस्मितेचा प्रश्न आहे. वैयक्तिक आपल्या सदस्याचा प्रश्न नाही. सभागृहाची अस्मिता पिठासिन अधिकाऱ्यांनी धोक्यात आणली आहे. त्याबद्दल मनन करा, चिंतन करा.

**रोहिदास पाटील :-**

अस्मिता धोक्यात आली असे आम्ही अनेकवेळा सांगितले. इतिवृत्तांतामध्ये आमचा एक विषय होता की, मा. महापौरांनी आम्हाला विचारायचे होते. आम्ही पिठासिन अधिकारी ह्यांना विचारले होते की, गेल्या

मिटींगमध्ये तुम्ही रुलिंग दिले होते की, या शहराच्या दृष्टीने अतिमहत्वाचा विषय एस.ई.झेड. चा होता. त्याची अधिक माहिती घेउन आम्ही अजेन्ड्यावर विषय घेणार होता, तो विषय घेतला नाही. हे आम्हाला विचारायचे आहे. आम्ही तुम्हाला दुसरे काही अडवत नाही. तुम्ही नियमानुसार जी काही कार्यवाही करायची आहे त्यास तुम्ही समर्थ आहात.

**याकुब कुरेशी :-**

साहेब, म्हणूनच पिठासीन अधिकाऱ्यांची मनःस्थिती बिघडलेली वाटते.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही ते बोलतच नाही. आम्ही मा. आयुक्तांना विचारतो त्यांनी आम्हाला सांगितले होते मा. महापौरांनी सांगितले होते की, पुढच्या मा. महासभेमध्ये एस.ई.झेडची नीट कागदपत्र घेउन .......

**जेन्वी अल्मेडा :-**

सन्मा. सदस्य (काका) आपण दुसरा विषय कशाला घेता? म्हणजे आपण मधेच बोलायचे आणि विषयाचे विषयांतर करायचे.

**रोहिदास पाटील :-**

जेव्हा आमचा विषय पूर्ण होत नव्हता तेव्हा आम्ही बसत नव्हतो. तुम्ही बसलात म्हणून आम्हाला असे वाटले की, तुमचा विषय पूर्ण झाला.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

विषय समाप्त नही हुआ है। आयुक्त महोदय, मैने अभी पुछा था, वस्तुस्थिती चार महिने पहिले ही पता था। जिसकी सुचना मॅडमको विधीवत दी थी। साथमे उपायुक्त (मु.) महोदय थे, उपायुक्त कार्यालय थे, सचिव थे। यही बताया गया था की, यह आपकी स्वाक्षरी है। आप इसे मान लिजिए। यह पुलिस और एल.यु.सी. वगैरा से बच जाए। क्या चार महिने पहिले आपको पुरी स्थिती नही बतायी थी और छह महिने बाद इतने लोगो का प्रमोशन हो गया तब जाकर मॅडम को वस्तुस्थिती का पता चला। मै सिर्फ इतना ही जानना चाहता हू, यह पुरी पार्टी का सवाल है। जिस दिन उन्होने सिग्नेचर के लिए ना बोला था, उस दिन आप भी हमलोगो के साथ थे। कही भी किसी भी पार्टी के एक भी नगरसेवक को कही इन्होने अपने विश्वास मे नही लिया। सिर्फ अकेले जाकर बता दिया की, यह मेरा सिग्नेचर नही है। इसलिए हमलोगोंने कोशीश की, उनको स्थिती बता दे की, यह आपका ही सिग्नेचर है और यह छह महिने के बाद वस्तुस्थिती का पता चला। यही नैतिकता का आधार है। इसपर ही हमलोग चाहते है, आज के मिटींग का अधिकार आप मा. उपमहापौर महोदय को दिजिए और यह कार्यक्रम चलाईए।

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य शरद पाटील ह्यांनी प्रश्न उपस्थित केला की, सभागृह नेते बसले आहेत. वास्तविक सन्मा. सदस्य शरद पाटीलजी सभागृहाच्या अस्मितेचा प्रश्न होता. मी ह्या सभागृहाच्या बाहेरसुध्दा कधी टिका केली नाही व सभागृहातसुध्दा सन्मा. सदस्यांवर टिका करणार नाही. परंतु, सभागृहाच्या अस्मितेचा प्रश्न असूनसुध्दा ज्या सन्मा. सदस्यांनी पोलिस स्टेशनपर्यंत हे प्रकरण नेले. ते सभासद आज याठिकाणी एवढ्या महत्वाच्या आणि गंभीर विषयावर स्तब्ध आहेत हे बघून कीव कराविशी वाटते. वास्तविक हा प्रश्न माझ्यापुरता मर्यादित नाही.

**रोहिदास पाटील :-**

आता बोलते करत असाल तर नीट आमचे ऐका?

**हॅरल बोर्जीस :-**

चुकीच्या ठिकाणी समर्थन करु नका. अशी आमची एवढीच विनंती आहे.

**शरद पाटील :-**

सन्मा. सभागृह नेते साहेब, मी असे बोललेलो नाही. तुम्ही बसले म्हणून बोललो ते बरोबर आहे. तुम्ही बसलात म्हणजे विषय संपला असे आम्हाला वाटले म्हणून ते बोलायला उठले. आम्ही कुठच्या विषयाला उठलो तर बसत नाही आणि तुम्ही बसलात म्हणून बोललो.

**आसिफ शेख :-**

हा या सभागृहाच्या अस्मितेचा प्रश्न आहे. वैयक्तिक असा कोणत्या सदस्याचा प्रश्न नाही. सभागृहाच्या सदस्याबद्दल प्रत्येकाला आपुलकी आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटीलजी कोई बात आपकी अच्छी लगी। आपने भी नैतिकता की आत उस जमाने मे की। पुलिस चौकी लाकर आपने गुहाड की, उसी संदर्भ मे हमने आज यह मुद्दा उठाया है।

**शरद पाटील :-**

सन्मा. सभागृह नेते साहेब, आम्ही तुम्हाला काही उलटे बोललेलो नाही. तुम्ही बसलात तर विषय संपला असे वाटले. म्हणून दुसरा विषय चालू करा असे सांगितले. आम्ही अजूनपर्यंत काही बोललो का? आम्ही गप्प बसलो आहोत.

**रोहिदास पाटील :-**

सभागृह नेत्याला इतका वेळ उभे राहण्याची सवय नाही.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

सारे सब्जेक्ट चालू करीए। सारे सब्जेक्ट शहर के विकास के है।

**रोहिदास पाटील :-**

आपल्याला प्रश्न विचारायला मी अडवत नाही. अस्मितेचा प्रश्न आहे. आपण अस्मितेप्रमाणे चालवा. पण जेव्हा आम्ही अस्मिता सांगत होता तेव्हा तुमची अस्मिता कुठे गेली होती हा आमचा प्रश्न आहे आणि जे सभागृहाच्या नियमात नाही त्याचा तुम्ही आग्रह धरता म्हणून आम्ही सांगता की, तुम्ही उगाच आग्रह धरु नका व सभागृहाची वेळ कशाला वाया घालविता.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य (काका), तुम्ही पोलिस स्टेशनमध्ये केलेली तक्रार मागे घ्याल का?

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही सभागृहाची वेळ वाया दिशेला घालवता.तुम्ही आयुक्तांकडे मागणी केलेली आहे. त्याच्यावर काय ती कार्यवाही करा.आयुक्तांना तुम्ही राईट्स दिलेले आहेत. तुम्ही सत्ताधारी पक्षातले आहात. राईट द्या, आयुक्त ते करतील. आमचे समाधान होईल. म्हणून आम्ही बोललो की, सभागृहाचे काम तुम्हाला थांबवायचे असेल तर थांबवा. पण वेळ घालवू नका.

**हॅरल बोर्जीस :-**

आमची माणसिकता अजिबात नाही की, सभागृहाचा वेळ वाया घालविण्याचा.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही, तुमच्यामध्ये आम्हाला लपेटून घ्यायचे काही कारण नाही. तुम्हाला काम चालवायचे आहे तर काम चालवा. उभे रहायचे आहे तर संध्याकाळी ४.०० वा. पर्यंत उभे रहा. आम्ही नीट बसून आहोत. आम्हाला तुम्ही बोलायला लावू नका. तुमचे साडेचार वर्षाचे जे तुमच्या मनात आहे ते तुम्ही बोलत राहा. कुठे कुठे चुकलात तेही सांगा.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

हमने कहीबार आपका समर्थन किया है। ऐसी बात नही है। अभी भी नैतिकता की बात की और आप पुलिस चौकी वह पिठासीन अधिकारी को निकालकर दुसरा अधिकारी बिठाया जाए।

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर तथा पिठासीन अधिकारी अभी नीचे नही आ सकता है। तो हमलोग किधर समर्थन करेंगे। मिलजुलकर सभा चलाऐंगे। लेकिन समर्थन किधर करेंगे। जो नियम मे नही है।

**आसिफ शेख :-**

हम खुद प्रपोझ करते है की, सन्मा. सदस्य रोहिदास पाटीलजी को पिठासीन अधिकारी बनाया जाए ऐसा प्रस्ताव रखता है।

**रोहिदास पाटील :-**

असे नियमात नाही.

**शरद पाटील :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेखजी आज आप बोलने लगे की, मिलजुलकर करो।

**आसिफ शेख :-**

हम नही बोले, सन्मा. सदस्य रोहिदास पाटील (काका) बोले की, मिलजुलकर करो।

**शरद पाटील :-**

सन्मा. सदस्य आज आप जो बात कर रहे हो, तो सब कमिटीया बनी। बीजेपी नही चाहिए। बीजेपी वालोंको उसमे उसमे पद मत दो। ऐसा क्यों किया?

**आसिफ शेख :-**

हमने बोला की संख्या के हिसाब से बीजेपी को लिजिए। आप की जितनी संख्या है उतने आपके मेंबर है।

**शरद पाटील :-**

जब आपके बाजुसे बोलनेकी बात होती है, तब बीजेपी चाहिए।

**रोहिदास पाटील :-**

मुँह मे राम, बगल मे छुरी ऐसा मत करो।

**आसिफ शेख :-**

हमारे मुख मे राम नही है। मुँह मे राम, बगल मे छुरी वह आपके ही पास मे है। कथनी अलग और करनी अलग है।

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. पिठासीन अधिकाऱ्यांनी मला बोलण्याची परवानगी द्यावी. आज सभागृहामध्ये एकंदरीत सभागृहाच्या अस्मितेचा आणि आपल्या नैतिकतेकच्या प्रश्नावरुन वादंग निर्माण झालेला आहे. आपण घेतलेले

आक्षेप हे आपण आपल्याच पत्राने मागे घेतलेले आहे. त्याच्यामुळे आपण नैतिकता विसरला असेल किंवा हरवले असेल अशाप्रकारचा आरोप आपल्यावर होत आहे. सभागृहामध्ये जेव्हा काही सदस्यांचा याठिकाणी आपल्यावर काही कार्यवाही व्हावी असा जर हेतू असेल तर पिठासीन अधिकारी म्हणून आपणच अशाप्रकारे जेव्हा पिठासीन अधिकारी चुक करतात किंवा ते दोषी ठरतात, तर त्यांच्यावर शिक्षेची काय तरतुद आहे हे आपणच सांगावे म्हणजे सभागृहामध्ये हा प्रश्न निकाली लागेल. कारण सभागृह केवल चर्चेच्या अभावी स्थगित ठेवून किंवा थांबवून चालणार नाही. समजा, पिठासीन अधिकारी ह्यांनी चुक केली आणि ते आपण केले असे आपल्याला वाटेल तर एखाद्या पिठासीन अधिकाऱ्याने चुक केल्यानंतर त्याच्यावर आपण काय कार्यवाही करायला पाहिजे किंवा ते कुठल्या शिक्षेस पात्र ठरतात या संबंधित आपण याठिकाणी निवेदन करावे आणि दुसरी गोष्ट जर पिठासीन आधिकारी हे दोषी असतील तर प्रशासन हे त्यांच्यावर कारवाई करायला सक्षम आहे का? आणि असल्यास तशाप्रकारे त्यांनी कुठली कार्यवाही केली आहे का? ह्याची त्यांनी माहिती द्यावी. म्हणजे हा जो नैतिकतेचा आणि सभागृहाच्या अस्मितेचा प्रश्न आहे, तो प्रश्न निकाली निघून जाईल कारण सभागृहामध्ये आम्हाला कुठलेही अधिकार नाही की, पिठासीन अधिकाऱ्यला खाली बसवावे. जर पिठासीन अधिकारी अनुपस्थित असतील तर त्यांच्या अनुपस्थित उपमहापौर हे पिठासीन अधिकारी म्हणून काम पाहतील. जर दोघेही अनुपस्थित असतील तेव्हा स्थायी समितीच्या चेअरमनला आपण पिठासीन अधिकाऱ्यांच्या पदी बसवू शकतो. आणि ते ही जर अनुपस्थित असतील तर सभागृहामध्ये उपस्थित असलेल्या सदस्यांपैकी कोणालाही पिठासीन अधिकारी म्हणून नेमता येईल. एकदा पिठासीन अधिकारी बसल्यानंतर त्यांना आम्ही सांगु शकत नाही. त्याला सभागृहाचा अधिकार नाही. पण आपण मात्र हा विषय स्पष्ट करा की, अशाप्रकारे कुठल्या प्रकारची तरतुद आहे का की, आपल्याला शिक्षा व्हावी किंवा शिक्षा होईल आणि प्रशासनाने याठिकाणी स्पष्ट करावे की, त्या जर दोषी असतील तर तुम्ही कार्यवाही करण्यास सक्षम आहात का? आणि अशाप्रकारची कार्यवाही तुम्ही प्रस्तृत केली का? असे पिठासीन अधिकाऱ्यांनी प्रशासनाला सांगावे की, अशाप्रकारची त्यांनी काय तरतुद केली आहे का?

**महेंद्रसिंग चौहाण :-**

आयुक्त महोदय, इसी आशय का शुरु से ही मै माँग कर रहा हूँ की, बगीचे और खेल के मैदान के आरक्षण को बिना सभा को .........

**मा. महापौर :-**

सचिवांनी सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**याकुब कुरेशी :-**

सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील ह्यांनी जो मुद्दा मांडला आहे, त्याच्यावर आपण उत्तर द्यावे.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील ह्यांचे जे वक्तव्य आहे की, नियमाप्रमाणे कार्यवाही करण्याची प्रोव्हीजन असेल तर तसे स्टेटमेंट द्यावे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

इस बारेमे आयुक्त महोदय को वस्तुस्थिती का ज्ञान था। तो उस समय आपके ज्ञान को क्या हो गया था?

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील ह्यांनी जे मत प्रदर्शन केलेले आहे त्या विषयावर आयुक्त महोदयांनी आपले मत प्रदर्शित करावे.

**चंद्रकांत वैती :-**

आजच्या मा. महासभेमध्ये दोन विषय अतिशय महत्वाचे, तसे सगळेच विषय महत्वाचे परंतु, पावसाळ्यापूर्वीच नालेसफाई आणि शहरासाठी अतिरिक्त पाणी पुरवठा हे विषय महत्वाचे आहेत आणि सदस्यांना प्रत्येकाला वाटते की, सभा लवकर सुरु झाली पाहिजे. सभेसमोर नैतिकतेचा प्रश्न उपस्थित झाला. त्याच्यामुळे एकमेकांवर आरोप प्रत्यारोप आणि अगदी सिग्नेचर एक्सपर्ट पर्यंत आपण जायच्या बेतात आलो. तसे लिखणे टिपणे महापालिकेचा प्रश्न व्यवहार झाला. विधान परिषदेमध्ये हा मुद्दा चर्चेला आला. राज्याचे म्युन्सिपल सेक्रेटरी ह्यांच्यापर्यंत पत्रव्यवहाराने हा प्रश्न गेला आणि आता कुठेतरी कळले की, महापौर मॅडमनी हा विषय स्वतःच्या अखत्यारितीमध्ये संपविलेला आहे आणि नेमकं त्याच विषयाला धरुन, राजकीय परिस्थिती उद्‌भवली. त्याच्यामुळे आगामी काही सभा अशाच होतील असे सर्वजण धरुन आहेत. परंतु, ह्याच विषयासाठी आपण सभा अशी थांबवून ठेवू नका. मा. महापौर मॅडम, प्रसंग अतिशय गंभीर आहे. आपण ह्यावेळेला जर सभा तहकूब केली आणि पुढच्या १० मिनिटांमध्ये ह्या विषयाचे जे कायदेतज्ञ आहेत किंवा महापालिकेचे सचिव, मा. आयुक्त, उपायुक्त दर्जाची जी मंडळी आहेत त्यांनी बराच काळ या क्षेत्रात काम केलेले आहे. तर त्यांच्याकडून सल्ला घ्यावा आणि १० मिनिटानंतर परत सभागृहाला सुरूवात करावी म्हणजे आपण कुठेतरी एका निर्णयाप्रत येउ. तर आपण काय कार्यवाही करू शकतो किंवा नाही या संदर्भात खुलासा मागवा आणि हे सभागृह १०-१५ मिनिटे तहकूब करावे आणि त्यानंतर आपण एका विशिष्ट निर्णया पर्यंत येउन त्या विषयाला कुठेतरी रोकधाम केली पाहिजे.

**हॅरल बोर्जिस :-**

सन्मा. उपमहापौर साहेब, आपण म्हटल्याप्रमाणे सभा ५-१० मिनिटाकरिता तहकूब ठेवावी मी सभागृहाच्या वतीने सन्मा. प्रफुल्ल पाटील साहेबांना विनंती करतो की त्यांचा प्रत्येक विषयाचा सखोल अभ्यास पाहता जर त्यांना स्वतः ह्या गोष्टी ज्ञात असेल तर त्यांनी सभागृहासमोर सांगितले तरी चालेल म्हणजे हा विषय कुठेतरी मिटेल. आमचा हेतू हा नाही की, सभागृहाचा वेळ कुठेतरी वाया जावा. हेतू हा आहे की, या सभागृहाच्या अस्मितेचा प्रश्न आहे. ह्याच सन्मा. पिठासिन अधिकाऱ्यांनी ह्याच सहीच्या प्रश्नावर जो वादंग उठविला होता आणि त्यानंतर घुमजाव केलेला आहे. विषय ह्या सभागृहाच्या अस्मितेचा प्रश्न आहे. सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेब ह्यांना जर ह्या विषयामध्ये आमच्यापेक्षा जर जास्त माहिती असेल तर कृपया सभागृहापुढे सांगितले तरी चालेल.

**प्रफुल्ल पाटील :-**

सर्व सभागृहाला सत्य परिस्थिती काय आहे ते माहित आहे. स्वतः महापौरांनी स्वतः हे कबुल केलेले आहे. माझ्या नगराध्यक्षाच्या कारकिर्दीत असा एक प्रश्न निर्माण झाला होता. त्यावेळी स्थायी समितीला १ लाख ७५ हजाराच्या वर कुठलेही टेंडर मंजुर करण्याचे अधिकार नव्हते. परंतु, स्थायी समितीचा अध्यक्ष हा नगराध्यक्ष असतो. माझ्या त्या नगराध्यक्षच्या कारकीर्दीत आणि स्थायी समितीच्या कारकीर्दीमध्ये मी अनेक करोडो रुपयाचे टेंडर मंजुर केले. त्याच्यानंतर माझ्या विरुध्द रितसर कायद्याला धरुन तक्रार करण्यांत आली. प्रधान सचिवांकडे तक्रार झाली. प्रधान सचिवांनी त्याच्यावर मला सुनावणी दिली. मला नोटीस काढली नाही. पण त्यांनी म्हटले की, तुमच्या विरुध्द नगरसेवकही आहेत. त्याच्यानंतर त्यांच्यापुढे मी माझे लेखी म्हणणे मांडले की अशाप्रकारे जेव्हा एखादी नगरपालिका आपले स्वतःचे स्वतंत्र बायलॉज तयार करते आणि त्या बायलॉजमध्ये जर तशाप्रकारची मंजुरी दिलेली असेल तर त्या बायलॉजच्या आधारे आम्ही त्या मंजुऱ्या दिल्या असल्या म्हणजे त्या कायदेशीर आहेत त्याच्यावर प्रधान सचिवांनी मला तोंडी असा प्रश्न विचारला की, असे काय बायलॉज असू शकतात का? तेव्हा मी त्याठिकाणी त्यांच्याशी असे ऑरग्युमेन्ट केले की, सर, बायलॉज जेव्हा एखादी नगरपालिका बनविते आणि एखादे विशिष्ट अधिकार प्राप्त करुन घेते तेव्हा ते बायलॉज नुसते नगरपालिकेने मनात आणले म्हणून बनविले जात नाही. तर त्या बायलॉजचा प्रारुप नमुना आपल्या नगरविकास विभागाकडे येतो आणि नगरविकास विभाग त्याच्यावर ऑब्जेक्शन - सजेशन मागवून फायनल ड्राफ्ट पब्लिश करते व पब्लिश केल्यानंतर तसे ते उपविधी अंमलात येतात. माझ्या ह्या ठरावांना जे आम्ही दिड ते लाखाच्या वर ठराव केले, कोट्यावधी रुपयांचे टेंडर होते. ते उपविधीला धरुन केलेले आहे आणि ही उपविधी बरोबर आहे व या उपविधीच्या आधारे आम्ही असे ठराव करु शकतो अशाप्रकारे या उपविधीच्या आधारे आम्ही असे ठराव करु शकतो. अशाप्रकारचे मत मी कक्षअधिकारी ह्यांच्यांकडून अगोदरच लेखी आणले होते. आणि त्याच्यानंतर हे टेंडर मंजुर केलेली होती. प्रश्न असा आहे की, माझ्या विरुध्द तक्रार केली गेली ह्याला महत्व आहे. एखाद्या पिठासीन अधिकाऱ्याविरुध्द तक्रार केली गेली तर तो सक्षम अधिकारी असला पाहिजे. याठिकाणी आयुक्त हे समांतर ॲथोरिटी असल्यामुळे कदाचित आयुक्तांकडे ते अधिकार नसतील, प्रधान सचिवांकडे असेल, पिठासीन अधिकारी तर स्वतःहून स्वतःवर कधीही कार्यवाही करु शकणार नाही. कायद्यात तरतुद असेल तर स्वतःहून स्वतःला शिक्षा करणार नाही आणि त्यांना शिक्षा व्हावी अशाप्रकारची जर तरतुद असेल तर आपण त्या तरतुदीच्या आधारे हा सगळा प्रस्ताव प्रधान सचिवांकडे पाठवा की, ही तरतुद आहे. ह्याच्यामध्ये पिठासीन अधिकाऱ्यांनी चुक केलेली आहे पण तशाप्रकारची तरतुद आपल्या महानगरपालिका कायद्यात नाही. पण नगरपालिका कायद्यामध्ये बऱ्याच गोष्टी आहेत. एखाद्या नगराध्यक्षाला, नगरसेवकाला अपात्र ठरविण्याबाबत बऱ्याचशा तुरतुदी आहेत. त्या तरतुदीला लागु असून बऱ्याचशा कार्यवाही करता येतात. याठिकाणी पिठासीन अधिकाऱ्याला माझे एकच सांगणे आहे की, जर आपल्या कायद्यामध्ये तरतुद असेल तर ती आपण तपासून पहा व मधे पाच - सहा मिनिटाचा वेळ घ्या. असे असेल तर तरतुद सांगा. नसेल तर सभागृहाला वाटते, प्रशासनाला वाटते तर हे प्रकरण पाठवावे. कारण ह्याठिकाणी दोन गोष्टी महत्वाच्या आहेत. आक्षेप जो आहे तो दोन गोष्टीबाबत आहे. एक सहीबाबत व दुसरी पदसंख्येबाबत आहे. एखाद्या वेळी असे ही होउ शकते की, पदसंख्या एका ठरावामध्ये कमी होतील व दुसऱ्या ठरावामध्ये जास्त असेल कारण पदसंख्येबाबत मी ही संशयित होतो. त्या सभेला मी नव्हतो. नाहीतर, कदाचित मी ही आक्षेप नोंदविला असता. पण नंतर कळाले की, त्याठिकाणी फक्त अजेंड्यावर जेव्हा विषय आला होता त्याला जो गोषवारा लावला होता त्याच्यावर पदे होती, ती कमी लिहली होती आणि प्रत्यक्षात पदे जास्त होती. त्याच्यामुळे तशाप्रकारचा आक्षेप मी सुध्दा घेताला होता पण तोंडी घेतला होता. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाबाबत खरोखर पिठासीन अधिकारी दोषी आहेत की नाही हे ठरविण्याचे अधिकार हे आपल्या उच्च पदस्थ लोकांनाच असतील आणि म्हणून तशाप्रकारचे हे प्रकरण आपण सादर करावे. आपल्याला योग्य वाटल्यास त्यामध्ये एवढेच होउ शकते की, मला असलेली माहिती, मी काही कायदेपंडीत नाही. पण प्रॅक्टीकली जे घडलं ते मी सांगितले.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेबांनी सांगितलं की, सगळ माझ्यापर्यंत आले आणि ते पोटधरुन हसले. चर्चेचा चेंडू नेमका त्यांच्याजवळ जाउन पडला. त्यांनी चर्चेत भाग घेतल्यामुळे आपण नगराध्यक्ष असताना स्थायी समितीला जे अधिकार दिले होते. जे जनरल बॉडीला पाहिजे ते आपण घेतलेले तत्कालीन

चीफ ऑफीसर संपतराव शिंदे ह्यांनी १९८८ च्या एका ठरावामध्ये एक प्रशासकीय ठराव होता त्याच्यामध्ये स्थायी समितीला अधिकार दिल्याची नोंद केली होती. त्या ठरावाला अनुसरुन आपण ते ठराव करत होता आणि या विषयात सभागृहात अस्तित्वात असताना स्थायी समितीने हे ठराव करु नये. जनरल बॉडीमघ्येच व्हावे असे मत त्यावेळेला महाराष्ट्राचे प्रधानसचिव श्री. रामानंद तिवारी साहेब ह्यांच्याकडे मीच लेखी नोंदविले होते आणि नगरपरिषद संकलनाचे अधिकारी श्री. भगवान सहाय साहेबांकडे मीच नोंदविले होते आणि त्यावेळेला कक्ष अधिकारी श्री. रा. नी. पांडे साहेबांनी मला उत्तर दिले होते की, प्रशासकीय ठराव अमुक अमुक प्रमाणे असे होत आहे. परंतु, आपल्या या ठरावावर निर्णय होईपर्यंत आपण तेव्हा नगरपरिषदेचे उपविधी मंजुर केले नव्हते. जर आपण ते उपविधी मंजुरीसाठी टाकले. परंतु, हा विषय मी केला होता आणि आपली टर्म संपेपर्यंत हा विषय तसाच चालू होता. नगरपरिषदेने जी उपविधी मंजुर केली ते महानगरपालिकेला लागु होणार नाही आणि महानगरपालिकेने जो उपविधी मंजुर केला त्याच्यामध्ये अशा परिस्थितीबद्दल कुठे उल्लेख नाही. त्याच्यामुळे मी अशी सुचना केली होती की, आपण बी.पी.एम.सी. ॲक्ट १९४९ मध्ये कुठे तशी नोंद आहे का? किंवा इतर महानगरपालिकांमध्ये तशी काय माहिती आहे का? हे करण्यासाठी आपल्याला १०-१५ मिनिटे सभा तहकुब करुन आपण ही माहिती घ्या. कारण हा विषय पुढच्या प्रत्येक सभेला चर्चेमध्ये येणार आणि प्रत्येक सभेमध्ये हा विषय येणार. जर निर्णयाप्रत जायचे असेल तर आपल्याला विषयाच्या मुळापर्यंत जावेच लागणार.

**रोहिदास पाटील :-**

पिठासीन अधिकाऱ्यांना माझी अशी विनंती आहे की, जेव्हा सभागृह नेत्यांनी हा विषय आणला. एखाद्या कोणी नगरसेवकाने आणलेला नाही. जरी त्यांच्या पक्षाची पॉलिसी असेल तर त्याने तसा अभ्यास करुन सगळं आणायला पाहिजे होते ना. हे आम्हाला विचारतील, त्यांना विचारतील सभागृह नेत्यांची ही दयनीय अवस्था बघून आम्हाला कीव येते. आम्ही असे म्हणतो की, तुमचे म्हणणे जे काही खरं आहे, खोटं आहे. आम्ही थांबत ही नाही, पण तुम्ही ते पेपर आणायला पाहिजे होते की, पिठासीन अधिकाऱ्यांनी केलेली चुक ह्या शिक्षेस पात्र आहे. हा नियम असा बोलतोय तसे तुम्ही येथे आणलेले नाही आणि तुम्ही सांगाल की, अस्मितेचा अपमान झाला आहे. हे आता बोलून काय फायदा? तुम्ही आता लिगल जी काही लढाई असेल ती करा. सभागृहाचे काम चालवा अशी आमची विनंती आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

सभागृह के कामकाज चलने मे हमलोग रुकावट न लाते हुए इतना बोलना चाहता हुॅं की, मान अपमान यह ना लेकर जो वस्तुस्थिती थी उसमे कही भी समर्थक का नाम आपने कही भी नही लिया। आपका अपना मत था ना की, यह आपका सिग्नेचर है। आपका आपना मत था की, यह आपका सिग्नेचर नही है। तब आपको वस्तुस्थिती का ज्ञान हुआ उस समय इन दोनो लोंगोंका नाम कहॉ था। जो प्रस्तावित - हॅरल बोर्जीस और समर्थक - परशुराम पाटील इनको जानकारी न देते हुए आपने एक्सेप्ट किया की, यह सिग्नेचर मेरा है। हाउस मे इस तरह का नगरसेवकों का अपमान तो हुआ ना।

**हॅरल बोर्जीस :-**

पिठासीन अधिकारी मॅडम, सभागृहामध्ये वास्तविक जनतेला आपल्याला अपेक्षित होते की, त्यांच्याही आकलनांच्या पलिकडे आहे. मा. उपमहापौरांनी या सभागृहाला सुचित केल्याप्रमाणे ही सभा पुढील १० ते १५ मिनिटांसाठी तहकूब करावी. सदर विषयाबाबत कायदेशीर तज्ञांकडून जे मत घ्यायचे असेल ते घ्यावे आणि त्यानंतर सभेला आपण सुरुवात करुन सभागृहासमोर वस्तुस्थिती मांडावी.

**रोहिदास पाटील :-**

जेवणाचीच सुट्टी करा ना.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील ह्यांनी सकाळी सभागृहात महापालिकेच्या दालनात घुसता घुसता मला सांगितले की, सर्व सदस्यांची आता आरोग्य तपासणी करावी लागणार आहे. कारण तुम्ही लोक सभा चालवताना वेळेवर जेवण देत नाही. तर ह्या दरम्यान हा लंच टाईम डिक्लेअर करावा आणि त्याच्यानंतर आपण कायदेशीर मत मागवून घेउ.

**नगरसचिव :-**

मा. महापौरांच्या परवानगीने जेवणाची सुट्टी दिलेली आहे.

**लंच टाईम :- दु. १.३० वा.**

**मा. महापौर :-**

सचिवांनी सभेला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने जेवणाच्या सुट्टीनंतर सभेला पुर्नश्च सुरुवात करण्यात येत आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

सभा सुरु होने से पहिले मैं आपसे बोलना चाहता हॅं की, जो मुद्दा उठाया था की आपने पार्टी को बिना विश्वास मे लेकर एक मुद्दा उठा दिया की, यह मेरी सिग्नेचर नही है। सारे लोगोंने आपके साथ इसबारे

मे बातचित की यहाँ से उपायुक्त (मु.) श्री. दिपक खांबित, हरेश पाटील सबने आपको समझाने की कोशिश की, पार्टीने आपको पदसे निकाल दिया। हॅरल फिरभी आप पिठासिन अधिकारी के पद पर बैठी हुई। हॅरल यह मेरी गलती हो गई थी और यह मेरा ही सिग्नेचर सिद्ध हआ है। यह बात कहकर समाधान नही होता है।

**हॅरल बोर्जीस :-**

या विषयावर संबंधित कायदेतज्ञ आहेत त्यांना ह्या सभेमध्ये निवेदन करण्यास सांगावे. याठिकाणी सभेला सुरुवात झालेली आहे. कायद्यामध्ये अधिनियमामध्ये अशाप्रकारची तरतुद असेल तर त्याचा खुलासा करावा व त्यानंतर सभेला सुरुवात करावी.

**मा. महापौर :-**

कायद्यामध्ये असलेली तरतुद व नियम प्रशासनाने सभागृहाला सांगावेत.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे की, मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ कलम १३ मध्ये पदावरुन काढून टाकले जाण्याची पालिका सदस्यांची पात्रता क्लॉज (१) या अधिनियमान्वये निवडून आलेला कोणताही पालिका सदस्य आपले कर्तव्य पार पाडत असताना गैरवर्तन केल्याबद्दल किंवा कोणतीही लज्जास्पद वर्तवणूक केल्याबद्दल दोषी आहे किंवा पालिका सदस्य या नात्याने आपली कर्तव्य पार पाडण्यास असमर्थ झाला आहे अशी राज्य शासनाची खात्री झाल्यास त्यास महानगरपालिकेच्या एकूण पालिका सदस्यांपैकी कमीत कमी ३/४ पालिका सदस्यांनी आपले मत देवून आपला पाठिंबा दिलेल्या महानगरपालिकेच्या शिफारशीवरुन अशा पालिका सदस्यास निर्दिष्ट करण्यात येईल किंवा त्या तारखेपासून पदावरून काढून टाकण्यात येईल.

**हॅरल बोर्जीस :-**

मॅडम, ह्याच्या आधी आपण कन्वेक्शन हा शब्दप्रयोग आपण वापरला.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

डिसक्वॉलिफिकेशन असे.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. पिठासिन अधिकारी हे दोषी आहेत हा येथे प्रश्नच नाही ना. कनेक्शनच आपण जे बोलल्या.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

सेक्शन ११, क्लॉज २६ चे आपण वाचन करावे. त्याच्यामध्ये त्यांनी डिसक्वॉलिफिकेशनचे १० मुद्दे दिलेले आहेत.

**रोहित सुवर्णा :-**

मॅडम, आता आपण जे सेक्शन १३ चे वाचन केले. आपण त्याचे पूर्ण वाचन केलेले नाही. त्याचा सेकेन्ड परिच्छेद बघा. परंतु, या कलमान्वये ज्या पालिका सदस्याच्या बाबतीत शिफारस करावयाची असेल त्या पालिका सदस्यात अशी शिफारस का करण्यात येउ नये. या विषयी कारण दाखविण्याची वाजवी संधी दिली पाहिजे व अशी संधी दिल्याशिवाय महानगरपालिकेने कोणतीहीशिफारस करता कामा नये. त्यानंतर सबक्लॉज दोन बघा.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

पोटकलम १ अन्वये ज्या व्यक्तीला पदावरून काढून टाकण्यात आले असेल अशी व्यक्ती राज्य शासनास याव्दारे जो आदेश देण्याचा अधिकार देण्यात आला आहे. ज्या आदेशाव्दारे त्याने अशा व्यक्तीस अशा अर्हतेतून मुक्त केले नसेल तर तिला पदावरून काढून टाकलेल्या तारखेपासून पाच वर्षाचा कालावधीपर्यंत पालिका सदस्य म्हणून निवडून येण्यास पालिका सदस्य म्हणून राहण्यास अनुज्ञेय ठरेल.

**रोहिदास पाटील :-**

सभागृह नेत्यांना विनंती करेन की हे कोर्ट नाही. मी शहराच्या विकासाच्या दृष्टीने बोलत आहे की, नालेसफाईचे जे एवढे मोठे काम आहे, तुम्हीपक्षीय धोरण घ्या. रितसर अभ्यास करा. नाहीतर ज्या तरतुदी आहेत त्यामध्ये जो दोषी असेल त्याच्यावर कार्यवाही करा पण आपण कोणताही ठोस मुद्दा ठेवत नाही आणि तुम्हीजर प्रत्येक प्रश्नाला कायद्याचे अख्खं पुस्तक वाचत बसाल तर नालेसफाईच्या कामाचा विषय तुम्हाला पूर्ण करायचा आहे की नाही हेही आम्ही सभागृहाला विचारत आहोत.

**हॅरल बोर्जीस :-**

मी आपल्याला इंटरअप करतो की, ह्या सभागृहाचे आपण ज्येष्ठ सदस्य आहात. संपूर्ण सभागृह आपला आदर करतो. एखाद्या चुकीच्या गोष्टीला कुठेतरी आपण खतपाणी घालत आहात हे सिद्ध होत आहे.

**रोहिदास पाटील :-**

सभागृह नेतेजी, सभागृहाच्या टिपणीमध्ये यावे या भाषेत मी तुम्हाला बोलत आहे की, ह्या गोष्टीमध्ये तुम्ही जर आमच्याकडून सह कार्याची अपेक्षा केली.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य (काका) जर पार्टीजवळचा प्रश्न असता राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचा प्रश्न असता तर मी तुमच्याकडून समर्थन मागणे चुकीचे आहे. हा प्रश्न सभागृहाचा आहे. संपूर्ण सभागृहाला पिठासिन अधिकाऱ्यांनी....

**रोहिदास पाटील :-**

सभागृहाने न्याय मागावा या मताचेच आम्ही आहोत.

**हॅरल बोर्जीस :-**

सभागृहाचे आपण हीएक पार्ट आहोत ना. सभागृह नेता हा संपूर्ण सभागृह नाही ना.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही जो मुद्दा उभा करता आता आपण कलम १३ चे वाचन करायला सांगितले, आम्ही काही बोलत नाही, तुम्हीवाचा, त्यावर तुम्हाला काही मिळत नाही. किती वेळ आपण हा विषय चालवणार आणि नालेसफाईसारखे जे महत्त्वाचे विषय आहेत ते घेणार की, नाही. असा विषय येईल. पुन्हा २:३० वा. पाणी प्रश्नकरिता सभा लावली आहे. तर पाणी प्रश्नाचा ही विषय व्हायला पाहिजे. नाहीतर ह्या सगळ्यात आपणच दोषी ठरू. सभा तुम्हाला किती वेळ चालवायची आहे ती चालवा. मी त्याच्यात खो घालत नाही.

**आसिफ शेख :-**

हा सभागृहाच्या अस्मितेचा आणि नैतिकतेचा प्रश्न आहे. नालेसफाईचा जो प्रश्न आहे तो सर्वांच्या जिव्हाळ्याचा आहे आणि नालेसफाई ही झालीच पाहिजे व ती पावसाळ्यापूर्वीच झाली पाहिजे व जर झाली नाही तर आपल्याला कार्योत्तर मंजूरी ही घेता येईल. नैतिकतेचा प्रश्न आहे त्याच्यावर अगोदर भाष्य करावे.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. उपमहापौर साहेब, सभागृहासमोर मधल्या काळामध्ये सभा तहकूब ठेवल्यानंतर अजून ही कोणत्याही कायदेशीर ह्याच्यावर येत नाही. सभेचा वेळ वाया जावा हा आमचा उद्देश नाही. त्याही पलिकडे जावून समजा, आमचे ज्येष्ठ सदस्य महेंद्रसिंग चौहाण ह्यांनी माझ्याशी चर्चा न करता किंवा आमच्या कोणाशीही डिसक्शन न करता फार मोठेपणाने त्यांनी ह्या सभागृहात हा मुद्दा उपस्थित केलेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

कुठे मन मोठे दाखविलेले आहे आणि सभागृहामध्ये कुठे चुकीचा निर्णय दिलेला आहे तेहीसांगतो कारण हे रेकॉर्डिंग आहे. १९८४ पासून ते या सभागृहात नाही. सभागृह कधी अस्तित्वात आले नगरपरिषद कधी अस्तित्वात आले हेही त्यांच्या लक्षात राहिले पाहिजे ना. सगळे भावनात्मक बोलून कसे चालेल.

**याकूब कुरेशी :-**

ह्या अगोदर ते ही सदस्य होते.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. उपमहापौर साहेब मला या सभागृहासमोर फक्त एकच गोष्ट सांगायची आहे की, सन्मा. पिठासिन अधिकाऱ्यांना जर वाटते की ती त्यांची सही होती...

**मा. महापौर :-**

सदस्यांनी बोलत असताना पिठासिन अधिकाऱ्यांना उद्देशून बोलावे. सचिव, ह्याबाबत जर काहीनियम असतील तर बोला व पिठासिन अधिकाऱ्याला उद्देशून जर बोलत नसेल तर त्यांचे शब्द कामाकाजातून काढून टाकावे. मघाशी सभा सुरु झाली असताना सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चौहाण हे जे बोलले ते कामकाजातून वगळून टाकावे.

**हॅरल बोर्जीस :-**

पिठासिन अधिकाऱ्याबद्दल जर आम्हीकाहीचुकीचे वक्तव्य केले असेल तर ते कामकाजातून काढून टाकावे. आम्ही चुकीचे असे काहीच बोललेलो नाही.

**आसिफ शेख :-**

कामकाजातून शब्द काढून टाकण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. इथे सभागृहात चर्चा होते त्यांची इतिवृत्तांतामध्ये नोंद व्हायलाच पाहिजे.

**हॅरल बोर्जीस :-**

सभाशास्त्राप्रमाणे जे बोलायला पाहिजे तेच आजपर्यंत आम्हीबोललेलो आहोत. चुकीचा एकहीशब्द आमच्या तोंडातून पिठासिन अधिकाऱ्याच्या बाबतीमध्ये निघालेला नाही. ह्याच पिठासिन अधिकाऱ्यांनी ह्या सभागृहाला खोटे ठरविलेले आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

जिसे नैतिकता का ज्ञान नहीहै, ऐसे महापौर के निचे काम करनेके लिए मैं कभी भी तयार नही हूँ। इसलिए मैं सभात्याग करता हूँ।

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चौहाण साहब आपको सभात्याग करनेकी जरुरत नही है।

(सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चौहाण ह्यांनी दू. ३.१० वा. सभात्याग केला.)

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. उपमहापौर साहेब, माझी पिठासिन अधिकाऱ्यांना एकच विनंती आहे की, जर त्यांना वाटते की, ती सहीत्यांची होती तर त्यांनी रितसर सभागृहाला निवेदन करणे आवश्यक होते. या सभागृहामध्ये १२ ऑक्टोबर २००६ ची दूपारची परिस्थिती जर आपण बघितली असती तर कोर्टाप्रमाणे या सभागृहात कामकाज चालू होते. एका बाजूला कॅसेटची टेपिंग चालू होती व दुसऱ्या बाजूला कॅसेट ऐकणे चालू होते या सभागृहामध्ये सन्मा. पिठासिन अधिकाऱ्यांनी या सभागृहाची जाहिर माफी मागावी आणि त्यानंतर त्यांनी पिठासिन अधिकारी म्हणून पुढचे कामकाज चालवावे अशी मी सभागृह नेते म्हणून या सभागृहाकडे मागणी करत आहोत.

**मा. महापौर :-**

दि. २०/०६/०६ रोजी जो ठराव व इतिवृत्तांत मा. महासभेकडे आला आणि तो विषय आज सभागृहामध्ये सन्मा. सदस्यांनी मांडलेले आहेत त्याच्या दोन महिन्यानंतर पुन्हा इतिवृत्तांतासाठी मा. महासभेसमोर हा विषय आला तेव्हा हीचर्चा झाली त्या पदांमध्ये जी तफावत होती ते मी या सभागृहापुढे निर्देशनात आणून दिलेली होती. त्यानंतर सभागृहामध्ये बराच वेळ चर्चा झाल्यानंतर सभागृहामध्ये असा निर्णय घेण्यात आला की, एक कमिटी गठीत करण्यात आली होती जो ठराव मा. महासभेपुढे मांडला गेला आणि मा. महासभेच्या अजेंडयावर गोषवाऱ्यावर जी संख्या प्रशासनाने दिली होती ती ठरावात मांडली गेलेली संख्या ह्याच्यामध्ये मोठया प्रमाणात तफावत असलेली आणि सहीचा मुद्दा या विषयावर कमिटी गठीत करुन महापौर दालनामध्ये दोन वेळेस मिटींग झाल्या व ती मिटींग झाल्यानंतर सर्व सदस्यांनी अशी मागणी केली की, कित्येक वर्षापासून कामकाजांमध्ये जे पदाधिकारी आहेत ह्या पदाधिकाऱ्यांचे प्रमोशन व्हायला हवे पदनिर्मिती झाल्यानंतर त्यांना या पदावर नियुक्त करता येईल त्याच्याशिवाय या ठरावाला प्रशासनाकडून मंजूरी मिळाल्याशिवाय त्याची पुर्तता होउ शकत नाही यामुळे सगळ्यांनी निर्दशनात आणून दिले. तसेच ज्यापद्धतीने हे सहीचे मॅटर झाले त्यापद्धतीने कमिटीमध्ये सर्व सदस्यांनी एकत्र येउन चर्चा करुन निर्णय झालेला आहे आणि त्या निर्णयानुसारच मी माझा पत्रव्यवहार महाराष्ट्र शासन सचिव आणि मिरा भाईंदर शहराचे आयुक्त...

**याकूब कुरेशी :-**

मा. महापौर मॅडम, आपण बोलता की सर्व सदस्यांनी ठरविलेले आहे तर हे सर्व सदस्यांनी ठरविलेले नाही. ह्याच्यामध्ये मला काही माहित नाही.

**मा. महापौर :-**

मा. महासभेने ज्या गठीत समितीला अधिकार दिले होते त्या समितीने हा निर्णय घेतलेला आहे. समितीला जे लेटर द्यायचे होते तर महापौर या नात्याने मी जे वक्तव्य केले होते ते वक्तव्य पूर्णपणे तो विषय मांडून आयुक्तांकडे दिलेले आहे व त्यांनी त्या विषयाची कार्यपुर्तता केलेली आहे. सभा सुरु झाल्यावर हा विषय आला तेव्हाही खुलासा केला होता आणि आताही खुलासा केला महापौर पिठासिन अधिकारी म्हणून मी सभागृहापुढे स्वतःहून विषय आणला होता त्यांनतर कमिटीव्दारे ह्या विषयाची शहानिशा करुन पूर्ण खात्री करुन हा विषय तिथे मी मिटवलेला आहे. संपवलेला आहे आणि आयुक्तांच्या ते स्वाधीन केलेले आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

मॅडम, हा प्रश्न जरी तुमच्यापुरता संपलेला असला तरी सभागृहापुरता हा विषय संपलेला नाही. ह्याच सभागृहामध्ये तुम्ही आक्षेप घेतलेला होता. हा विषय कदाचित तुमच्यापुरता मिटलेला असेल. सभागृहासमोर ह्या बाबतीतमध्ये तुम्ही जाहिर निवेदन करावे.

**मा. महापौर :-**

सभागृहानेच कमिटीला अधिकार दिले होते आणि हा कमिटीचा निर्णय आहे व महापौरांनी लेटर पॅडवर त्याचे उत्तर ही दिलेले आहे.

**आसिफ शेख :-**

आपण आता सांगितले की, माझ्या दालनामध्ये दोन वेळा मिटींग झाल्या व कमिटीमध्ये असे निर्णय झाले तर कमिटीमध्ये सभेला लोक आलेली होती. आपण सभेला सुरुवात केली असेल तर त्याचे इतिवृत्तांत झाले असेल ना, आम्हाला ते इतिवृत्तांत दाखवा. तुमच्याकडे त्या मिटींगचे इतिवृत्तांत नोंदले आहे का, असेल तर दाखवा. कारण आपण अगोदर सांगितले की, सहीकेली नाही. वायटिंग लावले व पुन्हा सांगितले की ही सही माझी होती. हे तर आपण संपूर्ण सभागृहाचे सर्व सदस्यांनी दिशाभूल केली. शहराची दिशाभूल केली शासनाची दिशाभूल केली आणि आता आपण पुन्हा वक्तव्य करत आहात की दोनदा मिटींग झाल्या तर त्याचे इतिवृत्तांत आपण आम्हांला दाखवा ना.

**मा. महापौर :-**

एखाद्या विषयाची पिठासिन अधिकारी तथा महापौर म्हणून शहानिशा करुन तो विषय पूर्ण करणे हा महापौरांचा अधिकार आहे आणि महापौरांनी शहानिशा करुन तो विषय पूर्ण केलेला आहे.

**आसिफ शेख :-**

आम्ही महापौरांच्या अधिकाराबाबत काहीच बोललो नाही. याठिकाणी आपण पुन्हा एकदा दिशाभूल करत आहात. पुन्हा एकदा घुमजाव प्रकार चालू आहे. आम्ही सांगितले त्यांचे जर इतिवृत्तांत असेल तर

दाखवा. सोक्षमोक्ष होउ दे. हा सुर्य हा जयद्रथ असे समोरासमोर होउ द्या. तुमची ती हीचर्चा मानसिकता नाही की इतिवृत्तांत लिहि ले आहे की नाही?

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, जी समिती गठीत केली त्या समितीमध्ये कोण कोण सदस्य होते ते तरी सांगा.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, येथे कोणाला वेळेचे काहीच पडलेले नाही का? आपले घरं, संसार. सर्व काही सोडून झालो आहोत. शाळेला दांडी मारुन आलो आहेत ते कशासाठी? आपण सिरीयसली घ्या की, आम्ही सकाळी ११.०० वाजल्यापासून कशासाठी बसलो आहोत. मह त्वाचे विषय सर्व बाजूला राहि ले आहेत. कोणीतरी आपली प्रतिष्ठा कमी करा. शह राच्या विकासासाठी जर आपण सर्वोच्च पदावर बसलेले आहोत तर शह रासाठी नमतेपणा घेतला पाहि जे.

**हॅरल बोर्जीस :-**

सभागृहाच्या अस्मितेपेक्षा पिठासिन अधिकाऱ्यांची अस्मिता ही मोठी नाही.

**प्रभात पाटील :-**

मी तेच म्हणत आहे. कोणीतरी नमतेपणा घ्या.

**हॅरल बोर्जीस :-**

आम्हीफक्त एवढीच माफक अपेक्षा केलेली आहे की, सभागृहाची दिशाभूल केली आहे तर त्यांनी ह्याच सभागृहाची माफी मागणे आवश्यक आहे. एवढीच आमची मागणी आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मॅडम, आपण सहीच्या विषयावर सभागृहाचा अख्खा दिवस घेतला. तो वेळ तर आम्हाला परत मिळणार नाही. आज येथे सभागृहामध्ये आपण उपस्थित आहात आणि जर त्या विषयावर चर्चा होते तर आपण याठिकाणी योग्य निर्णय घेउन आपण त्याठिकाणी पिठासिन अधिकाऱ्यांची नेमणूक करायला पाहिजे. जर आपल्याला वाटते की, आपण योग्य आहात तर आपण योग्य काय आहे याचा खुलासा करुन दाखवा किंवा तुम्हाला त्याच्यामध्ये सभागृह नेते माफी मांगायला सांगत आहे तर माफी मागण्यामध्ये काहीच नाही. तुम्हीआठ लाख जनतेला खोटं ठरविलेले आहे. त्यांच्यासमोर तुम्हीखोटे झालात की, मी सही केलेली नाही आणि नंतर म्हणता की, मी सही केलेली आहे. म्हणजे खरं तुमचे मह त्व काय ते तुम्ही सांगता ते तुम्हाला कळलेले नाही. सही आपण झोपेत केलेली नाही. चांगले सुजाण आणि सुशिक्षितपणाने केलेली आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण काहीतरी चुकीचे वक्तव्य करु नका.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

चुकीचे वक्तव्य कोणी करत नाही. सभागृहाचा वेळ वाया चालला आहे.

**मा. महापौर :-**

आपण सभागृहाचा वेळ दुसरीकडे भरकटत घेउन जावू नका.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

सदस्य येथे उपस्थित आहेत आणि सगळ्यांचा वेळ वाया जात आहे. वेळेचे बंधन आहे तर आपण करायला पाहि जे.

**मा. महापौर :-**

म्ह णून आपण वेळ वाया घालवत आहात का? तुम्हीवेळ वाया घालवण्यासाठी आला आहात एवढे मह त्वाचे विषय असताना.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मी वेळ वाया घालवण्यासाठी आलेले नाही. मी बरोबर वेळेवर आलेली आहे. सभा चालू झाली हे मला समजले म्ह णून मी वेळेवर आली.

**मा. महापौर :-**

सचिव जे अवाच्य शब्द वापरले ते काम काजातून काढून टाकावेत?

**ग्रिटा फॅरो :-**

आपणच अवाच्य शब्द वापरले आहेत आणि सांगतात की, ते शब्द काढून टाका.

**आसिफ शेख :-**

विषय झाला नाही तर कामकाजाला कशी सुरुवात करायची आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

पिठासिन अधिकारी साहेबा, या सभागृहाचे कामकाज होउ देणार नाही जोपर्यंत आपण या सभागृहाची माफी मागत नाही तोपर्यंत पुढचे कामकाज सुरु होणार नाही.

**मा. महापौर :-**

माफी मागण्यासारखे कुठलेही वाईट कार्य केलेले नाही. कोणाचे आर्थिक नुकसान किंवा कोणाच्या इज्जतीला धक्का लागलेला नाही. चुकीची माहि ती देवून सभागृहाची दिशाभूल करु नका.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

आपण सभागृहाला खोटी माहिती दिलेली आहे. तेव्हा तुम्ही आमचे दोन तास घालविणे सभागृहामध्ये की ही माझी सही नाही असे सांगून.

**मा. महापौर :-**

कमिटीने घेतलेला निर्णय आहे आणि त्या निर्णयाची अंमलबजावणी सुद्धा झालेली आहे.

**आसिफ शेख :-**

आम्हांला त्या कमिटीने प्रोसिडींग दाखवा ना.

**मा. महापौर :-**

आपल्यापर्यंत प्रोसिंडींग नंतर पोहचविले जाईल.

**आसिफ शेख :-**

नंतर नाही. आत्ताच्या आत्ता दाखवा. सभागृहामध्येच प्रोसिडींग आहे ना.

**मा. महापौर :-**

प्रोसिडींग पोहचविले जाईल आणि ह्या विषयासाठी सभागृहामध्ये सभा बोलावलेली नाही.

**ग्रिटा फॅरो :-**

आम्हांला प्रोसिडींग आत्ताच पाहिजे. आपण आम्हाला प्रोसिडींग दाखवा.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, त्या कमिटीवर कोण कोण होते त्यांची आम्हांला नावे सांगा. आम्हांला त्यांची नाव सुद्धा माहित नाही की, कोण सदस्य होते?

**प्रभात पाटील :-**

आता वेळ अशी आली आहे की, जर कोणीही हटत नसेल तर मी उगीचच बसलेल्या सर्व सदस्यांना विनंती करते की, प्रत्येकाने आपला बोजाबिस्तरा बांधा आणि आपणच घरी चला. सगळ्यांना विनंती करते. कारण या शहराच्या विकासासाठी कोणालाच आस्था राहिलेली नाही. प्रत्येकजण जर आपल्या प्रतिष्ठेला असा जपत राहिला व गोंजरत राहिला तर या शहराचे काय होणार आहे.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्या प्रभात पाटील (ताई) आपली जी भावना तशी भावना प्रत्येक सदस्याची आहे. येथे प्रत्येक सदस्य बसला आहे कारण या शहराच्या हितामध्ये चांगले निर्णय घ्यायचे आहे म्हणून आपण बसलो आहोत. प्रश्न असा आहे की, आपल्याकडे जो प्रकार झाला होता या सगळ्या प्रकारची जाणीव सगळ्यांना आहे. मा. महापौरांनी या विषयी निवेदन करावे अशी ही चर्चा झाली व मा. महापौरांचे निवेदन झाले तर सभागृहातून अशी मागणी करण्यात आली की, त्या सभेसाठी कोणाला नियुक्त केले होते. समिती कुठली गठीत केली होती. आतापर्यंत असा प्रकार प्रघात आहे की, आपण सर्व गटनेते, प्रमुख पदाधिकारी यांची समिती करत असतो आणि या समितीची एक मिटींग झाली होती त्या मिटींगमध्ये बरेच लोक उपस्थित होते. त्याचे प्रोसिडींग येथे आहे. सचिवांचे असे मत आहे की, या सभेला जे उपस्थित होते त्यांच्या सहीचे एक कागद तेवढे आणण्यसाठी पाठविले आहे आणि सन्मा. सभागृहातील प्रत्येक सदस्यांना विनंती करतो की, आपली या संदर्भात जी काही मत असतील किंवा जी कार्यवाही करायची असेल व या संदर्भातले लेखी पत्रव्यवहार आपल्याला जिथे जिथे करायचे आहे व जेव्हा जेव्हा चर्चा करायची आहे तेव्हा तेव्हा करुन घ्या. परंतु, आता या विषयाला आपण शांतपणे घेउन शहराच्या हितामध्ये काही महत्त्वाचे विषय आहेत त्यांना ही प्राधान्य द्यावे कारण हा प्रश्न आज येथे सुटला तर उद्या दुसरा प्रश्न निर्माण होणार आहे. हे चालणार आहे. परंतु, आपण शहराच्या हितामध्ये येथे चर्चा केली पाहिजे.

**प्रभात पाटील :-**

मी विनंती करते की, आपण त्याच खुर्चीमध्ये बसा व सभेचे कामकाज मा. उपमहापौर साहेबांना चालू द्या. माझ्यावतीने मी विनंती करते, सभागृह याला सहमत असेल असे वाटत नाही. परंतु, जर तुमच्यावर आक्षेप असेल तर कृपया मोठया मनाने आपण तिथे बसा व सभेचे कामकाज त्यांना चालवू द्या. कारण महत्त्वाचे विषय आहेत.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

सन्मा. सदस्या प्रभात पाटील ह्यांनी मांडलेल्या सुचनेला माझे अनुमोदन आहे व मा. उपमहापौर यांनी पिठासिन अधिकारी म्हणून आपण या सभेचे कामकाज चालवावे असे सभागृहाच्यावतीने विनंती करते.

**मा. उपमहापौर :-**

सभागृहाने जी भावना व्यक्त केली. परंतु, सभेचे कामकाज हे पिठासिन अधिकारी हेच चालवित असतात आणि कामकाजामध्ये मी नेहमी भाग घेत असतो व घेणार. आता फक्त एवढा विषय झाला की आपण सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**मा. महापौर :-**

सर्वस्वी सर्व माहिती सचिव कार्यालयातून, जी बैठक आयोजित केली गेली होती व या संदर्भिय विषयाची जी माहिती आहे ती सचिव कार्यालयात आहे. ती माहिती आपल्याला लवकरच मिळेल विषयाची पुर्तता झाल्यानंतर आपल्याकडे माहिती पाठवून देण्यात येईल. सचिवांनी पुढील कामकाजाला सुरुवात करावी.

**हॅरल बोर्जीस :-**

मॅडम, मी वारंवार सांगत आहे की, आम्हांला ती प्रोसिडींग पाहिजे असा अट्टाहास नाही. आम्हांला आपल्याकडून फक्त एवढेच अपेक्षित आहे की, त्या ठरावाशी मी सुद्धा संबंधित आहे. या सभागृहाच्या प्रतिष्ठेपेक्षा तुमची प्रतिष्ठा मोठी नाही व नाही माझी, त्यामुळे ह्या सभागृहामध्ये तुम्ही फक्त निवेदन करा की, माझी झालेली चुक मी मान्य करते व पुढील कामकाजाला सुरुवात करा. आमचा आक्षेप नाही. निव्वळ तुमच्या अशा प्रकारामुळे सदस्यांचा वेळ वाया जात आहे.

**मा. महापौर :-**

दि. २०/०६/०६ रोजी झालेला जो ठराव होता या ठरावामध्ये झालेला बदल, तफावत ह्याच्यामुळे ज्या अधिकारी वर्गाची बढती थांबली गेली होती व तिथे अधिकाऱ्यांची मानसिकता सुद्धा ढळली होती आणि सभागृहाने जो कमिटीला अधिकार दिला होता निर्णय घेण्याचा तो निर्णय कमिटीने एकत्र बसून डिक्लर केला आणि त्यानंतर ह्या पदनिर्मितीची ठरावाची पुर्तता `करण्यासाठी मी माझे पुर्ण वक्तव्य व झालेला जो ठराव होता जो सहीचा मॅटर होता तो पूणर्पणे मागे घेतलेला आहे आणि तसा खुलासा पत्राव्दारे आयुक्त, नगरविकास सचिव तसेच, पोलिस स्टेशन यांनासुद्धा खुलासा दिलेला आहे आणि खुलासा दिल्यानंतर लगेचच जी पदे मंजूर झाली होती त्या पदावर प्रस्तावासाठी कार्यवाही करण्यात आलेली आहे. त्या पत्रातच मी नमुद केलेले आहे की, सहीचे मॅटर आणि पदप्रस्तावाचे जे मॅटर होते ते तिथे मी संपूष्टात आणलेले आहे आणि हे सभागृहात आज मी निर्देशनात आणून दिलेले आहे. कमिटीला दिलेला जो अधिकार होता तो अधिकार त्यांनी येथे मांडलेला आहे आणि आम्ही तो पूर्ण ही केलेला आहे हे मी सभागृहाला वारंवार सांगत आहे आणि आपण ह्याच्यापुढे विषयपटलावर इतर विषय असताना ह्या विषयाला इतका अधिक वेळ देवून उगाचच अवास्वत महत्व दिलेले आहे आणि इतर महत्त्वाचे विषय विषयपटलावर असताना आपण हा सभागृहाचा वेळ वाया घालवू नये असे मी सर्व सदस्यांना विनंती करत आहे. पुढील कामकाजाला आपल्या सर्वांच्या सहकार्याची गरज आहे. आपल्या सर्वांच्या सहकार्यातूनच कामकाज होणार आहे तर आपण पुढील कामकाजाला सुरुवात करावी अशी मी सभागृहाला विनंती करत आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

मॅडम, मी आपल्याला सभागृहाच्यावतीने विनंती करतो की, आपण प्रतिष्ठेचा प्रश्न करु नका. सभागृहाचा अवमान आपण केलेला आहे. फक्त सभागृहाची आपण माफी मांगा आणि कामकाजाला सुरुवात करा. आपण स्वतः हा प्रश्न प्रतिष्ठेचा करु नका अशी माझी तुम्हांला विनंती आहे. तुमची सही जेवढी महत्त्वाची होती तेवढी माझी आणि विरोधी पक्षनेत्यांची सही महत्त्वाची होती.

**मा. महापौर :-**

पिठासिन अधिकारी म्हणून जी शहानिशा मला सहीबद्दल करायची होती ती मी केलेली आहे आणि पत्राव्दारे संबंधित सभागृहापुढे ही खुलासा केलेला आहे. आयुक्तांना पत्र दिलेले आहे. ह्याच्यामध्ये माफी मागण्याचा प्रश्न येत नाही. आपल्याला जर सभागृह चालवायचे असेल, सहकार्य करायचे असेल तर आपण नक्की करा. अन्यथा आपण इतका वेळ वाया घालविलेला आहे. आपण सभागृह सोडून बाहेर जावू शकता.

**हॅरल बोर्जीस :-**

मॅडम, आम्ही सभागृहाचा वेळ वाया घालविलेला नाही. वेळ आपण वाया घालवत आहात. आम्ही तुम्हांला वारंवार विनंती केलेली आहे आणि जे सभागृहासमोर आणायला पाहिजे होते. ती वास्तविकता आम्ही आणलेली आहे. आपण जी समिती गठीत केलेली होती त्या समितीमध्ये मी होतो आणि जे सदस्य वेगळ्या भाषेत बोलायला गेले तर जे मॅनेज केलेले आहे ते त्यावेळेला मॅनेज होत नव्हते. मी ही त्यांच्यासाठी पहिल्या मिटींगमध्ये प्रयत्न केलेले आहेत. सेकंण्ड मिटींगला मी नव्हतो.

**अशोक पाटील :-**

सभागृह नेत्यांनी मॅनेज या शब्दाचा खुलासा करावा.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, हे अत्यंत गंभीर आहे. सन्मा. सभागृह नेते हॅरल बोर्जीस हे जेव्हा सांगतात की, त्या समितीमध्ये अशी चर्चा झाली की, मॅनेज झालेले आहे आणि नॉन मॅनेज झालेले आहे. धिस इज वेरी मच सिरीयस हे अत्यंत गंभीर आहे.

**मा. उपमहापौर :-**

या विषयावरुन आपण अजून नविन चर्चा उभी करणार आहात. फक्त आपल्या माहितीसाठी सांगत आहे की, साधारणपणे अशा जेव्हा समित्या बनल्या जातात त्यामध्ये सदस्य संख्या फिक्स असते आणि त्याच्यात सदस्य म्हणून नोटीफिकेशन अशी होती की, आज दि. ९/२/२००७ रोजी सकाळी ठिक ११.०० वा. मा. महासभा ठराव क्र. ३४ दि. २०/६/०६ बाबत चौकशी करणेकामी गठीत केलेल्या समितीची बैठक स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला येथे आयोजित केली असता या बैठकीस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

साधारणपणे या समितीमध्ये सदस्य कोण, कोणाकोणाची नाव असतील ते सांगतोय. १) श्रीम. निर्मला सावळे/कांबळे - समिती अध्यक्ष तथा महापौर २) श्री. चंद्रकांत वैती ३) श्री. स्टिवन मेंडोसा ४) श्री. हॅरल बोर्जीस ५) श्री. परशुराम पाटील ६) श्री. रतन पाटील ७) श्री. रोहिदास पाटील ८) श्री. मिलन म्हात्रे ९) श्री. रविंद्र माळी १०) श्री. हंसुकूमार पांडे अशी नाव होती या लोकांची सभा झाली या सभेला एवढे लोक उपस्थित नव्हते. त्याच्यामध्ये उपस्थित असलेल्या लोकांच्या सह्या आहेत. सभा या विषयापटलावर आहे. आधीच महापौरांनी निवेदन केले त्याच्यात सांगितले की ह्याबाबत चर्चा झाली या चर्चेची सर्व डिटेल आपल्याला सचिव कार्यालयातून आजच्या सभेनंतर म्हणजे उद्यापरवा कधीही असेल तेव्हा उपलब्ध होईल.

**रोहिदास पाटील :-**

मा. उपमहापौर साहेब जेव्हा गांर्भीयाचे, नैतिकतेचा, अस्मितेचा विषय येतो तेव्हा दुसरे कोण बोलत नाही हे उपमहापौर बोलतात, महापौर बोलतात, आयुक्त ऐकतात आणि सभागृह नेते म्हणतात. सभागृह नेते असे म्हणतात की, त्या सदस्यांना मॅनेज करायचे त्यासाठी प्रयत्न केले त्याच्यानंतर काही सांगत नाही. मॅनेज केले म्हणजे काय केले आणि कोणाला केले?

**मुक्ता रांजणकर :-**

मॅनेज करताना सभागृह नेतेच होते. तेव्हा ह्यांची अस्मिता कुठे होती?

**रोहिदास पाटील :-**

ते कोणाला मॅनेज करत होते आणि त्यात यश आले की अपयश आले आणि आले तर काय रेटने तेही कळू दे ना.

**रतन पाटील :-**

कोणाकोणाला मॅनेज केले ते तरी सांगावे. कारण त्या कमिटीमध्ये आम्ही होतो. कोणाला मॅनेज केले? आम्हाला मॅनेज केले का? आमच्यावर आपण चिखल फेक करता का?

**मा. उपमहापौर :-**

सभा एकच झाली. त्यांना वाटले की दुसऱ्या सभा झाल्या का? पण सभा एकच झाली.

**रतन पाटील :-**

कोणाला मॅनेज केले ते मला सांगा आणि मॅनेज कोण झाले?

**हंसुकूमार पांडे :-**

सभागृह नेते साहब, यह खुलासा तो करो की हमलोगों को मॅनेज कैसा किया गया? हम लोगोंको क्या दिया गया? आपको भी मालूम है की, यह मिटींग मे कोई भी निर्णय नहीं हूआ।

**आसिफ शेख :-**

सन्मा. गटनेते हंसुकूमार पांडेजी ह्यांनी सांगितले आहे की त्या सभेमध्ये कोणत्याही प्रकारचा निर्णय झालेला नाही हे सत्य त्यांनी याठिकाणी उघड केलेले आहे आणि आपण म्हणता की, निर्णय झालेला आहे. गटनेते म्हणतात ते खरं आहे की, आपण म्हणता ते खरं आहे. मी मघापासून सांगतोय की, त्या कामाची प्रोसिडींग नाही आणि आता सन्मा. गटनेते बोलले की, निर्णय झालाच नाही म्हणजे हे काय चालले आहे दिशाभूल। दिशाभूल। दिशाभूल। हेच सभागृहामध्ये चालले आहे.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर महोदया, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अनेक सभा याठिकाणी झालेल्या आहेत. अनेक पदाधिकाऱ्यांनी आपआपल्या परीने वक्तव्य केलेली आहेत. परंतु, ज्याठिकाणी मिरा भाईंदर शहराचा विकास येतो तेव्हा आपण आपल्या वक्तव्याचा विचार कितपत करावा ह्या विषयाचे प्रत्येकाने आत्मपरिक्षण केले पाहिजे. तत्कालिन आपले नगराध्यक्ष प्रफुल्ल पाटीलजीने मघाशी खुलासा केला की, कायदयामध्ये कोणती तरतुद आहे. कोणत्या अधिकाऱ्यांनी आपल्या उपविधीमध्ये चर्चा केली. नैतिकता हा जो प्रकार आहे ह्याचे प्रत्येकाने आत्मपरिक्षण केले पाहिजे. सभागृहामध्ये आम्ही कोणत्या गोष्टी बोलतो आणि ते बोलल्यानंतर कोणत्या पद्धतीने नैतिकता करतो हा विषय माझ्या मताने नथींग आहे. तो विषय महत्त्वाचा नाही. परंतु, आपण आपले आत्मपरिक्षण का करायला पाहिजे तर अशापद्धतीने कामकाजाचा जो वेळ अतिशय महत्त्वाचा आहे. आपण याठिकाणी वाच्यता केली की, पदनिर्मितीच्या प्रस्तावाला कुठे वेळ लागू नये ह्याचा विचार करून आपण ज्यापद्धतीने आपले वक्तव्य चेंज केले. सन्मा. सदस्या प्रभात पाटील ह्यांनी सुद्धा या शहरामध्ये मिरा भाईंदर शहराच्या विकासाचा प्रश्न अगदी महत्त्वाचा आहे आणि या प्रश्नावर आपली प्रतिष्ठा ही महत्त्वाची नाही अशापद्धतीने सभागृहाच्या प्रत्येक सदस्यांचे म्हणणे आहे. आपण ज्या सहीबद्दल शांशकता निर्माण केली आणि ती सही आपण आपल्या वक्तव्यानुसार पदनिर्मिती ही झाली पाहिजे आपल्या अधिकाऱ्याचे प्रमोशन झाले पाहिजे अशी आपण मानसिकता दाखविली आणि अशावेळी जर ह्या सभागृहामध्ये विषयपटलावर असलेले विषय जे अतिशय महत्त्वाचे आहेत. मी आपल्याला विनंती करेन की, कोणत्याही कामासाठी आपण जर एखादी बाजू मांडली आणि कोणत्याही कामासाठी आपण जर एखादी बाजू मांडली आणि कोणत्याही कामासाठी आपण जर एखादे वक्तव्य मागे घेतले. प्रोसिडींगमध्ये आपण पिठासिन अधिकारी म्हणून काम करत आहात. आपल्या हातामध्ये या सभागृहाची संपूर्ण सुत्र आहेत त्यावेळी आपण एखादी गोष्ट सांगता व त्यावेळी एखाद्या सदस्याने आपले शब्द मागे घेतले म्हणून खाली बसतो. आपण या सदनाचे सदस्य आहात.

या सदनाने आपल्याला महापौर म्हणून भूषविलेले आहे आपण उच्च पदावर बसलेला आहात. या सभागृहाचे पिठासिन अधिकारी म्हणून आपण काम पाहत आहे. जर सन्मा. सदस्यांचे हे म्हणणे असेल त्याच्यापाठी कोणता हेतू आहे हे न बघता आपणच सरळ हेतू बघितला पाहिजे. शहराचा विकास आणि शहराचे काम हे महत्त्वाचे आहे. त्यासाठी मी आपल्याला विनंती करतो की, प्रतिष्ठा हा विषय महत्त्वाचा नाही. या सभागृहामध्ये पुर्नश्च उच्चार करतो. बऱ्याचशा गोष्टी सदस्यांनी बोलल्या आहेत तेव्हा त्यांनी ती नैतिकता कधी बघितलेली नाही. बरेचसे रिझन सदस्यांनी याठिकाणी दिले. परंतु, आम्ही त्याचा कधी विचार केला नाही. आम्ही ते सुद्धा पोटात घालून त्या माणसाला याठिकाणी बसायला देवून विचारले नाही का, राजीनामा का दिला होता. म्हणून जर आपण थोडासा मोठेपणा घेतला व जी स्त्री या शहराचा विकास नाही तर या देशाचा विकास करु शकते. अशापद्धतीने आम्ही आपल्याकडे बघतो. तर आपण कृपया आपले वक्तव्य मागे घेतलात असे बोलला तर ह्याबाबतीमध्ये काहीही फरक पडणार नाही. मी आपल्याला विनंती करतो की, ज्या सन्मा. सदस्यांचे म्हणणे असेल आणि मीदेखिल त्याच्यात सहमत आहे की, आपण कृपया जे शब्द मागच्या सभेला घेतले होते ते आपण मागे घेतले असे सांगावे. माफी हा शब्द वेगळा आहे. जसे आपण सॉरी बोलतो.

**हॅरल बोर्जीस :-**

मी आपल्याला इंटरअप करतो. दि. २०/६/०६ च्या सभेची प्रोसिडींग मान्यतेसाठी आली त्यावेळेला सन्मा. मोहन पाटील या सदनामध्ये नव्हते. ते बाहेर होते. त्यांना ह्या सदनाचे गांभीर्य नव्हते. ते बाहेर होते. त्यांना ह्या सदनाचे गांर्भीय माहित नाही की ह्या सभागृहावर त्यावेळेला काय संकट कोसळले होते. त्याची त्यांना जाण नाही.

**मोहन पाटील :-**

सभागृहनेते आपण आम्हाला त्याची जाण दिली. ह्या विषयाची जाण मला आहे आणि या विषयाची जाण आहे म्हणून मी बोलत आहे. कोणत्याही विषयाची जाण त्याठिकाणी असल्यावरच होते असे नाही माझे म्हणणे जर ह्या सभागृहामध्ये सकाळपासून एवढा वेळ गेला. आमची विनंती आम्ही आपल्याला करतो की, आपण आपले शब्द मागे घ्यावेत आणि नविन कामाला सुरुवात करा. नविन पर्वाला सुरुवात करा. शहराचा विकास होउ द्या ही विनंती धन्यवाद.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण या शहराचे प्रथम नागरिक आहात. या शहराच्या विकासासाठी जर आपल्याला एक पाउल मागे सरकता आले. आपल्या अस्मितेचा प्रश्न मागे ठेवा. आपली प्रतिष्ठा थोडीशी खाली घ्या. या शहराच्या विकासासाठी त्यांना अपेक्षित आहे ते आपण करा. परंतु, आपले विषय चालवा अशी मी पुन्हा एकदा विनंती करते.

**प्रफुल्ल पाटील :-**

सदर समितीचे कामकाज हे विधीवत चालते. सदर समितीच्या जेव्हा बैठका होतात तेव्हा त्या विषयावर चर्चा होत असते. त्याच्यात मॅनेज हा विषय कुठे होता का? सदस्यांना मॅनेज झाले असेल तर आम्हाला तेही कळू द्या.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. प्रफुल्ल पाटील साहेब बोलायच्या आधी जेव्हा सन्मा. सदस्य मोहन पाटील बोलत होते. तर आपण सभागृहामध्ये सकाळपासून बघितले असेल मी ज्या ज्या गोष्टी सभागृहासमोर मांडल्या. माझ्या तोंडून एकही चुकीचा शब्द निघालेला नाही. अनावधानाने मॅनेज हा शब्द निघाला.

**रोहिदास पाटील :-**

त्याची माफी मागा. आपण चांगला पायंडा पाडला.

**हॅरल बोर्जीस :-**

मॅनेज या शब्दाचा अर्थ आपण जसा घ्याल त्यापद्धतीने होईल.

**रतन पाटील :-**

सभागृह नेते तो शब्द मागे घ्या.

**हॅरल बोर्जीस :-**

मी मॅनेज हा शब्द मागे घेतो. माझ्या तोंडून अनावधानाने मॅनेज हा शब्द निघाला. माझ्या बोलण्याचे तात्पर्य एवढेच होते की, ज्या पहिल्या बैठकीला सन्मा. पिठासिन अधिकाऱ्यांबरोबर मी त्यांच्या दालनामध्ये बैठकीसाठी होतो. त्यावेळेला सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे नव्हते. सन्मा. सदस्य रतन पाटील, रोहिदास पाटील होते आणि मी मॅडमच्यावतीने त्यांना कन्व्हेन्स करण्याचा प्रयत्न केला आणि अगदी शेवटच्या थरापर्यंत जावून केला. परंतु, त्यावेळेला पहिल्या समितीमध्ये आपल्याला ते शक्य झाले नाही. माझे बोलण्याचे तात्पर्य ते होते की, मी मॅनेज त्यापद्धतीने करण्याचा प्रयत्न केला. जर कोणाचा गैरसमज झाला आहे व पत्रकार बंधू तिथे बसलेले आहेत. प्रेक्षकगृहात काही मंडळी आहेत. तर माझे बोलण्याचे तात्पर्य त्या शब्दाचा अर्थ त्यापद्धतीचे नव्हते. मी माझ्यापरिने सभागृह नेता या नात्याने पिठासिन अधिकाऱ्यांने त्यावेळेला मला जे निर्देश दिले त्यापद्धतीने मी सन्मा. रोहिदासजी पाटील आणि रतनजी पाटील जरी ते विरोधी पक्षाचे सदस्य

असलेतरी सुद्धा या सन्मानीय सभागृहाचे घटक आहेत. मी त्यापद्धतीने त्यांना कन्व्हेन्स करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

मॅनेज हा शब्द त्यांनी मागे घेतला असे सभागृह नेते म्हणतात तसे मॅडम तुम्हीही मागे घ्या. संपलं. माफी मागण्याचा येथे काही प्रश्न येत नाही. जे झालं ते सगळं मागे घेउन टाका आणि आता आपण पुढे जावू या.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, पावणेबारा से पावणेचार तक सभागृह मे यही नाटक चल रहा है और नाटक किसका है तो दोन्हो सत्तापक्ष का नाटक है। आप महापौर तथा पिठासिन अधिकारी है। आपने उस समय क्या किया उसकी कमिटी नियुक्त हूई बादमे मिटींग हूई, नही हूई। यह भी इधर वाद का विषय है। कोई सदस्य बोलते है की, नही हूई और कोई बोलते है की, मिटींग हो गई है। सब नक्की हो गया है। आपने बोला। मैंने सब लिखकर दे दिया नक्की हो गया लेकिन यहाँपर कुछ भी नक्की हुआ है। शहर का हित चाहनेवाले नगरसेवक इस सदन मे मौजूद है। वह लोग क्या करेंगे। हम सदन में इसलिए आए है की, आज जो नालेसफाई और पाणी का महत्त्वपूर्ण विषय है वह यहाँपर होना चाहिए। अगर आप लोगोंकी इच्छा न हो तो हमलोग चले जाएगे। आप अपना काम करीए। यह कोई कोई नही है। सुबह से यहाँपर कोर्ट की भाषा चल रही है। यहाँ कोई वकील नही है। मा. महापौर मॅडम, अगर आपको सभा चलाना है तो उसप्रकार चलाईए और अगर नही चलाना है तो सिर्फ टाईम वेस्ट करनेमें कुछ मतलब नही है।

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील ही त्याच्यामध्ये सदस्य होते. ते पण मॅनेज झाले का? कारण ते सकाळी फार जोरात बोलले.

**रतन पाटील :-**

साहेब, मी त्याचा खुलासा केला.

**प्रफुल्ल पाटील :-**

आपण स्पष्ट सांगा. तुम्ही स्पष्ट स्वभावाची माणसे आहात. तुमच्याकडून असे लपवणे आम्हांला जमत नाही. तुम्ही मॅनेजमध्ये आलात का हे आम्हांला सांगा. कारण सकाळी तुम्ही एवढया जोरात बोललात एवढया तातडीने बोललात की असे व्हायला पाहिजे तसे व्हायला पाहिजे ह्याचा अर्थ त्या सभेमध्ये तुम्ही मॅनेज झाला होता का? आणि झाला होता तर कसे झाला होता? पुडा, खोका, पेटी की आणखिन काय असे आश्वासन वगैरे की तुमची काम होतील.

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्य मी याचा खुलासा केलेला आहे.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्यांनी ऐकून घ्या. सभागृहामध्ये किंवा बाहेर बरीच पत्रकार मंडळी आहेत, प्रतिष्ठीत नागरिक ही आहेत. उद्या ह्या कमिटीतून नेमके काय मॅनेज झाले हा चर्चेचा विषय होण्याच्या आत एक सत्य गोष्ट सांगतो की, ह्या ११ लोकांची समिती गठीत केलेली आहे तर आपण हे दरवेळेला करत असतो. त्याची एकमत मिटींग झाली होती आणि त्या मिटींगमध्ये त्यावेळेला सत्ताधाऱ्यांच्या बाजूने सन्मा. हॅरल बोर्जीस आणि त्यांच्या सहकार्याने हा विषय सहजपणे आपल्याला कशाप्रकारे हा प्रश्न मिटवता येईल याबाजूने प्रयत्न केले होते. आज हे वायसा वरसा आहे. आज तो विरोधात झालेला आहे. ह्यात दुसरी कुठलीही सभा झालेली नाही. आणि काहीच मॅनेज झाले नाही त्यांच्याकडून अनावधानाने निघालेले शब्दाची त्यांनी माघार घेतलेली आहे. मा. महापौर मॅडमना आपल्या सभागृहातून विनंती करण्यात आली की, आपण थोडासा एक पाय मागे घेउन मी सांगतो की हा विषय संपला आहे असे घोषित करुन कामकाजाला सुरुवात करावी आणि इतर सदस्यांनी चर्चेला दुसरे विषय घेउ नये. सभेचे कामकाज सुरु होउ द्या.

**हंसुकूमार पांडे :-**

मा. महापौर मॅडम, आपने जो नगरसचिव को लिखकर दिया की, अपनी सिग्नेचर समझने मे भूल हो गयी है तो वही दो शब्द आप इधर बोल देंगे तो सभा चालू हो सकती है। माफी मत मांगो, पर कमसे कम यह तो बोलो की, मेरी गलती हो गई है। यह बोलकर मॅटर क्लोज करो। सुबहसे यही सुनकर हमलोग कंटाल गए है।

(सभागृहात गोंधळ )

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, सकाळपासून जो विषय चालू आहे. त्याला कुठेतरी संपवा कारण आम्ही सकाळपासून हाच विचार करत आहोत की, आता आरोग्याचा विषय येईल. नालेसफाईचा विषय येईल, पाण्याचा विषय येईल. याबाबत आम्ही लोकांना उत्तर काय द्यायचे? या सगळ्या सहीचे उत्तर लोकांना द्यायचे का? हे कुठेतरी बंद करा. माफी मागा नाहीतर हे बंद करा. किंवा आम्हाला असे सांगा की, आजची सभा संपली. पुढच्या वेळी ही सभा घेण्यात येइल.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे ह्या सभागृहाचा कोणताही प्रोटोकल पाळत जात नाही.महत्त्वाचा मुद्दा तो आहे. डायसवर असू दे किंवा सभागृहामध्ये खाली बसणारा नगरसेवक असू दे. आपल्या सभागृहाची जो नितीनियम आहे. ते कोणीही पाळत नाही. सकाळपासून आपण ज्या विषयावर चर्चा करतो त्याचे गांर्भीय आपण लक्षात घेतलेले नाही. आपण ह्या विषयासाठी कमिटी निर्माण केली आणि त्याची दोन सभा झाली. त्यानंतर आमचे गटनेता हंसुकूमार पांडे बोलले की मी त्या सभेमध्ये गेलो होतो आणि त्याच्यावर काही निर्णय लागला नाही. त्यानंतर मा. उपमहापौर चंद्रकांत वैती ह्यांनी वक्तव्य केले की, ह्या मॅटरची फक्त एकच सभा झालेली आहे म्हणजे या विषयाचे गांर्भीय बघायला पाहिजे की, सदरचा विषय जो फक्त पदोन्नती, पदनिर्मितीसाठी संख्या वाढवली ते तुम्ही बोलले होते. तेवढे बोलले असते तर हा एवढा गदारोळ झाला नसता म्हणून मी हा विषय पेन्डींग ठेवते. कारण ह्याच्यामध्ये जो आकडा दिलेला आहे. त्याच्यामध्ये फेरबदल केलेला आहे म्हणून मी हा विषय पेन्डींग ठेवते व बाकीच्या प्रोसिडींगच्या मान्यता देते असा निर्णय जर तुम्ही जाहिर केला असता तर हा गदारोळ झालाच नसता. पण आपण डायरेक्ट ऐलिगेशन केले की, सदर ठरावावर जी माझी सही आहे ती मी केलेली नाही तेव्हा मी उठून विचारले होते की, सचिवांनी परस्पर कोणाची सही घेतली होती. सचिवांवर सर्व आले तेव्हा वायटिंगची गोष्ट निघाली व वायटिंग कोणी लावली तर सचिवांनी सांगितले की मी लावली नाही मग त्या ठरावावर वायटिंग कोणी लावली हे सर्व महत्त्वाचे मुद्दे आहेत. आपण थट्टा, मस्करी, मजाक, मस्ती करायला येथे जमलो नाही. आपण सकाळपासून विकासाचा बांगा फुकतोय. परंतु, आपण जेव्हा श्री. घंगाळे ह्यांचा ठराव पास केला तेव्हा आपण कुठली नैतिकतेची आठवण ठेवली. किती घनकचरा प्रकल्पावर आपण ठराव केले त्याच्यावर आपण काय केले. केवढी नैतिकताची जबाबदारी आपण पाळली किती अनधिकृत बांधकाम तोडण्याचे ठराव केले आणि ठराव केले आणि त्याच्यामध्ये ही आपण फेल झालो म्हणजे आपण किती नैतिकता गाजवली व प्रशासन त्याच्यामध्ये कुठे सक्षम राहिले म्हणून हा महत्त्वाचा मुद्दा आहे. आपण जे काल केलले आहे ते चुकीचे केलेले आहे. हस्ताक्षराबद्दल आपण जो आक्षेप ठेवला होता की, हे माझे हस्ताक्षर नाही तो मुद्दा महत्त्वाचा आहे किती पदनिर्मिती झाली आणि किती आकडयांचा फेरफार झाला ते महत्त्वाचे नाही. ती सिग्नेचर तुम्ही केली नाही असे आपण मा. महासभेमध्ये बोललात एकच पिठासिन अधिकारी या नात्याने आणि नंतर ह्याच सभागृहाला, नगरविकास खात्याला, आयुक्तांना पोलिस स्टेशनला पत्र देतात की, ही सही माझी आहे. तुम्ही हे जाणूनबूजून चूक केलेली नाही तर गुन्हा केलेला आहे. आणि त्या गुन्ह्याबद्दल तुम्हाला बोलावे लागेल.

**प्रफुल्ल पाटील :-**

वायटिंग कोणी लावली त्याचा आपण आम्हांला खुलासा द्या. सहीवर वायटिंग लावणे हा त्याच्यापेक्षा मोठा गुन्हा आहे? एखाद्याने सही केली आणि मग त्याच्यावर दुसऱ्या कोणीतरी वायटिंग लावली. हा मोठा गुन्हा आहे ह्याची कुठेतरी चौकशी झाली पाहिजे आणि अशी वायटिंग लावणाऱ्यांनी पहिल्यांदा सभागृहाची माफी मागायला पाहिजे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

म्हणजे, सभागृहामध्ये असे ठराव होतील आणि पुन्हा पुन्हा आपण वायटिंग लावाल, सह्या बदलाल, पुन्हा पुन्हा सांगाल की, सह्या आम्ही केल्याच नाही ही सही माझीच होती सभागृहामध्ये हे जे काही ठरविले जातात व इतके नागरिक आपल्यावर विश्वास ठेवून येथे पाठवतात. प्रतिनिधी पाठवतात, सभापती पाठवतात, कमिटी मेंबर झाले, महापौर झाले, उपमहापौर झाले आणि नंतर जर अशाप्रकारचे होत असेल आणि अशाप्रकारचे होत राहिले तर त्याच्यावर काहीतरी निर्णय द्यायला पाहिजे का नाही? जर महापौरांनी चुकी केली असेल तर त्यांनी मान्य करावे की माझ्याकडून चुक झालेली आहे. त्यात काय एवढा वाद, अस्मिता, नैतिकता ह्या गोष्टी आणण्याचे कारण काय? आपण जबाबदार व्यक्ती आहात. आपण तो निर्णय घ्यायला पाहिजे की, ही माझी चुकी झाली आणि मला ते मान्य आहे. चुकी झालेली आहे आणि मी ते मान्य केलेली आहे. आपण त्या खुर्चीवर आहात म्हणून आम्ही सभागृहाच्यावतीने तुम्हाला येथे रिक्वेस्ट करत आहोत व आमचा वेळ वाया जात आहे म्हणून नगरसेवकांची सर्वांची कळकळ आहे.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, ४.०० वा. कितीतरीच मिनिटे बाकी आहेत म्हणजे आपली ११.३० वा. सुरु झालेली सभा ही संध्याकाळी ४.०० वा. संपेल. आपण दिलेल्या प्रोसिडींगप्रमाणे आणि ४.०० वा. दुसरी सभा चालू होईल. आतापर्यंत अतिशय दोन महत्वाचे विषय ह्याच्यामध्ये होते. नैतिकता, अस्मिता, वायटिंग, ब्लँकिंग हे सर्व बाजूला राहू दे. मॅनेज म्हणजे ह्या मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये काय चालते ह्याचा जर आपण पूर्ण अभ्यास केला किंवा एखाद्या अॅन्टी करप्शन ब्युरोकडून तपासणी करायला लावली तर बरेच काही निष्पन्न होईल म्हणजे पाच वर्षापूर्वी आलेला नगरसेवक त्याच्याकडे सायकल नव्हती. आणि आज ते गाडया कशा फिरवतात तर मॅनेज ज्याच्याकडे काही नव्हते त्याच्याकडे टँकर, डम्पर आले तर मॅनेज. ज्याच्याकडे छोटंसं घरं होते, चाळीत राहत होते ते फ्लॅटमध्ये राहतात तर मॅनेज ह्या सगळ्या गोष्टी ज्या मॅनेजच्या आहात त्या शहरातील सर्व लोकांना माहित आहे. त्याचे उत्तर तुम्हाला येणाऱ्या तीन महिन्यात मिळणार आहे. परंतु, राहिलेल्या तीन महिन्यामध्ये शहराची जी महत्त्वाची काम आहेत ती आपण करायची का नाही हे

ठरविण्याची वेळ आता आलेली आहे. तुमच्या ह्या आपसातल्या भानगडीमुळे सभागृहातील बहूसंख्य नगरसेवकांना काही इंटरेस्ट नाही. पहिल्यांदा तुम्हाला काय हवे होते हेच तुम्हाला कळलेले नाही. तुम्हाला नक्की काय पाहिजे होते, तुम्हाला महापौरांचा राजीनामा पाहिजे होता की, तुम्हाला पिठासिन अधिकारी घालवायचे होते की तुम्हाला माफी मागायची होती ह्याचा कुठेही उल्लेख नाही. शेवटी माफीपर्यंत आलेले आहे. महापौर पदी जे पिठासिन अधिकारी बसतात नियमाप्रमाणे, बहूसंख्य सदस्य या सभागृहातले ते पिठासिन अधिकारी निवडतात. टेक्निकली जे महापौर आहेत ते पिठासिन अधिकारी होतात. महापौर असतील तर उपमहापौर राहतील, उपमहापौर नसतील तर या सभागृहातला कुठलाही सदस्य हे सभागृह नेत्यांना ही माहित आहे. नविन नाही ते हुशार आहेत सांगायचा मुद्दा ४.०० वाजलेले आहेत आणि ही मिटींग आता संपायला आलेली आहे. या शहरामध्ये कुठेही रुग्णालय नाही आणि तो विषय अतिशय महत्त्वाचा होता. हॉस्पिटलचा विषय भरपूर महत्त्वाचा होता आणि नालेसफाईचा विषयही, परंतु, नको त्या विषयावर नको तेवढे प्रचंड वादळ निर्माण केले आणि सभागृहातील उपस्थित प्रतिष्ठित नगरसेवकांचा वेळ फुकट घालविलेला आहे. आमच्याकडे एवढा वेळ नाही की, येथे येउन नुसते बसा, ऐकत राहा, मागे घ्या. माफी घ्या, काही करा, हरकत नाही. महापौर तुम्हीच निवडले होते आम्ही निवडले नव्हते. महापौर तुमचेच होते दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी आहे की, महापौरांना ५२ मत मिळालेली आहेत म्हणजे तुम्ही एकाने निर्णय घेउ शकत नाही की, महापौरांनी जा हे आपण लक्षात घ्या. प्रश्न असा आहे की, ह्या सभागृहामध्ये असलेला विषय महत्त्वाचा आहे की नाही. ह्याच्यानंतर पाण्याचा ३५ एम.एल.डी. चा विषय आहे. या शहरातील लोक तहानलेली आहेत. काय करायचे आहे? आपण फक्त माफी मागण्यासाठी वेळ घालवणार आहात का? आज झालेले विषय संपले आणि सभा तहकूब झाली व रद्द झाली तर पुढच्या एक महिन्यानंतर लावणार आहात का? ह्या सभागृहातील लोकांना पाणी मिळू नये का? ह्या महापालिकेतील गटारे स्वच्छ होउ नयेत का? नक्की आपल्याला काय करायचे आहे? आम्हाला महापौरांच्या त्या गोष्टीमध्ये इंटरेस्ट नाही. पिठासिन अधिकारी आहेत आणि सभा चालली पाहिजे व सर्व विषय झाले पाहिजे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

जर पाच मिनिटामध्ये सभा सुरु झाली नाही तर आम्ही सर्वजण निघून जावू.

**जयंत पाटील :-**

आपण जर सभा चालू केली नाही तर आम्ही सभात्याग करणार आहोत. आम्हांला या विषयामध्ये इंटरेस्ट आहे आणि आम्ही कुठे मॅनेज झालेलो नाही हे महत्त्वाचे आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सभागृहाने केलेली विनंती तसेच, मा. महासभेमध्ये दि. २०/६/०६ रोजी झालेला ठराव. कमिटी गठीत करुन कमिटीमध्ये निर्णय घेण्यात आला. महापौर झाल्यानंतर दोन वर्षामध्ये बरीच विकास कामे आपण पार पाडलेली आहेत यात महत्त्वाचा विषय म्हणजे आजच्या विषय पटलावर असलेला ३० एम.एल.डी. पाण्याची एन.ओ.सी. सुद्धा आपल्याला मिळालेली आहे. हा विषय ही विषयपटलावर घेतलेला आहे. विकास कामे करत असताना विकासाच्या कामामध्ये कुठल्याही प्रकारची बाधा येउ नये म्हणून आपण दोन पावले पुढे जाण्यासाठी सतत सरसावत असलो परंतु कुठल्या अडचणी आल्या तर त्या अडचणी दूर करण्यासाठी आपण दोन पावले मागेसुद्धा येतो आणि ह्याचप्रकारे दि. २०/६/०६ रोजीचा जो पदनिर्मितीचा ठराव झाला त्यामध्ये ठरावावर माझी सही नाही असे मी जेव्हा जाहिर केले होते आणि मला ठरावाची जी प्रत दाखविण्यात आली त्याच्यात खरोखर तफावत होती. कारण त्या ठरावावर सही केली होती ते मी हॉस्पिटलमध्ये ॲडमिट असताना त्या ठरावावर सही केली गेली होती त्यामुळे त्यासहिमध्ये तफावत होती आणि जेव्हा ठराव माझ्यासमोर आणला गेला तेव्हा त्याच्यातला फरक दिसताच मी त्यावेळेस नकार दिला होता की, ही माझी सही दिसून येत नाही व शहानिशा पटल्यावर मी आयुक्तांना तसे निवेदन देवून पत्राव्दारे कळविले सुद्धा आहे की, ही सही माझी आहे आणि ह्याच्यामध्ये सभागृहाचा किंवा सदस्यांची दिशाभूल करण्याचा कुठल्याही प्रकारचा प्रश्न येत नाही. पत्रव्यवहार करत असताना त्याच्यामध्ये मी सरळ लिहिलेले आहे की, ह्या विषयाची पूर्ण शहानिशा करुन मी घेतलेला जो आक्षेप होता तो मागे घेतलेला आहे आणि पदनिर्मितीचा जो प्रस्ताव आहे, पदनिर्मिती करत असताना शहराचा विकास करत असताना विकासाला कुठल्याही प्रकारे बाधा येउ नये म्हणून हा पदनिर्मितीचा प्रस्ताव करणे गरजेचे होते. कामकाजाचा वाढीव भार पूर्ण करण्यासाठी ह्या पदांची मंजूरी होउन ही पदे भरणे गरजेचे होते. त्यामुळे आपण सर्वांनी हा ठराव केला होता. सभागृहाची किंवा कुठल्याही सदस्यांची दिशाभूल करण्याची पिठासिन अधिकारी म्हणून मला कुठल्याही प्रकारचे वक्तव्य किंवा कुठल्याही प्रकारचा आक्षेप येईल अशी वर्तवणूक मी केलेली नाही आणि मी पत्राव्दारे हे पूर्ण पणे मागे घेतलेले आहे. मी सभागृहाच्या निर्दशनास आणून देते आणि फक्त सभागृह नेता ह्यांनी विनंती केल्यामुळे त्यांच्या विनंतीला मान देवून मी हे करत नाही तर सभागृहात सगळ्या सदस्यांच्यावतीने मी माझे शब्द मागे घेत आहे.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आजच्या सभागृहातील दोन विषय अतिशय महत्त्वाचे आहेत ते आपण प्राधान्याने घ्या. दोन नंबर आणि तीन नंबर बाकीचे विषय ठेवून सभा तहकूब करुन आपली जी ४.०० ची सभा आहे त्यात पाण्याचा जो विषय आहे तो आपण घ्यावा.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील साहेबांनी जो मुद्दा उपस्थित केला. विषयपटलावर पहिला व दुसरा विषय सभेत पूर्ण करावे.

**नगरसचिव :-**

इविवृत्तांताचा विषय पहिला घ्यावा लागेल.

**हॅरल बोर्जीस :-**

पहिले प्रोसिडींग आणि दुसरा विषय असे हे दोन विषय झाल्यानंतर ही सभा तहकूब करून पुढील जे ३५ एम.एल.डी. पाण्याविषयी जी खास सभा घ्यायची आहे ती घ्यावी.

**प्रेमनाथ पाटील :-**

नालेसफाई, पाणी आणि हॉस्पिटल असे जे महत्त्वाचे विषय आहे ते घ्या आणि बाकीच्या विषयाला सभा तहकूब करा.

**नगरसचिव :-**

इतिवृत्तांताला मंजूरी द्या.

(सन्मा. सभागृह नेते श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. ०१ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**अशोक पाटील :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**रोहित सुवर्णा :-**

ठरावामध्ये ज्या दुरुस्त्या आहेत त्या पानवाईज घ्या.

**मा. उपमहापौर :-**

ज्या दुरुस्त्या असतील त्या सचिवांना लेखी द्या.

**रोहित सुवर्णा :-**

मॅडम, आपण तसे रुलिंग द्या.

**मा. महापौर :-**

सचिवांनी इतिवृत्तांतामध्ये सभागृहाने आणि सदस्यांनी ज्या सुचना किंवा दुरुस्त्या असतील त्या ह्या इतिवृत्तांताच्या ठरावामध्ये मंजूर करुन घ्यावे.

**प्रकरण क्र. ०१ :-**

दि. ०६/१२/२००६ व दि. २१/१२/२००६ (दि. ०६/१२/२००६ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ०१ :-**

दि. ०६/१२/२००६ व दि. २१/१२/२००६ (दि. ०६/१२/२००६ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. अशोक पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**रोहिदास पाटील :-**

प्रकरण क्र. २ ला सुरुवात होण्यापूर्वी मी सभागृहाचे येथे लक्ष वेधतो की मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. आयुक्त हेही होते. एस.ई.झेड. ६२ बद्दल निवेदन करण्याचे, विषय घेण्याचे स्पष्ट आश्वासन दिले होते. हा विषय महत्त्वाचा नाही का? मुर्धा येथील पलिकडील शेतकऱ्यांच्या मिठागराचा, मच्छिमारांचा, राहणाऱ्या लोकांचा हा विषय महत्त्वाचा नाही का?

**जयंत पाटील :-**

त्या संबंधी पत्र आलेले आहे.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील (काका) या विषयात आपण जो पत्रव्यवहार एसईझेड६२ संदर्भात केला होता तर आपल्याला त्याचे उत्तर आले नाही आणि या विषयावर आपल्याला पुढची सभा लावता येईल.

**रोहिदास पाटील :-**

आता तीनच विषय घ्यायचे आहे ना.

**मा. उपमहापौर :-**

आपण ४.०० ची खास सभा लावली आहे ना. आपण एसईझेड६२ बद्दल नंतर चर्चा करा ना. त्याच्यावर पाण्याच्या सभेनंतर चर्चा करा.

**रोहिदास पाटील :-**

मा. उपमहापौर साहेब, मी मा.महापौरांना, सचिवांना पत्र दिले होते. मा. उपमहापौर साहेब, तुम्ही चालत येत नाही. पूर्वेचा माणूस पश्चिमेला येणं, पश्चिमेचा माणूस पूर्वेला जाणं हे किती अडचणीचे झाले आहे. स्थायी समितीने तुम्हाला ओव्हर ब्रिजचा ठराव करुन दिला. त्यानंतर आम्ही विनंती केली की, हा विषय तुम्ही मा. महासभेमध्ये घ्या. आज तर ते मिळाले असते तर त्याचा पाठपुरावा करत राहिलो असतो, आज तोही ठराव तुम्ही घेतला नाही.

**मा. उपमहापौर :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मनोरंजन व पर्यटन विकास क्षेत्र म्हणून जाहिर झालेल्या क्षेत्राबाबत दि. १६ एप्रिल २००७ रोजी होणाऱ्या मा. महासभेत माहिती देण्याबाबत. त्यांनी आपल्याला पत्र दिलेले ते पत्र आजच आलेले आहे व सर्वांना ते सरक्युलेट केलेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. उपमहापौर साहेब, आपण बनवाबनवी करु नका.

**मा. उपमहापौर :-**

बनवाबनवी नाही.

**रोहिदास पाटील :-**

मी मुद्दयाचेच आहे.

**रोहिदास पाटील :-**

ही सभा कोणत्या तारखेची होती त्या दिवसापासून प्रशासनाने किंवा तुम्ही...

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य आपण या विषयावर नंतर चर्चा करु या.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. २ चे वाचन केले.)

(सन्मा. सभागृह नेते श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. ०२ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**रिटा शाह :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण हा जो ठराव मंजूर केला येथे दोन सभागृह आहे. १) मा. महासभेचे सभागृह २) स्थायी समितीचे सभागृह आणि स्थायी समितीने दोन महिन्यापूर्वी प्रशासनाला मंजूर करुन अधिकार दिले होते की, अत्यंत तातडीने अतिमहत्त्वाचे नाले त्यांचे खोदकाम व्हायला पाहिजे. आज त्याचे काम झिरो आहे. हा काय प्रकार आहे. ह्याच्यावर कार्यवाही कोण करणार आहेत. आम्ही वेस्टन हॉटेलचा नाला सांगितलेला तिथे काही सुरुवात झालेली नाही. ज्याच्यावरून फार मोठे वादंग गाजले होते. अशा सहा नाल्यांसाठी आम्ही स्थायी समितीमध्ये परवानगी दिली होती. स्थायी समितीच्या एकाही सदस्याने त्याच्यावर चर्चा केली नाही. हे अति तातडीचे काम आहे. आम्ही तुम्हांला अधिकार देतो. पण कोणतीही कार्यवाही झाली नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मला ह्याच्यामध्ये एक सुचना द्यायची आहे. प्रभाग क्र. २४ आणि ७ ह्याच्यामधून शाळेबद्दल बिल्डिंग क्र. १ पासून ते नवघरच्या पोलिस चौकीपर्यंत जो मुख्य नाला आहे तो जसा पाहिजे तसा स्वच्छ होत नाही. फक्त वर वरचा गाळ काढला जातो आणि त्यामुळे बी.पी.रोडपासून तलाव रोडपर्यंत पूर्ण पाण्याने भरले जाते. हा मुख्य नाला असल्यामुळे जास्तीत जास्त लक्ष द्यावे ही विनंती.

**अनंत पाटील :-**

मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, नालेसफाई संदर्भामध्ये आपण जो प्रशासकीय निर्णय घेतलेला आहे त्यात कामगार भरतीचा विषय काय आहे?

**प्रभात पाटील :-**

सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटील ह्यांनी जो मुद्दा उपस्थित केला, तर जो नाला इंडस्ट्रीमधून निघून पुढे जातो, नवघर नाक्यावर हनुमान मंदिर आहे त्या हनुमान मंदिरच्या पाठीमागे...

**अनंत पाटील :-**

त्या कामगारांचा खुलासा करावा...

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य एकेकाने बोला.

**प्रभात पाटील :-**

हनुमान मंदिराच्या पाठीमागे गणपती बनवण्याचा कारखाना आहे. बरेच वर्षापासून तिथे स्ट्रक्चर असल्यामुळे खाली सफाई होत नाही. वर्षानुवर्षे तिथे पोकलन किंवा कोणतीच मशिनरी जात नाही. त्यामुळे ढीग झालेला जसा डोंगर त्या स्ट्रक्चर खाली साचलेला आहे. पाणी पुढे पास होत नाही जे खाडीमध्ये जायला पाहिजे. त्याच्यामुळे माझा प्रभाग ७ आणि २४ हे कायम बुडलेले असतात. तिथे जर तुमचे पोकलन आणि कोणतीही मशिनरी घुसत नसेल तर मॅन पॉवर वापरा पण ह्या पावसाळ्यामध्ये ते साफ झाले पाहिजे.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, केबिन रोडचा विषय चालू होता व जे कलवट काढणार होते त्या कलवटबद्दल काय झाले त्याचा निर्णय अजून आलेला नाही आणि पावसाच्या वेळेत हा केबिनरोड पूर्ण भरून जाईल ह्याची तुम्हाला मी खात्री देतो आणि तुम्हाला सांगितल्यापासून त्याच्यावर कोणताही निर्णय झालेला नाही आणि आम्हाला अजून कोणी कळवलेले नाही की, रेल्वेखालून कलवट होणार आहे का नाही? पावसामध्ये पूर्ण भरून जाईल. वेळोवेळी आम्ही तक्रार करत आहोत आणि वेळोवेळी पत्र दिलेले आहे. तरीसुद्धा त्याच्यावर अजून कुठली कार्यवाही झाली आणि पुढे काय कार्यवाही आहे त्याची आम्हांला कल्पना दिलेली नाही आणि कृपया ती कल्पना अधिकाऱ्यांनी आम्हांला द्यावी.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे. सगळ्यात जास्त पाणी भरणारा प्रभाग असेल २२, २३ आणि २५ या प्रभागामध्ये पावसाळ्यामध्ये एखाद्या तलावाचे स्वरूप येते. २२, २३ या प्रभागातील पाणी भाईंदर पूर्व विभागातून भाईंदर पश्चिमेमध्ये जातो तिथे आपल्या पाण्याची पाईप लाईन आलेली नाही. मागच्या वेळेला ती पाईप लाईन बदली करताना छोटे असे ब्लॉक टाकले. पहिले जे मोठे होते त्याच्यामध्ये आणखिन अशी छोटी साईज झाली म्हणून तिन्ही प्रभागातून भाईंदर पूर्वेमधून निघणारा पाणी अतिशय कमी प्रमाणातून निघणार आणि ह्यावेळेला तुडुंब भरले जाणार. स्थायी समितीमध्ये वेळोवेळी विचारणा केली की, आपल्याला चार कलवट रेल्वेखाली बांधायचे आहे. त्याबद्दल त्याची पुर्तता कुठपर्यंत आली हे प्रशासनाने कळवावे की, ह्या पावसाळ्याच्या आधी कलवट होतील आणि भाईंदर पूर्व विभागाचा पाणी त्याच्यामधून सुरळीत बाहेर निघेल. कुठल्याही पद्धतीने पूर परिस्थिती होणार नाही अशापद्धतीने प्रशासनाने निवेदन करावे की, हे कलवट आता होतील का? आणि जर कलवट झाले नाही तर जो अरुंद असा नाला तिथे लावलेला आहे त्यामुळे ते पाणी ब्लॉक होउन संपूर्ण मिरा भाईंदर हे जलमय होणार आहे यावर प्रशासनाने खुलासा करायचा आहे. कलवट हे पावसाळ्याअगोदर होणार आहेत की नाही?

**तुळशीदास म्हात्रे :-**

आयुक्त साहेब, झंकार कंपनीच्या बाजूला सन्मा. सदस्य आसिफ पटेल ह्यांच्या घराच्या बाजूला जो नाला आहे व तेथून जी पाईपलाईन गेलेली आहे ते कधी हटवणार आहे?

**मा. उपमहापौर :-**

सर्व सभागृहाच्या माहितीसाठी सभागृहामध्ये आपल्याला सगळ्या शहराचे महत्त्वाचे नाले साफ करायचे आहेत आणि ह्या विषयामध्ये ज्यांना ज्यांना थोडक्यात महत्त्वाच्या विषयावर बोलून घ्यायचे आणि ह्या व्यतिरिक्त आपल्याकडून जास्त विस्ताराने बोलायचे असेल तर तसे आपण लेखी कळविले तरी आपण ते ह्याच्यामध्ये मान्य करुन घेउ.

**रतन पाटील :-**

खुलासा पाहिजे. चार कलवटच्या संदर्भात प्रशासनाने सांगावे की, कुठंपर्यंत काम आलेले आहे? रेल्वेखाली चार कलवट बनवायचे आहे. प्रशासनाने सांगावे. आम्ही खाली बसतो. ते चार कलवट आता ह्या पावसाळ्या अगोदर बनणार आहे का?

**गजानन भोईर :-**

मा. महापौर मॅडम, आत्ता नालेसफाईचा विषय चालला आहे. नालेसफाई करण्याच्या अगोदर समुद्रापासून ज्या खाडया उघाडीपर्यंत येतात त्या अजून स्वच्छ केलेल्या नाही. तर नालेसफाई करुन काही उपयोग नाही. कारण समुद्राकडे पाणी नेणारा मार्ग तुम्ही स्वच्छ करत नाही तर नालेसफाई करुन काही साध्य होणार नाही. सगळ्यात पहिल्या त्या खाडया साफ करुन घ्या. तरच हे पाणी समुद्रामागे मार्गे जाईल.

**हंसुकूमार पांडे :-**

मा. महापौर मॅडम, जो गोल्डन नेस्ट के बाजू से जो बडा नाला सिग्नल के निकाला गया है। वह खाडी का काम अधूरा ही है। कमसे कम एक से देड साल हो गया है वह काम चल रहा है। उसके वजह से रोड की परिस्थिती बहूत खराब हो गई है। वह काम जल्द से जल्द पुरा करनेकी कोशिश की जाए और हमारे प्रभाग क्र. ८ मे से तीन बडे नाले जाते है १) आर.एम.ए. गटार २) चिंतामणी गटर ३) किरण नगर नाला वह तिन्हों नालो पर साफसफाई अच्छी तरह से की जाए ताकि वह पाणी कही भी ना रुके। वह नाले बी. पी. रोड से कन्टक्टेड नाले है।

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्यांनी आपल्या सुचना लेखी स्वरूपामध्ये दिल्यावर त्याची आमच्याकडे माहिती राहिल आणि आपली सुचना ही कळेल.

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडम, आतापर्यंत लेखी स्वरूपामध्ये देवून सुद्धा आरोग्य खातं झोपा काढते असे मला तरी वाटते. कारण का तर गोडदेवचा जो मेन नाला तो हनुमान नगरपासून ते स्वाती अपार्टमेंट, सोनाली अपार्टमेंट जो मेन नाला गेलेला आहे तो जसाच्या तसा आहे. त्याच्यावर स्लॅब टाकला तरी खालचा गाळ तसाच आहे. जर तो गाळ तुम्ही काढत असाल तर त्या विभागाचे नगरसेवक स्वतः तिथे उभे राहून तिथे जे कामगार येतील त्यांना स्वच्छ करायला लावा. आम्ही स्वतः जातीने लक्ष ठेवू. पण हे अधिकारी कधीही लक्ष घालत नाही. वारंवार सांगून सुद्धा हे काम करत नाही. ह्याचा अधिकाऱ्यांनी उलघडा करावा. आम्ही नेहमी कम्प्लेंट लेखी स्वरुपामध्येच करत आहोत.

**गजानन भोईर :-**

साफसफाई करताना जो मुख्य नाले आहेत ते सफाई करताना त्या प्रभागाचे जे संबंधित नगरसेवक आहेत त्यांना पहिल्यांदा कल्पना दिली पाहिजे. नालेसफाई कशी होती? कचरा उचलला जात नाही. ती घाण परत नाल्यात पडली जाते. म्हणून मी सांगतो की, नालेसफाई करताना संबंधित नगरसेवकांना कल्पना द्या.

**केशव घरत :-**

मी पहिल्यांदा सभागृहाला धन्यवाद देतो. प्रत्येकवेळी नाला असे होते आणि सन्मा. सदस्य गजानन भोईर ह्यांनी सांगितले की, ज्या उघाडया समुद्राला मिळणाऱ्या आहेत त्या स्वच्छ झाल्या नाही तर नाले कसे साफ होणार? आणि हा मुद्दा योग्य आहे मी सभागृहाला पहिल्यांदा धन्यवाद देतो की, चिल्सी च्या उघाडीला तीन दरवाजे आणि घोडबंदरच्या उघाडीला दोन दरवाजे करण्यासाठी मा. महासभेने २५ लाखाची जी मंजूरी दिली होती त्या मंजूरीतून घोडबंदर उघाडीला दोन दरवाजे आणि चिल्सीच्या उघाडीला तीन नविन दरवाजे झालेले आहेत त्याबद्दल मी सभागृहाला धन्यवाद देतो आणि अशी विनंती आहे की, जी चिल्सीच्या उघाडी आहे तो नाला संपूर्ण बंद झालेला आहे. ह्यावर्षी मातीचा भराव प्रत्येक ठिकाणी सुरु आहे. पाण्याची साठवणूकीसाठी फार कमी जागा राहणार आहे आणि हे पाणी संपूर्ण खेडेगावात घुसणार आहे तर माझी सभागृहाला विनंती आहे की, प्रशासनला विनंती आहे की, चिल्सीच्या उघाडीचा जो नाला आहे त्या उघाडीचे सध्या दरवाजाचे काम असल्यामुळे तो नाला बंद करण्यात आला त्यामुळे खार पाणी आतमध्ये येत नाही. त्या जागेवर जावून जे.सी.बी.ने काम करता येईल. संपूर्ण नाला सुकलेला आहे आणि तो नाला खोदला व घोडबंदर खाडीचा नाला खोदणे फार जरुरीचे आहे जे दरवाजे आहे तसेच बी.एस.ई.एस. च्या येथे जे कलवट आहे या कलवटची बाजू एका बाजूने ३० फुट झाली आहे. परंतु, एका बाजूने पाईप लाईन असल्यामुळे ५०एम.एल.डी. पाण्याची पाईप लाईन उंच केली तरच संपूर्ण पाण्याचा निचरा होणार आहे नाहीतर, लक्ष्मीबाग किंवा काशीचे गाव हे पाण्याखाली जाण्याची शक्यता आहे. तेव्हा मी सभागृहाला आणि प्रशासनाला अशी विनंती करतो की, ही जी नालेसफाई आहे. हे अगोदर सांगितले होते की, फेब्रूवारी-मार्च महिन्यात सुरु होईल. आज चार वर्षे झाली ''ये रे माझ्या मागल्या'' हा प्रकार सुरु आहे. मार्च आणि एप्रिल महिन्यामध्ये काम सुरु होत नाहीत आणि ह्यावर्षी सुद्धा मे महिन्यामध्ये काम सुरु होतील तर प्रशासनाला विनंती आहे की, हे नालेसफाईचे काम चिल्सीची उघाडी आहे तिथे सध्या जे.सी.बी. ने जागेवर जावून खोदता येईल कारण संपूर्ण लवकरात लवकर सुरु करावे. तसेच बी.एस.ई.एस. येथील नाल्याची जी पाईपलाईन आहे त्या पाईप लाईनची उंची वाढवून तिथे जो कलवट आहे त्या कलवटची रुंदी वाढवावी अशी मी आपणांस विनंती करतो.

**अशोक पाटील :-**

मा. महापौर मॅडम, हा जो नालेसफाईचा विषय चालू आहे त्यामध्ये प्रामुख्याने खाडया अंतर्भूत आहे आणि २० जुलैच्या अतिवृष्टीमुळे ज्या ज्या शहरामध्ये खाडया खोच्या होत्या त्याला नाल्याच्या स्वरुपामध्ये आपण मान्यता दिलेली आहे आणि त्याच खाडया-खोच्या खोदण्याचे काम चालू होईल तरच या शहराची नालेसफाई होईल हे प्रामुख्याने सभागृहाचे देखिल मत पडलेले आहे आणि त्या अनुषंगाने आरोग्य खात्याने त्याचा सर्व्हे केलेला असणार किंवा ज्या खाडया खोदायच्या असतील त्याबाबत आरोग्य खात्याला आणि ठेकेदाराला विनंती आहे की, त्या खाडया पूर्ण शेवटपर्यंत खोदल्या जात नाही त्या फक्त वरवरुनच साफ केल्या जातात आणि त्या खाडयावरची असलेली अतिक्रमणे हटविली जात नाही ती प्रामुख्याने हटविली जावी अशी मी मा. महापौरांना आणि प्रशासनाला विनंती करतो.

**मुक्ता रांजणकर :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते, आता ७ आणि २४ नंबरच्या प्रभागाचा जो विषय आपल्यासमोर मांडण्यात आला. सन्मा. सदस्या प्रभात पाटील व सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटील ह्यांनी जो विषय आपल्यासमोर मांडला तो गेल्या वर्षीपासून आहे तसाच आहे. मी आपल्या निर्देशनास आणून देतो की, तो जो गटर आहे व पुष्पक पासूनचा जो मेन नाला आहे. तो शिर्डीनगर पर्यंत जावून मिळतो त्या गटारावर ''जय अंबे'' म्हणून इंडस्ट्रिअल वसाहत आहे आणि त्या इंडस्ट्रीचे भरपूर कारखाने आहेत ते त्या गटारावर आहे आणि त्याच्यावर अजूनपर्यंत काहीच निर्णय लावण्यात आलेला नाही. वारंवार गेल्यावर्षापासून लेखी

तक्रार साहेबांकडे दिलेली आहे. पण अजून ह्याच्यावर भरपूर प्रमाणात अतिक्रमणे आहेत ते अजून काढण्यात आलेले नाही. बर्फीगचे कारखाने आहेत व त्याच्याखाली गटर आहे व वर्षानुवर्षे तो गटर साफ होत नाही.

**प्रभात पाटील :-**

ह्यांच्या मुद्दयाला अनुसरुन मी एक वाक्य बोलते की, ह्यांनी सांगितले की त्याच्यावर अतिक्रमण आहे. पण आपण दौरा केला व आपले अधिकारी आहेत. त्याच्या पलिकडे जावून सांगते की, नाल्याच्या इकडची बाजू संपूर्ण रेल्वेचा भाग आहे आणि उजव्या हाताची बाजू हा संपूर्ण औदयोगिक पट्टा आहे. जिथे रहिवाशी क्षेत्र चालू होते त्या दोघांच्या मधून नाला जातो. संपूर्ण इंडस्ट्रीमध्ये त्यांनी संडास काढलेली आहेत. कोणत्याही संडासाला टाकी नाही. सगळ्यांचे आउट लोट त्यांच्यामध्ये आहे. याच्यावर आपण कधी कार्यवाही करणार हे मला माहित नाही. परंतु, नागरिकांचे आरोग्य वर्षानुवर्षे धोक्यात आहे. गेली १५ वर्षापासून मी ह्या विषयावर चर्चा करते. परंतु, आपण त्या व्यावसायिकांवर कोणतीच कार्यवाही करत नाही. त्यांची संडास बंद करावी असे म्हणणे नाही. जय अंबे इंडस्ट्रीज, मेहता इस्टेट, दोशी इस्टेट सगळ्या इस्टेटमध्ये त्यांच्या इस्टेटमध्ये संडास आहेत व एकाकडेही टाकी नाही व त्यांनी ते पाणी त्याच्यामध्ये सोडले आहे व बाजूच्या लोकांना राहणे नकोसे झालेले आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, नॅशनल पार्कच्या डोंगरातून जे पाणी मुंशी कम्पाउंडमधून येते ते झंकारचा जो नाला आहे तो नाला अरुंद असल्यामुळे मुंशी कंपाउंड, क्रिशास्थळ, अमिशपार्क हा विभाग पूर्णपणे पाण्याखाली बुडलेला असतो तर हा जो नाला आहे तो मोठा करण्यात यावा अशी मी सभागृहाला विनंती करतो. तसेच मिरा सोसायटीमधून जे डोंगराचे पाणी येते ते आमच्या मिरा गांवच्या कोंबडीगल्लीमध्ये मिराधाम येते व मिराधामचा जो नाला आहे तो सृष्टीला लागून जो नाला आहे त्या नाल्यापर्यंत तो नाला घेउन जावे. ही सभागृहाला माझी विनंती आहे.

**लिला पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे हा विषय मी दोनदा मा. महासभेत आणला होता. गोडदेव स्मशान भूमीत येणारा नैसर्गिक नाला हा कलावती आईच्या मंदिराच्या येथे बिल्डरने पूर्ण भरणा करुन बंद करुन टाकला आहे याबाबत मी श्री. राजकूमार कांबळे साहेबांना कम्प्लेंट केली की, श्री. अजित पाटील साहेबांनी काय केले व कितपर्यंत प्रोसिजर आली आहे ते मला काही माहित नाही. पण जेव्हा श्री. कांबळे साहेबांना कम्प्लेंट केली तेव्हा ते बोलले की आपल्याला नगररचनेने तसा रिमार्क मारुन ठेवा व नाल्याची मार्कींग करुन द्यावी तर आम्ही तो नाला खोदू आणि खरोखर जे गरजेचे आहे. डी. पी प्लानमध्ये तो नैसर्गिक नाला आहे आणि त्या बिल्डरने पूर्णपणे बंद केलेला आहे. आम्ही सांगत नाही की, खाजगी जागा आहे की कोणाची जागा आहे. त्याला द्यायचे असेल तर द्या. टी.डी.आर. द्या किंवा काहीही द्या पण तुम्ही पहिल्यांदा नाला खोदण्याचा आदेश द्या आणि तसेच, गोल्डननेस्ट मधून हनुमान मंदिरपर्यंत येणाऱ्या नाल्याचे काम झालेले आहे व पुढे आमच्या नवघर गावापर्यंत काम थांबलेले आहे. मागचे शेपूट झाले व तोंड बंद केले आहे. एखादा ठेकेदार बघा आणि त्याला काम द्या. ते काम चालू कधी करायचे. ज्योती पार्कपासून नाला पूर्ण बंदच आहे. तिथे कोण ठेकेदार वाली नाही का? शिर्डी नगरचा नाला हनुमान मंदिरपर्यंत तोही नविन बनवायला पाहिजे. मागच्या वर्षाचे टेंडर अजून रखडलेले आहे. तेही ह्याच्यात नमुद करुन घ्या. तसेच, एस. एन. कॉलेजच्या येथे सन्मा. सदस्य रोहिदास पाटील (काका) ह्यांची बिल्डिंग आहे त्याच्या खाली गावातून नाला गेलेला आहे तो नाला अजिबात साफ करता येत नाही. तो कुठच्याही परिस्थितीत साफ करा नाहीतर, ह्यावेळी नवघर गाव पूर्णपणे बुडून जाईल. माझ्या ह्या सर्व सुचना नमुद करुन घ्या. मा. आयुक्त साहेब याच्यावर खऱ्या अर्थाने कार्यवाही करतील.

**धनराज अग्रवाल :-**

भाईंदर पश्चिम मे जो रेल्वे समांतर नाला है वह एकमेव नाला है उसमे पूरा गटर का पाणी मिरारोड की तरफ जाता है। भाईंदर ईस्ट और मिरारोड का पानी भी उसी नाले मे वापस आता है। श्री. कांबळे साहेब जो नाला जिथपर्यंत पक्का बांधला आहे तिथपर्यंत ठिक आहे. पुढे तो कच्चा नाला केव्हा ही बरोबर खोदत नाही म्हणून भाईंदर वेस्ट प्रत्येक वेळेला बुडते. बालाजी नगर, मोदी पटेल रोड व ६० फूट हे पाण्यामध्ये बुडते. पुढे तो जो नाला आहे त्याचा दोन-तीन भाग करुन ते मोठे केले पाहिजे ते आजपर्यंत केलेले नाही आणि मला तुम्हाला प्रश्न विचारायचा आहे की, १७ मार्चला साडे तीन करोडची निविदा आली होती तो विषय आज आलेला आहे. निविदा पहिली कशी काय आली त्याचा खुलासा करा.

**शिवप्रकाश भुदेका :-**

पेपर मे टेंडर आया था। वह बहूत जणने भरा भी था। पर आपने रिजेक्ट किया। उसका आप खुलासा दिजीए। मा. महापौर मॅडम, हमारे को अभिमान है। आपने सबके वॉर्ड की समस्या सुनी लेकिन पिछलीबार आपके वॉर्ड मे और जहाँपर मा. उपमहापौर रहते है हमने पुरी रात उधर बहूत मदत की थी इसके लिए आपके वॉर्ड का भी ध्यान रखे। हमको मालूम है उसमे ३० टक्का काम होगा और ७० टक्का भ्रष्टाचार होगा हमको वह भी मालूम है।

**अनिता पाटील :-**

आयुक्त साहेब, गेल्यावर्षी पेणकर पाडयातले दहिसर चेकनाका लगत जी बॉन्ड्री आहे. मुंबई आणि मिरा भाईंदर शहराची जी बॉन्ड्री आहे त्या बॉन्ड्रीवर एक नाला तो नाला चिखलाने, मातीने, दगडाने संपूर्ण भरलेला आहे तो नाला जर स्वच्छ केला नाही तर जो इंडस्ट्री एरिया आपल्यामध्ये आहे त्याच्यात पाणी भरून त्या इंडस्ट्री एरियाचे खुपच नुकसान झालेले होते. त्या एरियामधून आपल्याला भरपूर असा रेव्हेन्यू मिळत आहे व तो नाला जर स्वच्छ केला तर गेल्यावर्षी जो प्रसंग घडला होता तो प्रसंग ह्यावर्षी घडणार नाही. कृपया तो नाला साफ करण्याचा प्रयत्न करावा. धन्यवाद.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, शहरातील पूर्ण गटर आपण दोन पॅक केलेले आहे. पण आपण टेंडर काढताना प्रत्येक वर्षी दोन करोड - तीन करोड रुपये वाढवून काढता. एवढे मिनिमम वेजेस वाढलेले नाही. आजही आपण हा जो नालेसफाईचा टेंडर काढलेला आहे. तो मागच्यावर्षी ९५ लाखाचा होता आणि आता १ करोड ७० लाख रुपयापर्यंत गेलेला आहे. एवढी रक्कम का वाढते? कोण इंजिनियर त्याचे एस्टिमेंट तयार करतो. पगाराप्रमाणे करतो की, अंदाजाने करतो.

**राजकूमार कांबळे :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, पहिला जो प्रश्न उपस्थित केला होता की, निविदा आली होती तर स्थायी समितीमध्ये सर्व सदस्यांनी चर्चा केली होती की, यावर्षी लवकर काम चालू करा. दरवर्षी मे महिन्यामध्ये काम चालू करता व तेव्हा पाउस येतो. त्या अनुषंगाने आम्ही प्रस्ताव तयार केला आणि प्रस्ताव तयार करुन मा. महासभेच्या कामोत्तर मंजूरीच्या अधिन राहून निविदा प्रसिद्ध केल्या. दरम्यानच्या काळात काही सन्मा. सदस्यांनी ऑब्जेक्शन घेतल्यानंतर सदरची निविदा आम्ही स्थगित ठेवली. म्हणजे रद्द केली.

**धनराज अग्रवाल :-**

स्थायी समितीच्या मंजूरीने ५० लाखापर्यंत टेंडर काढू शकता विना मा. महासभेच्या परवानगीने पण तुम्ही या सभेच्या परमिशनशिवाय टेंडर कसे काढले? आपण आपल्या हातात नियम घेतले का?

**राजकूमार कांबळे :-**

सदरची निविदा रद्द केली आहे.

**धनराज अग्रवाल :-**

स्थायी समितीने काहीही सांगू द्या. नियम काय आहे? ५० लाखाच्या वर आपण टेंडर काढू शकत नाही. मग आपण साडे तीन करोड रुपयाचे टेंडर कसे काय काढले?

**मिलन म्हात्रे :-**

स्थायी समिती सभापतींनी कुठल्या आधारावर ते टेंडर काढले. मा. महासभेचे कुठले अधिकार आपल्या हातामध्ये घेतले. दोन वर्षे आम्ही स्थायी समितीला होतो असे धंदे कधी झाले नाही. धडधडीत केले आणि आयुक्त साहेब सांगतात की, मला ह्यातले काहीच माहित नाही. आरोग्य अधिकारी बोलतात की, ही माझी सही नाही हे चनाशेंगदाण्याचे दुकान आपण खोलले आहे का? मा. महापौरांना माहित नाही, मा. उपमहापौरांना माहित नाही. त्यांना पत्रव्यवहार केला त्यांच्या टेबलवरची पत्र गायब होतात. आम्हाला पत्रव्यवहार करुन ते थांबवावे लागले. मार्च महिन्यामध्ये पाउस पडतो का आणि कोणत्या मा. महासभेमध्ये झाले? त्यादिवशी मा. महासभेमध्ये सत्ताधाऱ्यांनी सभात्याग केला. त्या सभेमध्ये हा विषय घ्यायला तुम्हाला अडचण होती का? वाटेल तसे कुठल्याही छोटया वर्तमानपत्रामध्ये बातम्या देवून, नोटीसा देवून मोकळे होता. मोठया पेपरला का दिली नाही?

**धनराज अग्रवाल :-**

श्री. कांबळे साहेब आपण हे जे अंदाजपत्रक काढले आहे ते काय हिशोबाने काढले आहे? त्याचे मोजमाप काय आहे?

**मिलन म्हात्रे :-**

अजूनपर्यंत मला त्या पत्राचे उत्तर आलेले नाही. त्या एवढया प्रसंगावर तुम्ही काय कार्यवाही केली? एक करोड रुपयाचे टेंडर मा. महासभेला न विचारता पेपरला निविदा प्रसिद्ध होते. हे तुमच्या लोकांचे पोरखेळ चालले आहेत का? तुमचे अजून उत्तर आलेले नाही. आयुक्त फक्त पत्र घेणार आणि त्याच्यावर सही करणार आदेशही देत नाही की, पुढे काय करायचे ही आपल्या महापालिकेची वाईट परिस्थिती आहे. आयुक्तांनी पत्रावर सही करताना कुठल्या अधिकाऱ्यांनी काय करावे असा आदेश ही देत नाही. खालचे अधिकारी बोलतात की, ही आयुक्तांची सही आहे. मी काम करायचे की, नाही ते ह्याच्यात दिलेले नाही. माझी अशी शेकडो पत्र मिळतील.

**मा. आयुक्त :-**

आपल्याला कुठल्या अधिकाराने सांगितले त्याचे आपण नाव सांगता का?

**मिलन म्हात्रे :-**

आपल्या पत्रात आपले आदेश आहे का ते सांगा.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य मी जरी पत्रावर सही केली व ते पत्र डिपार्टमेंटला पाठवल्यानंतर त्या डिपार्टमेंट काय करायचे आहे. त्याच्या सुचना मी त्यांना दिलेल्या आहेत. आपण मला फक्त त्या अधिकाऱ्यांचे नाव सांगा.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्या अगोदर जे आयुक्त होउन गेले आम्ही काय पहिल्यांदा नगरसेवक झालेलो नाही. चिफ ऑफीसरने सुद्धा पत्र स्विकारल्यानंतर त्याच्यावर आदेश दिलेले आहेत.

**हॅरल बोर्जीस :-**

एका बाजूने आयुक्तानंतर आरोप करायचे आणि ज्यावेळेला विषय येईल त्यावेळी त्या विषयाला फाटा फोडून निघून जायचे. तुम्हांला कोणत्या अधिकारी ह्यांनी सांगितले त्याचे नाव द्या ना.

**मिलन म्हात्रे :-**

टेंडर असे बाहेर कसे काय येतात?

**हॅरल बोर्जीस :-**

आपल्याला आयुक्तांनी विचारले की, कोणत्या अधिकाऱ्यांनी आपल्याला असे सांगितले त्यांचे नाव आपण द्या.

**मिलन म्हात्रे :-**

पहिल्या त्यांनी सांगावे की, आमच्या कुठल्या पत्रावर त्यांनी आदेश दिलेले आहेत.

**हॅरल बोर्जीस :-**

विषयाचे विषयांतर करु नका.

**मिलन म्हात्रे :-**

पहिल्यांदा विषयांतर तुम्ही केले. आपण सभागृह नेते आहात आपण खाली बसवा. विचार चर्चा करुन आम्हाला निर्णय घ्यायचे आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे एका बाजूला नालेसफाई होत नाही म्हणून येथे ह्या सभागृहामध्ये बोंबाबोंब करतात.

**मिलन म्हात्रे :-**

या सभागृहाचे अधिकार हातामध्ये कोणी घेतले?

**हॅरल बोर्जीस :-**

टेंडर काढण्याचे अधिकार मा. स्थायी समिती, सभापतीचे नाही. टेंडर हे प्रशासनामार्फत काढले जाते.

**मिलन म्हात्रे :-**

स्थायी समितीने तुम्हाला आदेश दिले असे उत्तर आले म्हणून आम्ही पत्र दिले. मा. महासभेमध्ये प्रस्ताव ठेवायला तुम्हाला कोणी अडविले होते?

**हॅरल बोर्जीस :-**

आयुक्त साहेब, आपल्याला विचारत आहेत की, कोणत्या अधिकाऱ्याने तुम्हाला हे सांगितले त्यांचे नाव सांगा.

**मिलन म्हात्रे :-**

एक करोड रुपयाची निविदा आपण डायरेक्ट कशा काय काढल्या? सभागृह नेता म्हणून आपण तिथे पत्र दिले का? या सभागृहामध्ये कोणतेही विषय घ्यायला काय उरवा. आमचा तुम्हाला विरोध नाही. पाउस पडतो तर मार्च महिन्यामध्ये पाउस पडतो का आणि आपले ॲक्च्युअल टेंडर एक करोड रुपयाचे नंतर बाहेर जास्तीची बिल निघतात. लांबी, रुंदी कसले काही नाही. पेपरला नोटीस आली त्याच्यामध्ये ठरावाचा नंबर नाही. मंजूरी नाही. अजूनपर्यंत आयुक्तांचे उत्तर आलेले नाही. त्यांनी पहिले उत्तर द्यावे. आणि मग मी छाती ठोकून त्या अधिकाऱ्याचे नाव सांगिन असे एक पत्र दाखवा की, आमच्या पत्रावर आयुक्तांनी लेखी आदेश दिले आहेत की, हे पत्र चुकीचे आहे. ह्याच्यावर कार्यवाही करु नका किंवा हे पत्र बरोबर आहे ह्याच्यावर त्वरित कार्यवाही करा. क्लिअरकट असा आदेश नसतो आणि त्याचे हे परिणाम आहेत. आम्हाला हौस नाही तुमच्यावर ऑब्जेक्शन घेण्याचे आज एक करोड रुपयाचे काढलेत आणि उद्या अख्खी इमारत विकून तुम्ही मोकळे व्हाल. आम्हांला ह्याचे विश्लेषण द्या. माझ्या पत्रावर अधिकाऱ्यावर आपण काय कार्यवाही केली? संबंधित आरोग्य विभागाचा अधिकाऱ्यावर असे टेंडर, मा. महासभेचे पॉवर स्वतःच्या हातात घेउन एक करोड रुपयाची निविदा तुम्ही काढली त्याच्यावर अधिकाऱ्याने चुकीचे गैरवर्तन केले त्याच्यावर आपण काय कार्यवाही घेतली ह्याचे आम्हांला विश्लेषण पाहिजे. ह्या विषयावरच मी बोलत आहे. मा. महापौर साहेबा आम्हाला तुमच्याकडून रुलिंग पाहिजे. तुमचे अधिकार खालच्या अधिकाऱ्यांनी हातात घेण्याची हिंमत कशी काय होते? ह्याच्यावर आपण रुलिंग द्या. हा ठराव निघून चालणार नाही. तुम्ही जे टेंडर काढले त्याची कॉपी, शुद्धीपत्रक काढले आहे त्याची कॉपी. आम्ही वरपर्यंत जावू. तुमचा आम्हाला ह्याच्यावर निकाल पाहिजे. हे झाले ते चुकीचे आहे आणि ज्या अधिकाऱ्याने केले त्याच्यावर कार्यवाही केली जाईल, आमच्या पॉवर्स त्यांनी वापरल्या आहेत. आज या विषयावर आम्हाला तुमचे रुलिंग पाहिजे आणि जर माझे पत्र चुकीचे असेल तर तसे लिहून द्या की माझे पत्र चुकीचे आहे.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, प्रशासनाला अधिकार आहे का, की कुठल्याही सभेचे ठराव मंजूर नसेल तर कुठले् तातडीचे मॅटर असेल तर आयुक्तांना टेंडर काढायचे असे अधिकार आहेत का? मग असे कोणी परस्पर टेंडर काढून या सभागृहामध्ये वाद निर्माण केला आहे. अशा अधिकाऱ्याला माझी रिक्वेस्ट आहे की, पाठीशी न घालता त्याच्यावर कायदेशीर काय कार्यवाही करायची असते ती आपण करा आणि नालेसफाईचा जो विषय आहे त्याच्यामध्ये महत्त्वाचा मुद्दा स्टेशनपासून ते सुदामानगरपर्यंत जो नाला आहे त्याच्यावर स्लॅब टाकून रस्ता बनून तयार झालेला आहे. तेव्हा तो रस्ता बनवताना ठेकेदाराने सर्व मटेरियल आतमध्ये टाकलेले आहे ते योग्यरितीने काढावे आणि नगरसेवकांना समोरासमोर बोलावून ते दाखवावे की हा कचरा काढलेला आहे. नाहीतर, परस्पर नालेसफाई झाली असे आम्हांला पत्र येते आणि परस्पर पावसाळ्याच्या वेळी बालाजी नगर, मोदी पटेल, महाराणा प्रताप, सुदामानगर सर्व बुडतो म्हणून ह्यावेळी आपल्याला जास्त काळजी ठेवावी लागेल कारण तिथे पूर्ण रोड झालेला आहे त्यामध्ये पूर्ण मटेरियल आतमध्ये आहे. दुसरी एक महत्त्वाची बाब की, आपले जे इंटरनल गटार आहेत. वॉर्डनिहाय साफसफाई ती पावसाच्या अगोदर करुन घ्यायला पाहिजे. परंतु, आता मला मुकादमने येउन सांगितले की, ५, १६ आणि २१ साठी जेवढे मजूर सभेमध्ये मंजूर झाले होते त्याच्यामधून ही कमी केलेले आहे. मग आपण सफाई कशी करणार? ते कमी न करता अजून १० मेम्बर वाढवून द्या. कारण ५.१६ आणि २१ खूप मोठा परिसर आहे. त्याच्यामध्ये आपण आम्हाला १०-१५ मेम्बर वाढवून द्या.

**रोहिदास पाटील :-**

आपण मोदी पटेल रोडच्या गटाराचे बोलता. तो साफ करणे हा विषय तसा महत्त्वाचा राहिला त्याची खरोखर कॅरींग कॅपेसिटी म्हणून कोणीतरी त्याची चौकशी केली का? हे कोणत्यातरी अधिकाऱ्याने लक्षात घेतले का? रेल्वेचे वायडिंग चालले आहे ते सगळं मटेरियल त्या गटारामध्ये आले. आपण त्यांच्या हद्दीमध्ये होतो. त्याच्या बाहेर आपण गटर बनवणार किंवा नाही किंवा त्याची खोली वाढवणार का, नाही असे कोणीतरी डोक्यात घेतले आहे का, नाही पाणी कसे जाणार? तुम्ही जरी गटर साफ केले तर रेल्वे फाटकाच्या पलिकडे जिथे आता रेल्वेचे रुंदीकरण चालू आहे. फोर्थ ट्रक बनत आहे त्याची पूर्ण भरणी त्या गटारामध्ये गेली. मी आपल्या पुन्हा लक्षात आणून देतो की, मिरा रोड, काशिमध्ये बाभळीच्या भाटामध्ये डोंगरातून येणारे पाणी जे नैसर्गिक नाले होते त्याच्यात किती प्रमाणात भरणी झाली. बाभळीची भाट नं. १ पहिला पाउस पडल्याबरोबर बुडणार तिथे पाणी जाण्याचा रस्ता राहिलाच नाही. याबाबत तुम्हाला मी तीन पत्र दिली. तिथे कोणी बघायला सुध्दा नाही. त्या बिल्डरची भरणी अजुन चालुच आहे. जिथे डोंगराचे पाणी, एखाद्या गटाराचे पाणी सांभाळु शकता पण डोंगराचे पाणी कुठे अडवु शकत नाही येणारे रस्ते आपल्या डिपार्टमेंटली किंवा आपण स्वतःने इंटरेस्ट घेउन ते जर साफ केले नाही. तर पहिल्या पावसात त्या गरीब लोकांना ते भोगायला लागेल. निस्तरायला लागते ते तिथल्या लोकांना निस्तायला लागते. दरबार हॉटेलच्या उघाडीपासुन पुढे, मिरा गावाच्या उघाडीपासुन पुढे आणि लक्ष्मीबागचे वेस्टन हॉटेल.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, आपके परवानगीसे बोलना चाहती ह। अभी जैसे इन्होंने बताया की, केबिन रोडपर अभीतक कलवट नही बनी है। अगर वह कलवट नही बनी, प्रोव्हीजर अभी के तारीख मे आठ दस बनाए गऐ है। यह बना के कारण वह पुरा पानी अब तक सिर्फ रोडो के उपर था वह सोसायटी के अंदर जाएगा। उसके व्यवस्था के लिऐ अगर आप इस साल कलवट नही बनाते हो तो वह पानी निकालने की, व्यवस्था आपको जरुर करनी पडेगी। कारण अभी सबवे बननेकी तयारी चालु है। उधर भी पुरा गटर बनाना है। तो पुरा केबिन रोड डुबेगा साथ मे पुरा पानी सोसायटी के अंदर जाएगा।

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, हा विषय फार गहन आहे आता सर्वांनी सुचना केल्या की, तुम्ही करु शकता. पण केबिन रोडच्या पाण्याची व्यवस्था आपण कुठेच केलेली नाही व कुठेही कलवट नाही. आणि त्याच्यासाठी दुसरी काय योजना कराल त्याचे काही प्रोव्हीजन नाही. त्याचे उत्तर दिल्याशिवाय आम्हाला कळणार नाही त्याचे उत्तर आपण पहिल्यांदा द्या. एकतर कलवट करणार की, त्याच्यासाठी आपण दुसरी काहीतरी योजना राबवणार ह्या सगळ्यांच्या सुचना घेतल्या तर आपण हे सर्व खोदु शकता. आयुक्त सहोब, सगळं करु शकता.पण केबिन रोडचे आहे त्याचे काय करु शकता. पाणी भरल तर स्टेशनला पाणी भरले म्हणजे आपल्या मुख्य द्वाराजवळ जर पाणी भरजे तर सर्व जनजीवन विस्कळीत होउन जाईल. कारण आपण ह्याचा काही इलाजच केलेला नाही. आणि आत रेल्वेने त्याच्यावर स्लॅप टाकलेला आहे. तो स्लॅप पुर्ण टाकला आहे व त्याच्यावर झाकणं देखिल ठेवली नाही. तर आपण साफसफाई कशी करणार? कलवटचे काय झाले ह्याचा प्रशासनाने अजुन पर्यंत काहीही खुलासा केलेला नाही.

**रतन पाटील :-**

कलवटाच्या बाबतीत धोरण निश्चित करा. या पावसाळ्यामध्ये कलवट होणार आहे ना? मी तेव्हाही विचारले व आतासुध्दा विचारत आहेत. कलवटचे काय झाले?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य शरद पाटील आणि रतन पाटील ह्यांनी कलवट बाबत जो विषय मांडलेला आहे त्या संबधित कामाची पुर्तता काय आहे. कुठल्या स्थितीमध्ये काम आहेत. त्याबाबत त्या विभागाचे अधिकारी ह्याचा खुलासा करतील.

**रोहिदास पाटील :-**

आता श्री. खांबित साहेब व श्री. कांबळे साहेबांची जी चर्चा चालु आहे तर जसे काम या सभागृहात कोणी जागे झाले. आणि विचारत आहे. अशातला विषय नाही. स्थायी समितीमध्ये बजेटमध्ये पुन्हा पुन्हा विषय येतो.

**शरद पाटील :-**

मॅडम,गेल्या सभेमध्ये सन्मा. सदस्य रोहिदास पाटील ह्यांनी या विषयाची लक्षवेधी मांडली होती.

**रोहिदास पाटील :-**

जी लक्षवेधी आणली त्याच्यावर दोन तास चर्चा ही झाली होती.

**दिपक खांबित :-**

रेल्वेचे खालचे कलवट की, कुठले?

**रोहिदास पाटील :-**

केबिन रोडचे पाणी काढायचे त्या कलवट बद्दल बोला. चार कलवट पैकी एका कलवटाचे बोला ते काम कोणी केले? किती दिवसामध्ये त्याचे एक्झीबेशन होईल.

**दिपक खांबित :-**

रेल्वे फाटकाजवळ कलवट बांधण्याचे काम आज ही सुरु आहे आणि ते येत्या दिवसामध्ये पुर्ण होईल.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, रेल्वे क्रॉसीगचे.

**रोहिदास पाटील :-**

आपण हा विषय ट्वीस करणार नाही. हा लोकांच्या जीवन मरणाचा प्रश्न आहे. आम्ही आपल्याला तीन महिन्यापासुन सांगत आहोत केबिन रोडचे पाणी जाण्यासाठी रेल्वेला कुठे बोगदा करणार आहात. पाणी कुठुन जाणार आहे. आता होईल की, पंधरा दिवसात होईल? बजेटमध्ये आपण त्याला भरपुर महत्व दिले व कलवटसाठी आपण अन्य रक्कम फिरवली. जे अपेक्षित आहे. त्याच्यापेक्षा डबल रक्कम दिली पण आज कामाला सुरुवात ही नाही.

**दिपक खांबित :-**

मिरा रोड ते भाईंदर रेल्वे स्थानकाखाली जे चार कलवट बांधायचे आहे तो प्रस्ताव आपले जे डी.आर.एम आले हाते त्यांनी फाईल पास केलेली आहे. आणि ते फायनल सहीला चीफ इंजिनिअरच्या टेबलावर आहे.

**एस.ए.खान :-**

याला एक महिना झाला.

**रोहिदास पाटील :-**

ते काम ५ जुन च्या आधी पुर्ण होईल का असे निवेदन करा.

**दिपक खांबित :-**

त्या कामाबाबत आम्ही आणि सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेब स्वतः सुध्दा फॉलोअप करीत आहेत आणि ते चीफ इंजिनिअरच्या टेबलवर आहे.

**शरद पाटील :-**

साहेब, ते काम होईल का नाही ते सांगा.

**दिपक खांबित :-**

पावसाळ्यापुर्वी कसे होणार?

**शरद पाटील :-**

त्याच्यासाठी दुसरा पर्याय काढा.

**रतन पाटील :-**

आयुक्त साहेब, जर हे कलवट झाले नाही तर पुर्ण सक्षम जावुन बघु आणि त्याप्रमाणे कार्यवाही करु.

**ज्योस्त्ना हसनाळे :-**

आयुक्त साहेब, काशी मिरा येथील सिल्व्हर सरीताचा जो मोठा नाला आहे तो साफ होत नाही. दरवर्षी तिथले पाणी मागे फिरुन लक्ष्मीबाग हायवेमध्ये घेतो. आणि पुर्ण गाव पाण्यामध्ये बुडतो यासाठी कलासिल्कचा जो नाला आहे तो साफ करणे अत्यंत गरजेचे आहे. मिनाक्षी नगर, वेस्टनपार्क येथे जाणारा जो नाला आहे तो दोन नाल्याचा प्रवाह आहे. माझा असा वॉर्ड आहे की, संपूर्ण डोंगराळ भागामध्ये आहे. तिथे नाले भरपूर आहे. कृपया गावठण, गावदेवी कम्पाउंन्डचा नाला, वेस्टन पार्कचा नाला आणि दिव्या पॅलेसचा नाला तसेच लक्ष्मीबागेचा कला सील्कपर्यंत असलेला मोठा नाला हा साफ करणे अत्यंत गरजेचे आहे. कारण पुढे माती भराव करुन बिल्डरने संपूर्ण नाला झाकलेला आहे व तो नाला ह्यावेळेला साफ केला नाही तर संपूर्ण

लक्ष्मीबाग पाण्याखाली बुडल्याशिवाय राहणार नाही आणि प्रत्येक पावसाळ्यात नगरसेवकाला काम लावून दिले असता तुम्ही ठेके देतात, ते ठेकेदाराला तर ठेकेदार खरोखर काम करतो का? त्याची चौकशी करायला तिथे कधी अधिकारी गेले का आणि ऐन वेळेस पावसाळ्यामध्ये नगरसेवकाला पावसा पाण्यामध्ये फिरावे लागत. नगरसेवक नगरसेवकांचे कर्तव्य बरोबर करतात. परंतु, ज्यावेळेला जे.सी.बी.ची गरज असते. जेव्हा अधिकाऱ्यांची गरज असते तेव्हा तिथे कामगार नसतात. उपमहापौरांना मी बघते, ते वॉर्डामध्ये येतात, फिरतात पण त्याने काही होणार नाही. त्यावेळेला तिथे अधिकारी पाहिजे का नाही. अशा वेळेला ठेकेदाराला तुम्ही काम दिले तर त्या ठेकेदाराने खरोखर काम केले आहे की नाही. हे तुम्ही कधी पाहिलं का? तिथल्या नगरसेवकांना तुम्ही विश्वासात घ्या. त्यांना विचारा प्रत्यक्ष जागेवर जावून पाहणी करा की, सतत कुठकुठले नाले साफ करणे गरजेचे आहे आणि आत्ताच्या परिस्थितीमध्ये ठेकेदाराला, नगरसेवकांना विश्वासात घेउन काम करायला सांगा आणि पुढच्या वेळेला जेव्हा या निविदा येतील तेव्हा ठेकेदारांची बिल पास करु नका. आतापर्यंत जे झालेले आहे ते भरपूर साफसफाई आणि नगरसेवकांना भोगावे लागले. कमीत कमी ह्या पावसाळ्यात तसे गत्यंतर होणार नाही याची प्रशासनाने काळजी घ्यावी.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलत आहे, मनपा क्षेत्रातील कच्चे-पक्के नाले साफसफाई करण्याचा प्रस्ताव मंजूरी करण्यासाठी आलेला आहे. तत्पूर्वी आम्ही स्थायी समितीला मंजूरी दिली ती मौखिक पण त्या मौखिक मंजूरीवर प्रशासनतर्फे निविदा काढण्यात आली त्याच्यावर आक्षेप आले आणि ती निविदा रद्द करण्यांत आली. जर असे अधिकारी या मौखिक आदेशाने प्रशासकीय आर्थिक मंजूरी न घेता जर अशी निविदा काढत असतील तर त्याच्यावर आपण कोणती कारवाई करणार ह्याचा ही खुलासा करावा. तद्नंतर आपणच गोषवाऱ्यामध्ये लिहिता की, शहरातील बहूसंख्य पडीत जमिनीवर विकास कर्त्यामार्फत मोठया प्रमाणात बांधकाम होत असल्याने नैसर्गिक नाल्याच्या प्रवाहात दरवर्षी बदल होत असतो. जेव्हा आपण कोणत्याही बांधकामाला मंजूरी देतो तेव्हा आपण ते नाले बघत नाही की, हा नैसर्गिक नाला आहे. ज्यावेळी आपण नैसर्गिक नाला बंद करणार तर नक्कीच कुठेतरी पाणी थांबणार ह्याचा अंदाज आहे. जेव्हा नविन इमारत होईल तेव्हा त्याची नविन पातळी निर्माण होईल. जे अगोदरचे पाणी असेल ते कुठेतरी थांबेल ह्याचा आपण कधी विचार करत नाही. आपण मंजूऱ्या देत जातो आपण नैसर्गिक नाल्याचा तपास करा. मध्यंतरी सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील ह्यांनी नैसर्गिक नाल्याबद्दल माहिती दिलेली त्यांच्याजवळ काही नकाशे आहेत ते अद्यापपर्यंत आपल्या प्रशासनाने घेतले नाही ते का घेतले नाही. प्रत्येकवर्षी आम्ही नागरिकांच्या समस्येला सामोरे जायचे का? आज रेल्वे समांतर भाईंदर पूर्वेचा नाला आहे ते रेल्वे प्रशासनाला आपल्याला विचारण्याची गरज वाटली नाही त्यांनी आपल्या मर्जीने स्लॅब टाकून घेतला जे झाकणं लावली आहेत ती कमी रुंदीची आहेत. त्यामुळे ते साफसफाई करु शकत नाही. म्हणजे आपले अधिकारी काय करतात ते प्रशासनाला वेळोवेळी माहिती देवू शकत नाही का? माझी विनंती आहे ज्या अधिकाऱ्यांनी आपल्या अधिकाराचा गैरवापर केलेला आहे त्यांच्या निलंबनाची कार्यवाही करावी. कारण त्याचे या नालेसाफ सफाईवर लक्ष नाही. ज्या ज्या नगरसेवकांनी विनंत्या केल्या आहेत त्यांनी त्यांच्या भावना ही मांडल्या आहेत. ते खाली मोघम नाही की, माईकमध्ये बोलले आणि माझे रेकॉर्डिंग त्या इतिवृत्तांतामध्ये होईल असे आपण त्यांना जबाबदारी द्या आणि जोपर्यंत नगरसेवकांचे समाधान होत नाही तोपर्यंत नालेसफाई पूर्णतः झाली पाहिजे. तत्पूर्वी नर्मदा कुंज ते नवघर उघाडीपर्यंत एक नाला जातो तो पूर्णपणे साफ करुन घ्यावा लागेल अन्यथा केबिनरोड जो भाईंदर पूर्व परिसर आहे तो जलमय होउन पूर्ण जनजीवन विस्कळीत होईल ह्याची तुम्ही नोंद घ्या आणि जेवढा मोठा नाला आहे तो संपूर्ण पोकलन लावून साफ सफाई करुन घ्यावी आणि ज्यावर अतिक्रमण आहे. नाकोडा येथे एक शौचालय आहे. ते शौचालय नाल्यावर बांधलेले आहे आणि त्याला आउटलोट नाही त्यांनी डायरेक्ट सोडलेले आहे ते ताबडतोब पाडा.

**रक्षाबेन शाह :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते आहे भाईंदर वेस्टमध्ये रेल्वे समांतर जो नाला आहे तिथे सुदामा नगरपर्यंत रस्ता झालेला आहे. सुदामानगर ते एम.टी.एन.एल पर्यंतचा रस्ता अजून झालेला नाही आणि तिथे आपण साफसफाई करणार त्यावेळेला पश्चिमेला राहणारी लोक त्यांच्यामध्ये फक्त सहा मीटरचा रस्ता आहे आणि जर आपण जे.सी.बी. लावले तर तो कचरा कुठे काढायचा ते अवघड आहे त्याकरिता माणसं लावून व जे चार ट्रक सुचवलेले आहे त्याप्रमाणे तिथे कमीत कमी सहा डम्पर लावण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते कारण तिथे कचरा ठेवायला अजिबात जागा नाही. रेल्वेवाल्यांनी जर ट्रक बांधायला घेतले तर शांतीनगर मध्ये फक्त सहा मीटरचा रस्ता आहे तोही त्यांना ये-जा करण्याचा त्या रस्त्यावर जर आपण कचरा टाकला तर त्यांना तिथे जमणार नाही म्हणून ते त्वरित उचलण्यासाठी डम्पर आणि जास्त माणसं लावण्याची व्यवस्था करावी. कारण तिथे जे.सी.बी. जाउ शकत नाही. माझ्या म्हणण्याप्रमाणे ते इंदिरा कॉम्प्लेक्स ते एम.टी.एन.एल. पर्यंत जे.सी.बी. जाण्याचा रस्ता कुठेच नाही. पुढे फक्त जाफरी खाडी आपण साफ करु शकता. तिथे माणसं आणि डम्पर दोन्ही वाढविण्याची विनंती करावी.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेबा, मी आपल्याला विनंती केलेली आहे की, अशा अधिकाऱ्यांवर काय कार्यवाही करण्यात येईल त्यावर रुलिंग द्या.

**रक्षाबेन शाह :-**

शांतीनगर जवळचा जो नाला आहे त्या नाल्यावर भिंत बांधलेली होती...

**उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य ऐकून घ्या. शहरातले जेवढे प्रमुख नाले आहेत त्याविषयी सर्वच जण आपल्या भावना ठेवतात. आता आपण काही वेळेला एका वेळेला दोन तीन सदस्य बोलत असतो. आज काही कारणास्तव आपल्याला वेळेचे बंधन आलेले आहे. आपल्या ज्या वॉर्डमध्ये नाला आहे तिथे तो आहेच. तो दरवर्षी साफ होत असतो. त्याबाबत आपली लेखी सुचना कळविली तर त्याच्यामध्ये दरवर्षी अमुक गोष्ट पूर्ण होत नाही तेव्हा याकडे लक्ष दिले जात नाही दुर्लक्ष केले जाते की, हे काम पूर्ण होत नाही. अशा ठिकाणी आपण आपली लेखी सुचना दिली तर अधिक चांगले राहिल हे आधी ही सांगितलेले आहे आणि काही सदस्यांनी प्रश्न विचारले तर त्यांची ही उत्तरे मिळणार आहेत आणि संपूर्ण शहरामधल्या सर्व नाल्यांची माहिती प्रत्येकाने आपआपल्या परिने दिलेली आहे. येथे चर्चा घडवून त्या विषयावर निश्चित निर्णय होणार नाही. काही ठिकाणी अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष व्हिझीटसाठी न्यावे लागेल. तर आपण ते करु शकता.

**रक्षाबेन शाह :-**

साहेब, माझे मत असे होते की, सुदामा नगर ते इंदिरा कॉम्प्लेक्सपर्यंतचा नाला ही तुटलेला आहे आणि वर भिंत बांधलेली होती ती भिंत कोसळून खाली आलेली आहे. तो नाला बांधून ही घेणार नाही तर पावसाळ्यामध्ये ते पाणी पूर्ण शांतीनगर आणि इंदिरा कॉम्प्लेक्समध्ये येण्याची आहे आणि लोकांच्या घरामध्ये पाणी जाईल.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, टेंडर देताना ज्याच्याकडे सामुग्री असेल त्याला टेंडर द्या. ज्याच्याकडे कुठल्याही प्रकारची सामुग्री नसते त्याला टेंडर दिले जाते आणि त्यामुळे साफसफाई बरोबर होत नाही. प्रत्येकवर्षी हीच बोंबाबोंब चालते.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

साहेब, आपल्याकडे फक्त दोन जे.सी.बी. आहे व एक नादुरुस्त आहे. एक जे.सी.बी. अख्ख्या भाईंदरमध्ये कुठे कुठे जाईल. ज्या ठेकेदाराला तुम्ही ठेका देतात त्यांच्याकडे किती जे.सी.बी. आहे आणि तो व्यवस्थित काम करतो की, नाही याकडे प्रशासनाने संपूर्ण जबाबदारी लक्ष द्यावे. कारण गेल्यावेळेला जो २६ जुलैचा जो पाउस होता तो ध्यानात ठेवून आपली तयारी असावी.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, दोन प्रश्न विचारत आहे त्यापैकी पहिला प्रश्न असा आहे की, जेव्हा आपण टेंडर काढतो, ठेकेदाराला टेंडर देतो आणि नाले साफसफाई होते तेव्हा नाले साफसफाईचा पेमेन्ट करताना महापालिकेची पद्धत काय? म्हणजे कशा पद्धतीने आपण पेमेन्ट करतो. फक्त नाल्याची रुंदी आणि लांबी बघून करतो की, कशापद्धतीने करतो? त्याचे उत्तर द्यावे आणि दुसरा प्रश्न असा की, महापालिकेचा जो आता टेंडर निघालेला आहे. माझ्या माहितीप्रमाणे श्री. बनसोडे साहेबांनी संपूर्ण मिरा भाईंदर प्रशासनाला असे आदेश दिलेले आहेत की, कुठलेही टेंडर नोटीस काढताना जे महाराष्ट्र शासनाचे ठराविक पेपर आहेत त्यामध्येच फक्त टेंडर काढावे असे असताना हे जे साडे तीन लाखाचे टेंडर निघालेले आहे ती जाणीव श्री. बनसोडे साहेबांना आहे का नाही कारण टेंडर काढताना श्री. बनसोडे साहेबांची ही सही लागते म्हणून आपण त्याचा खुलासा करावा. जेव्हा हे टेंडर निघाले ते भाईंदर लक्षदिप असा पेपर आहे. आणखिन माझ्याकडे घरी एक-दोन पेपर आहेत. हे टेंडर निघताना कोणकोणत्या अधिकाऱ्यांची सही असावी आणि त्यांनी सही केली आहे की नाही? तसेच, सन्मा. सदस्य शशिकांत भोईर ह्यांनी जो प्रश्न विचारले ते नाहीतर, मग टेंडर पाठवणार तो कोणता अधिकारी होता त्याची आपण शहानिशा केली पाहिजे म्हणून या दोन प्रश्नाचे उत्तर आपण दिले पाहिजे.

**राजकूमार कांबळे :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे. सर्व सदस्यांचा आढावा एकदमच घेतो. सन्मा. सदस्य रिटा शाह, सन्मा. सदस्य शरद पाटील, शशिकांत भोईर, प्रेमनाथ पाटील ह्यांनी जे नाल्यांच्या संदर्भात सांगितले त्याच्यामध्ये आम्ही ह्या सगळ्या एस.आय. ना ज्यावेळेला नालेसफाईचे काम सुरु करु त्यावेळेला त्या त्या नगरसेवकांना आम्ही प्रत्यक्ष भेटून आणि त्यांच्या ज्या सुचना असतील त्या घेउन काम सुरु करणार आहोत आणि आपण जे टेंडर काढतो ते तासावर काढतो आणि जे.सी.बी मशीन प्रति किती तास चालेल त्याप्रमाणे आपण त्यांना पेमेन्ट करतो आणि मजूरांना प्रति दिवस पगार असतो तसेच, डम्पर ही प्रति दिवसाप्रमाणे असतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण ठेकापद्धतीने जे.सी.बी किंवा मजूर देतो ते कोण बघतो? श्री. कांबळे साहेब, आतापर्यंत जे जे नाले साफ सफाई झालेली आहे त्याला लमसम पैसे दिलेले आहेत. १ कोटी टेंडर आहे आणि त्याला १ कोटी

रुपये देवून मोकळे झालेले आहे आणि नाले साफसफाई झालेली नाही व माझ्या माहितीप्रमाणे ब्रासवर ठेकेदाराला जेवढी माती, घाण ब्रासवर काढणार तेवढेच पैसे द्यायचे असते आणि आजपर्यंत या महापालिकेत कोणी तासामध्ये रेती किंवा घाण काढली आहे ती मोजलेली नाही. आपण बोलता तासाने जर तासावर दिले आहे तर महापालिका का करत नाही. महापालिका का टेंडर घेत नाही. कशाला ठेक्या पद्धतीने आपण टेंडर देता? जे.सी.बी. भाडयाने मिळतात, मजूर भाडयाने मिळतात मग तुम्ही ठेकेदाराला का देता?

**राजकूमार कांबळे :-**

गेल्यावर्षी ही पास झाले होते.

**मिलन म्हात्रे :-**

आयुक्त महोदय, आझाद नगरवरुन जो नवघरला रस्ता जातो तिथे गेल्यावर्षी जी नालेसफाई केली त्याची सगळी माती त्या ठेकेदाराने विकली आता आर.सी.सी. चा नाला बनला आहे व परत आपण लॅन्ड फिलींगचे टेंडर काढून तिथे मातीचा भराव चालला आहे. गेल्यावर्षी जेवढी माती सगळ्या नाल्यांमधून निघाली. आपल्या कुठल्याही रिझर्व्हेशनच्या जागेत ती माती टाकली गेली नाही आणि आता परत लॅन्ड फिलींगचे दुसरे टेंडर काढले आणि जोरात लॅन्ड फिलींग चालू आहे. गेल्यावर्षीची माती गेली. सगळं गेले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

श्री. कांबळे साहेब माझ्या प्रश्नाचे उत्तर द्या, माझ्या माहितीप्रमाणे हे जे टेंडर दिले जातात ते महापालिकेच्या नियमाप्रमाणे जेवढी ब्रास, कचरा किंवा घाण निघेल त्याठिकाणी डेपो मारुन जे तुमचे ऑफिसर असेल ते तिथे जावून मोजमाप करतात आणि नगरपालिकेच्या काळात ब्रासप्रमाणे पैसे दिले जात होते. आता तुम्ही सांगता आम्ही तासवर जर तुम्ही लोकांकडून तासवर घेता तर तुमच्यामध्ये क्षमता नाही ते नाले साफसफाई् करण्याची आपल्याकडे एवढे ऑफिसर आहेत, सफाई कामगार आहेत. मग आपली क्षमता नाही का? ठेक्यापद्धतीने देण्याची गरज काय आहे?

**राजकूमार कांबळे :-**

आपण आवश्यकतेनुसार ज्या मशीनी घेतो ते तासावर घेतो आणि तासाचे जे प्रति तास ठरवतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण जर ठेका पद्धतीने देतो तर तुम्हाला तासाने घेण्याचा प्रयत्न कुठे येतो? तास चालवा किंवा पाच तास चालवा.

**राजकूमार कांबळे :-**

तसे नाही. आपण दर प्रति तास निश्चित करतो. जे.सी.बी, पोकलन, बोटचे जे दर आहे त्याची निविदा मागविताना प्रति तासाचे दर आपण मंजूर करतो व आवश्यकतेनुसार काम करुन घेतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, पण ज्या गटारामध्ये पाच किलो माती नाही तिथे तुम्ही जे.सी.बी ला पाच तासभर चालवणार तर त्याला अर्थ काय? म्हणजे आपण पाच तासाचे पैसे दयायचे? ह्याचा तोच अर्थ झाला ना. तुम्ही दोन तासासाठी जे.सी.बी. किंवा पोकलन मागवली आणि तिथे घाणचं नाही तरी त्या दोन तासाकरिता ठेकेदाराला पेसे द्यायचे? ह्याचा हा अर्थ झाला. म्हणजे पोकलन मागवली गटारामध्ये घाण नाही, ज्या गटारामध्ये माती नाही अशा ठिकाणी आपण पोकलन आणि जे.सी.बी लावणार व त्या ठेकेदाराला पैसे द्यायचे. श्री. कांबळे साहेब, अजूनही आपण सभागृहाची दिशाभूल करता. आपण सभागृहाला खोटी माहिती देता. म्हणजे जे.सी.बी पोकलन तुम्ही तासावर घेता ज्याठिकाणी मैला नाही आणि तुम्ही दोन तासासाठी जे.सी.बी किंवा पोकलन मागविले ह्याच्याबद्दल दोन तासाचे पैसे देणे बंधनकारक आहे म्हणजे तुमच्याकडे स्टॅण्डर्ड च नाही. तुम्ही १ कोटी, २ कोटी रुपयाचे जे टेंडर काढले ते कुठल्या बेसवर काढले आहे? फक्त पावसाळा आला की, नाले साफसफाई करा त्यासाठी दोन कोटी रुपयाचे टेंडर, एक कोटी रुपयाचे टेंडर. तुमच्याकडे कुठला बेस ही नाही.

**गजानन भोईर :-**

श्री. कांबळे साहेब, ठाण्याची लोकसंख्या आपल्यापेक्षा जास्त आहे व त्याचे क्षेत्रफळ १७४ आहे आणि आपले क्षेत्रफळ ८० आहे. त्यांचे टेंडर १४ कोटी रुपयाला जाते आणि आपले १७ कोटी रुपयापर्यंत जाते. तर ही जी तफावत येते, ती तफावत का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

श्री. कांबळे साहेब, आपण माझ्या प्रश्नाचे पहिल्यांदा उत्तर द्या. कारण हे दोन्ही प्रश्न ज्वलंत आहेत. ज्या टेंडरचे मी तुम्हाला सांगत आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. पिठासिन अधिकारी साहेब, सभागृहामध्ये नालेसफाईचा विषय ज्यावेळेला येतो. सदस्य अत्यंत पोटतिडकीने याविषयावर सदैव बोलत असतात. हे प्रशासनाचे काम आहे. आपल्या तांत्रिक चुका ज्या ज्याठिकाणी होतात ते ते विषय त्या त्यावेळेला तुम्ही जर इतिहास बघितला तर ह्या सभागृहामध्ये प्रत्येक वर्षी हे सदस्य हेच विषय रिपीटेशनमध्ये बोलतात. त्याच्या मागे त्यांचे काही वैयक्तिक स्वार्थ नाही. परंतु, प्रशासनाकडून ज्या काही चुका घडतात त्याच्यामध्ये कुठेतरी सुसुत्रतापणा आणणे गरजेचे आहे. सन्मा. सदस्य

ओमप्रकाश अग्रवाल बोलतात ते अजिबात चुकीचे नाही. परंतु, हे विषय कुठेतरी थांबले पाहिजे. तुम्ही कुठेतरी पारदर्शक काम करा. श्री. कांबळे सुद्धा चुकीचे नाही. पण आजच्या घटकेला त्यांना जसे उत्तर अपेक्षित आहे तरी ते उत्तर देवू शकत नाही ही वस्तूस्थिती आहे. ह्याच्यामध्ये कुठेतरी पारदर्शकता आणा. ज्या ज्याठिकाणी आपल्या तांत्रिक चुका कुठे होत असतील तर जेणेकरुन ह्या सभागृहामध्ये अशाप्रकारचे आक्षेप होणार नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

श्री. कांबळे साहेब, आपण हे सांगा, चार वर्षे झाली हे विसरता, ह्यावेळी पेमेन्ट करताना भाईंदरमध्ये पहिल्यांदा कुठ-कुठले नाले साफसफाई करायचे आहेत. त्यामध्ये किती माती आहे व किती तास पोकलन मशीन पाहिजे? किती तास जे.सी.बी. पाहिजे? हा अंदाज करा. भाईंदर ७० किलो मीटर देवून टाका जसे शिक्षण अधिकारी सांगतात ४,९०० मूल तसे देवून टाका.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, अभी सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीसजीने बोला के पारदर्शक काम होना चाहिए। सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजीने बोला वह भी बराबर है। हमलोग साडे चार साल से बोल रहे हे। पारदर्शक काम तो यह करने नही देते। यह खुद ही ठेकेदार है।

**नितीन ठाकूर :-**

मा. महापौर मॅडम, आता जे टेंडर रिकॉल करण्यात आले. त्या ठेकेदाराने पहिले पैसे भरलेले आहेत, जी काय अनामत रक्कम असेल ती त्यांना कधी परत करणार? त्याचे उत्तर द्या आणि मग ते टेंडर काढा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

श्री. बनसोडे साहेब, आपण स्वतःने आदेश काढलेला असताना तो टेंडर निघाला कसा? त्याची माहिती आपण द्यावी ना. आपण लेखी आदेश काढले. महाराष्ट्र शासनाने ज्या पेपरला मान्यता दिलेली आहे अशा पेपरमध्ये जाहिरात केली. साडे तीन, चार,पाच कोटी रुपयाचा टेंडर महापालिकेचा कसा जातो?

**नितीन ठाकूर :-**

मा. महापौर मॅडम, आमची दुसरी सुचना अशी आहे की, ज्या प्रभागात नाले आहेत ते जास्तीत जास्त नाले ईस्टला आहेत. मगाशी नालेसंबंधी सर्व ईस्टचे नगरसेवक बोलत होते. तेथून जो काही जे.सी.बी च्या माध्यमातून कचरा निघेल, जी काय घाण निघेल ती त्या संबंधित नगरसेवकांना नेउन दाखवा की, एवढा ब्रास कचरा आम्ही काढलेला आहे. तसे साहेबांनी दाखवले का? कधी कुठल्या नगरसेवकांना असा कचरा दाखवलेला आहे का? करोडो रुपयाचा व्यवहार होतो. आपण लोकांचा टॅक्स वाढवलेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण व्यापाऱ्यावर हा टॅक्स लावा तो टॅक्स लावा. म्हणजे त्यांच्या मेहनतीचा तो पैसा नाही का?

**नितीन ठाकूर :-**

सफाई होते का? दरवर्षी सगळ्या नगरसेवकांची हीच बडबड असते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

शेवटी व्यापाऱ्याला या शहरातून काय मिळाले? ऑक्ट्रायवाल्यांची दादागिरी...

**नितीन ठाकूर :-**

५ टक्के, १० टक्के परसेन्टेज वाढवतात.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

प्रत्येक कामामध्ये टक्केवारी घेतली जाते हे सर्वांना माहित आहे. पत्रकारांना माहित आहे, तुम्हांला माहित आहे, सभागृहाला माहित आहे. मी काही चुकीचे बोलत नाही. पण कमीत कमी ह्या कामामध्ये जे लोकांच्या जीवनांशी खेळतात. ही टक्केवारी घेताना आपण जरा विचारपूर्वक ठरवा आणि नालेसफाई योग्यरितीने झाली पाहिजे याकडे पूर्णपणे लक्ष द्या. मागच्या वेळेस जर ११ माणसे वाहून गेली त्यावेळी पाउस जास्त होता असे असेल तर ते सत्य आहे. परंतु, त्याला कुठे ना कुठे प्रशासनासुद्धा जबाबदार आहे. आता ह्या येणाऱ्या पावसाळ्यामध्ये आपण काळजी घ्यावी आणि सन्मा. सदस्य नितीन ठाकूर ह्यांनी जो विषय येथे मांडलेला आहे तो विषय आपण गांर्भीयाने घ्यावा.

(सभागृहात गोंधळ)

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आपण असे आदेश काढावे. ज्या ज्याठिकाणी नालेसाफसफाई केली जाते त्या ठिकाणी प्रत्यक्ष त्या ठेकेदाराने बोर्ड लावला पाहिजे की, हा ठेका पद्धतीने या या अटीशर्तीमध्ये दिलेला आहे. जर या नाल्याची सफाई योग्य रितीने झाली नाही तर नागरिकांनी त्याची तक्रार महापालिका, आयुक्त साहेबांना कळवावी. असे ठेकेदारांना तुम्ही बंधनकारक करा. त्या नाल्यावर मोठ-मोठे बोर्ड लावा. काही बिघडत नाही. जागरुक नागरिक आहेत पण त्या लोकांना माहितच नाही की, टेंडर कसा येतो? आमच्या येथे मोदी पटेलचा जेव्हा गटर साफ होतो. तेव्हा आम्ही विचारल्यावर सांगतात की, आपली माणसे करतात आणि जेव्हा टेंडर बघतो तेव्हा महापालिकेच्या ठेकेदाराला टेंडर दिले जाते. म्हणून आपण अशी पद्धत चालू करा की, ज्याठिकाणी आपण नाले साफसफाई करणार आहे त्याठिकाणी ठेकेदाराला कम्प्लसरी हा टेंडर या

कामासाठी तक्रार असली तर या या पत्त्यावर तुम्ही आयुक्तांना कम्प्लेंट करा. टेंडर काढताना अशी सक्ती करा तर या शहराचा विकास होणार आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, आपण हा विषय आणलेला आहे. कच्चे पक्के नाले साफसफाई माझ्या माहितीप्रमाणे पक्के नाले वॉर्ड सफाईमध्ये ऑलरेडी दिलेले आहेत ते आपण परत द्यायचे का? ७९ कि.मी. आपले मिरा भाईंदर क्षेत्र आहे. मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये नाल्याची रुंदी किती आहे ते आम्हांला पाहिजे. ह्या ७९ कि.मी. काय करायचे आहेत? १ करोड ३० लाख रुपये जे.सी.बी. चा खर्च दिलेला आहे. श्री. कांबळे साहेब आपण किती जे.सी.बी लावणार आहात?

**राजकूमार कांबळे :**

१० ते १५ जे.सी.बी. लावणार आहोत.

**नरेंद्र मेहता :-**

आयुक्त साहेब, एका जे.सी.बी. ची मार्केटमध्ये कॉस्ट आहे ७०० प्र तास आपले ७७५ आहे. आपण महिन्याने घेतली तरी कमी दरात आली पाहिजे. आपण ७७५ धरले तर समजा एक जे.सी.बी. ८ तास चालेल त्याचे बिल होईल जास्तीत जास्त ७ ते ८ हजार रुपये इन टू आपण दहा दिवस केले तर ८० हजार महिन्याचे केले तर २ लाख ४० हजार रुपये, ४५ दिवसाचे केले तर ३ लाख ६० हजार रुपये. १० जे.सी.बी मागवले तर ३६ लाख रुपये आपण येथे १ करोड ३० लाख रुपये दिले आहे.

**राजकूमार कांबळे :-**

सदरचे जे अंदाज आहेत ते प्रत्येक विभागाचे आम्ही काढलेले आहेत. गेल्या दोन वर्षामध्ये जे.सी.बी. मशीन तासावर काढलेले आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

जे.सी.बी. किती लागणार आहेत? मी तर पूर्ण ४५ दिवस मोजले आहेत. आपली जे.सी.बी. कन्टीन्यू ४५ दिवस चालणार नाही. रोज ८ तास चालणार नाही.

**राजकूमार कांबळे :-**

गेल्या दोन वर्षाचा अनुभव आहे. पावसाळ्यामध्ये किमान दोन ते तीन वेळा साफ करावे लागते.

**नरेंद्र मेहता :-**

साधं सिम्पल आहे. तुम्ही १० जे.सी.बी घेणार ना.

**राजकूमार कांबळे :-**

होय. घेणार एक महिना चालणार असे नाही. दोन महिने चालू शकेल. तीन महिने चालू शकेल.

**नरेंद्र मेहता :-**

तुम्ही तीन महिने चालवा त्याचे ७२ लाख रुपये होणार.

**राजकूमार कांबळे :-**

आम्ही ते तास काढले आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

एकतर आपण आम्हांला खोटं सांगता की, १० जे.सी.बी लावणार.

**राजकूमार कांबळे :-**

साहेब, तासावर काढले आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

२४ तासात ७२ तास जे.सी.बी चालू शकत नाही.

**राजकूमार कांबळे :-**

गेल्या दोन वर्षामध्ये ज्या ज्या वॉर्डामध्ये जितक्या जे.सी.बी. चालल्या त्या तासावरुन काढले् आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आपल्याला किती जे.सी.बी रिक्वायरमेंट आहे?

**नितीन ठाकूर :-**

मा. महापौर मॅडम, या दोन वर्षामध्ये आपण जे.सी.बी. चालवल्या म्हणून सांगितले. पण या दोन वर्षामध्ये किती ब्रास नाल्यातून कचरा काढला ते सांगू शकता का? तुमच्याकडे माहिती आहे का?

**हंसुकूमार पांडे :-**

आपण एक जे.सी.बी. खरेदी करायला गेलो तर त्याची कॉस्ट किती आहे?

**नरेंद्र मेहता :-**

पावसाळ्यात पाणी तुंबते त्यावेळी आपण एमरजन्सी जे.सी.बी. मागवली तर ती उपलब्ध नसते. आपण जर १० जे.सी.बी. लावणार आहात तर कुठल्या ॲग्नलने १ करोड ३० लाख रुपये होतात ते सांगा? तुम्ही आम्हाला कमीत कमी ४० जे.सी.बी चे कोटेशन दिले आहे. मग आपण ४० जे.सी.बी. लावणार आहात? २४ तासामधून ७२ तास आपण जे.सी.बी चालवणार आहात का ते बोला. साहेब, आपण जे बोलता त्याचे मी आठ

वेळा कॅल्क्युलेशन केले तेही हजार रुपयाप्रमाणे म्हणजे तुम्ही ७७५ धरले आणि मी १००० धरले. आठ तासाचे आठ हजार रुपये मोजले. त्यामुळे तुम्ही मला परत सांगू नका हे असे नाही.

**राजकूमार कांबळे :-**

जे एकूण तास चार महिन्यामध्ये होतात त्याचा अंदाज काढलेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

सिम्पल प्रश्न, १० जे.सी.बी तुम्ही मागवले तर एका दिवसात किती चालणार आणि इन टू ४५ करा. अन्यथा तीन महिने घ्या आणि आता सांगा ते किती होईल?

**धनराज अग्रवाल :-**

आपल्याला विचारले की, बेस काय घेतले तर आपल्याजवळ बेस नाही. आपण अनुभवाने असेच आकडे लिहून टाकले. मागच्यावर्षी एवढे झाले आणि ह्यावर्षी एवढे होणार आहे.

**शुभांगी नाईक :-**

हे सर्व अंदाजे मॅनेज झालेले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आपण साधारणपणे ४० जे.सी.बी.चे कोटेशन कोट केलेले आहे. ४० जे.सी.बी आठ तास लावले तर ही रक्कम होईल.

**शुभांगी नाईक :-**

नागरिकांचा पैसा वाया घालवायचा आहे?

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, आपल्याला वाटते का, एवढे पैसे खर्च केल्यानंतर पाणी भरणार नाही. आपण जे नाले खोदायचे बोलतात ते कुठल्या इंजिनियरने सर्व्हे केलेला आहे की, कुठले पाणी कुठे जाईल ते तरी सांगा. कारण आजच्या तारखेला तुम्ही स्वतः आले होते. श्री. घेवारे साहेब होते. स्थायी समितीचे माजी अध्यक्ष होते. तरी प्रिन्स पार्कमध्ये आजही पाणी भरलेले आहे. आपल्याकडे तोडगा नाही की, पाणी कसे मुव्ह करायचे आणि मग हे १ करोड ३० लाख रुपये कशासाठी?

**मिलन म्हात्रे :-**

मॅडम, आमच्या रूलिंगचे काय झाले? मा. उपमहापौर साहेब आपल्याला पत्रव्यवहार केलेला आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

आपण प्रत्येक झोनसाठी जे एस्टीमेंट काढले आहे ते सभागृहासमोर सांगा म्हणजे त्यांचे समाधान होईल.

**नरेंद्र मेहता :-**

नाले साफ सफाईकरिता आपल्याला अंदाजे किती जे.सी.बी पाहिजे.

**राजकूमार कांबळे :-**

अंदाजे जे.सी.बी. मशीनचा खर्च ८५० तास काम लागतील...

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, आपण मला फक्त हे सांगा की, आपल्याला जे.सी.बी. किती पाहिजे? १० पाहिजे, १५ पाहिजे, २० पाहिजे, ३० पाहिजे, ४० पाहिजे.

**राजकूमार कांबळे :-**

तेही काढता येईल.

**नरेंद्र मेहता :-**

ह्याच्यावरून काढले तर ४० जे.सी.बी. ची तुमची मागणी आहे. २५ वॉर्डात ४० जे.सी.बी?

**दिपक खांबित :-**

४ हजार ६०० तास असे एकूण तास काढलेले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, मी जास्त शिकलेला नाही. आठवी पास आहे. मला शॉर्टकटमध्ये सांगा.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सभागृह आणि सन्मा. सदस्य नरेंद्र मेहता साहेब आपण जो विषय काढला आणि सभागृहासमोर जी माहिती आणली त्या माहितीवरुन आपण जर कॅल्क्युलेशन केले तर थोडसं अवघड गणित दिसते. आरोग्य अधिकाऱ्याने नेमके किती जे.सी.बी. पकडले किंवा नेमके किती तास पकडले त्याचाही व्यवस्थित उलघडा होत नाही. रक्कम अवास्तव वाटते. दरवर्षी मिरा भाईंदर ची भौगोलिक रचना अशी आहे की, आपल्याला जे.सी.बी. पाण्यात घालावीच लागते. माती उचलावी लागते. परंतु, आता आजच्या ह्या एकूण वातावरणावरुन मला आयुक्त महोदय असे वाटते की, आपण याबाबत गांभीर्याने विचार करुन ह्याचे पेमेन्ट करताना ह्याला आज मंजूरी मिळाली आहे. हा ठराव झालेला आहे. परंतु, ही रक्कम आहे ही ग्राह्य धरू नये. ह्याची फेर तपासणी करावी आणि योग्य असलेली रक्कम आपल्या माध्यमातून किंवा आपण जे खाते दयाल त्या खात्याच्या माध्यमातून व्हाव्यात.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही त्या रक्कमेला मंजूरी देत नाही. जे काम होणार त्याप्रमाणेच पेमेन्ट दिले पाहिजे हे तर निश्चित असते.

**नरेंद्र मेहता :-**

आपण दोन महिन्यासाठी १३ जे.सी.बी. घेउ या. तरी किती पैसे होतात?

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य नरेंद्र मेहता हे त्याचे कॅल्क्युलेशन करतील, आता येथे एकमेकाला प्रश्न उत्तर विचारुन हा प्रश्न सुटणार नाही. आपण कॅल्क्युलेशनमध्ये फार परफेक्ट आहात ते सगळ्यांना माहित आहे. पण ते सर्व करायला त्याची वेळ लागेल.

**रोहिदास पाटील :-**

त्याच्यामध्ये जे.सी.बी. नाही तेही समजून घ्या.

**राजकूमार कांबळे :-**

जसे तास आहेत तसेच आपण करणार आहोत आणि आपण तासाचे एवरेज काढलेले आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

आपण हे काढले तेही मी सांगतो. गेल्या पाच वर्षापासून आपली मागणी होती की, ९० लाख रुपये साफ सफाईसाठी पाहिजे. त्यानंतर आपण कमीत कमी ५० नाले तयार केले. तरी तुमची मागणी अजून वाढत गेली. अजून २० टक्के वाढवून पाहिजे. म्हणजे गेल्या पाच वर्षापासून आपण वाढत वाढत चाललो आहोत. पण तेवढया तास जे.सी.बी. लागत नाही.

**शरद पाटील / प्रेमनाथ पाटील :-**

७, २४, २२ आणि २३ येथे जे.सी.बी. कुठेच लागत नाही.

**नरेंद्र मेहता :-**

मला माहित आहे की, किती जे.सी.बी. लागतात.

**दिपक खांबित :-**

माणसं लागतात.

**शरद पाटील :-**

कुठे लागतात ते सांगा ना. आपण एकतरी गटर सांगा की, जे.सी.बी. लावून साफ केले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

नाल्याची लेंथ किती आहे.

**शरद पाटील :-**

कुठल्या आधारावर आपण या पैशांची मागणी केली?

**प्रभात पाटील :-**

७ नंबरमध्ये आपण जे.सी.बी. कुठे वापरता आणि मला असे वाटते की, आपण नाले सफाईचा विषय आणताना बोललो होतो की, आतापर्यंत दोन विभागाकडून काम होत होते. आरोग्य आणि बांधकाम साहेब, पुन्हा एकदा रिक्वेस्ट आहे की, मागच्या ठरावाच्या वेळेला....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

असे काही की, शाळेमध्ये मुलं किती? पहिली नगरपालिकासे ग्रामपंचायत ७५० बच्चे वह अभी तक ७५० ही आ रहा है। भाईंदर का क्षेत्रफळ कितना तो ७९ और ७९ ही आ रहा है।

**मा. उपमहापौर :-**

सदर बाबत आपण ती आकडेवारी तपासली त्याच्यामध्ये आणि संपूर्ण सभागृहाची भावना व्यक्त करतो. आरोग्य अधिकाऱ्यांनाकडून आपल्याला या शहराची फारसे असे काही मिळालेले नाही आणि मिळेल असे वाटत नाही. त्यांच्याकडून आलेले टेंडर देखिल अशाप्रकारचे आहे. सन्मा. आयुक्तांनी ह्याबाबत फेर आदेश काढून योग्य तो निर्णय घ्यावा.

**प्रभात पाटील :-**

एवढया मोठया खर्चाला मंजुरी कशी काय देता? खर्चाला मंजूरी नाही फक्त कामाला मंजूरी आहे.

**मा. उपमहापौर :-**

आयुक्तांनी याबाबत फेर आदेश काढावेत.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. आयुक्तांना आपण त्याप्रमाणे रुलिंग दिलेले आहे. परंतु, हे नालेसफाईचे काम कुठे थांबले नाही पाहिजे. त्याबाबतीमध्ये सन्मा. आयुक्तांनी संबंधित खात्यामार्फत फेर प्रस्ताव तपासून पाहावा.

**रोहिदास पाटील :-**

काटकसर करुन म्हणजे मोठी रक्कम फुगवून नाही आवश्यक ती रक्कम.

**हॅरल बोर्जीस :-**

अनावश्यक रक्कम कपात करावी.

**शरद पाटील :-**

आयुक्त साहेब, प्रभाग क्र. ७, २४, २२ आणि २३ येथे कुठे ही जे.सी.बी. लागत नाही आणि खालच्या ह्याच्यात खर्च दिला आहे माणसे आणि डम्परचा या चार वॉर्डामध्ये कुठेही जे.सी.बी. चे काम नाही आणि कुठे जे.सी.बी. लागणार नाही.

**मा. उपमहापौर :-**

या विषयात आयुक्त साहेबांनी महोदयांनी वाटल्यास बांधकाम खात्याकडून योग्य तो अहवाल मागवून याबाबत फेर निविदा काढाव्यात आणि सन्मा. आरोग्य अधिकाऱ्यांना विनंती करतो की, सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे ह्यांनी प्रश्न विचारला होता त्या प्रश्नाचा खुलासा करावा आणि सभागृहाने पुढील कामकाजाला सुरुवात करावी आणि पाण्याचा महत्त्वाचा विषय आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आयुक्त साहेब, आपण योग्य निर्णय घ्याल अशी मला खात्री आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेबा, या अशा संबंधित अधिकाऱ्यांवर काय कार्यवाही करणार याची रुलिंग मागितली होती त्याच्यावर मला रुलिंग दिलेली नाही. आपण रुलिंग द्यावे.

**नरेंद्र मेहता :-**

आपण एकत्र उत्तर दिले तर बरे होईल.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सभागृहामध्ये बऱ्याच वेळेपासून चर्चा चालू आहे. प्रत्येकवर्षी आपल्या नालेसफाईचा त्या संदर्भामध्ये बरीचशी चर्चा झालेली आहे आणि प्रशासनाकडून आपल्याला अपेक्षित असलेले उत्तर प्रशासनाने आतापर्यंत दिलेले नाही किंवा देवू शकले नाही. नाले साफसफाईच्या बाबतीत प्रति वर्षी जी मिरा भाईंदर शहरामध्ये पद्धत आहे. त्यापद्धतीने मी थोडीफार अशी माहिती घेतली की, सुरुवातीला साधारणपणे बांधकाम विभागामार्फत साफसफाई केली जात होती त्यावेळी ते प्रत्यक्ष जागेवर जावून नाल्याची रुंदी घेउन, जे जे नाले साफ केले असतील त्याच्या प्रमाणामध्ये प्रपोशनेटमध्ये मोजमाप घेउन तसे रेकॉर्डिंग करुन बिले अदा करण्याची पद्धत असावी असे मला वाटते. परंतु, ह्या दोन चार वर्षामध्ये आरोग्य विभागाकडून जी नालेसफाई होते तर अशाप्रकारे टेन्टीव्ह फिगर्स दिल्या जातात. त्याच्यामध्ये जे काही विभागाचे नाव आहे त्या विभागाचे नाव नमुद केले जाते. त्याच्यामध्ये जे प्रभाग क्रमांक येतात ते नमुद केलेले असतात. अंदाजित मजूरांवरील खर्च हा नमुद केलेला असतो. त्याच्यानंतर अंदाजित डम्परवरील खर्च असे करुन जवळ जवळ मजुरावरचा व डंम्परचा ५६ लाख ४ हजार असा दाखवण्यात आलेला आहे आणि त्याप्रमाणे ह्या संपूर्ण नाला सफाई प्रक्रियेमध्ये आपल्याला जे काही पोकलन लागतात ते पोकलन बोटीसह असतात. काही जे.सी.बी. असतात. संबंध पोकलनाचा, जे.सी.बी.चा आणि बोटींचा खर्च हा साधारण १ कोटी १३ लाख ६६ हजार ५०० रु. दाखवण्यात आलेला आहे. त्यांच्याकडून हे जे अंदाज झालेले आहे ते अंदाजित तास आहेत, अंदाजित मजूर आहेत आणि अंदाजित जे.सी.बी. ची संख्या आहे. परंतु, प्रत्यक्ष जर आपण बांधकाम विभागामार्फत पूर्ण डिटेल एस्टीमेट तयार करुन अशाप्रकारची नाले साफसफाई केली तर त्याच्यामध्ये महापालिकेचे नुकसान होणार नाही आणि नालेसफाईचा जो रिझल्ट आपल्याला पाहिजे त्याप्रमाणे आपल्याला रिझल्ट मिळेल. ज्या ज्याठिकाणी अशाप्रकारची नालेसफाई होणार नाही. त्या संबंधित सन्मा. नगरसेवकांना मी विनंती करेन की, त्यांचे समाधान होईल इतपर्यंत नालेसफाई होणे गरजेचे आहे. कारण प्रत्येक वेळी कुठेतरी पाणी आहे म्हणून त्याठिकाणी जे.सी.बी. लावायचा आणि जे.सी.बी फक्त पाणीच काढणार आहेका? त्याच्यामध्ये सुद्धा त्याचे तास एखाद्या वेळेला नमुद केलेले असतील तर अशाप्रकारे हा जो काही नाल्यावरचा नालेसफाईचा प्रत्येकवर्षी खर्च करावा लागणार आहेतर हा खर्च करावा लागणार आहेतर हा खर्च योग्य मार्गाने, योग्य पद्धतीने आणि योग्य रितीने होणेसाठी याबाबतीमध्ये बांधकाम विभागाकडून त्याचे सविस्तर एस्टीमेट तयार करावे आणि त्याप्रमाणे हे काम करावे. भले थोडासा उशीर झाला तरी हरकत नाही. शेवटी महापालिकेचा निधी आहेआणि महापालिकेचा निधी योग्य ठिकाणी खर्च होणे आवश्यक आहेअसे अपेक्षित आहे. त्याप्रमाणे मी सभागृहाला विनंती करेन की, अशाप्रकारे संबंधित बांधकाम विभागाकडून प्रत्यक्ष नाल्यांची पाहणी करुन साधारण एक-दोन दिवसामध्ये त्यांनी एस्टिमेट तयार करावे आणि दोन दिवसांनी आपण गटनेत्यांची, सभागृह नेते, उपमहापौर, महापौर, विरोधी पक्षनेते आहेत अशांची एखादी बैठक दालनामध्ये आयोजित करावी आणि त्याच्यामध्ये त्या अंदाजित रक्कमेचा आढावा घ्यावा व त्याप्रमाणे टेंडर नोटीस काढावी असे मला वाटते.

**रोहिदास पाटील :-**

मी, आयुक्तांना विनंती करतो की, काटकसर करुन जर तुम्ही परत गेल्या वर्षीसारखे कराल तर प्रायोगिक तत्वावर आम्ही आमच्या वॉर्डामधले काम करुन तुम्हांला विनंती केली की, चार फूट गाळ कसा काढला तर ते बांध मधून गाळ काढला. तुम्हाला बघायला यायला वेळ मिळाला नाही. पण तसे नाले साफ झाले नाही तर पाण्याचा निचरा होणार नाही. त्याच्यामध्ये शब्द आला पाहिजे की, असलेली गटार तळापर्यंत साफ करणे. किरण नगर नाला हा दरवर्षी साफ होतो. पण तीन फूट गाळ ठेवून वरच्या वर साफ होतो. यावर्षी अर्धनळामध्ये बांध बांधून साफ केले केले त्यावेळी तीन, साडे तीन, चार फूट माती निघाली. श्री. कांबळे

साहेबांनी बघितले असेल. त्याचा ही विचार ठेवा. नाहीतर, आम्ही ओरडतो म्हणून तुम्ही सांगाल की, काटकसर केली.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आयुक्त साहेब, आपण आता बोललात की, बांधकाम विभागामार्फत नाल्यांची लांबी, रुंदी घेउन गटाराची लांबी, रुंदी घेउन एस्टीमेट तयार केले जाते. माझ्या माहितीप्रमाणे आपण मागे हे आदेश स्थायी समितीच्यासमोर दिले होते. त्यावेळी बांधकाम विभागाने ते एस्टीमेट केले होते आणि बांधकाम विभागाचे एस्टिमेट जवळ जवळ साडे तीन करोड रुपयाचे होते. मग तुम्ही हे साडे तीन करोड रुपयाचे एस्टिमेट वापरणार की, हे दिड कोटी रुपयाचे एस्टिमेट वापरणार आपण आत्ताच सांगितले की, बांधकाम विभागाने परत एस्टिमेट करावे. मागे बांधकाम विभागाने साडे तीन करोड रुपयाचे एस्टिमेट करावे. मागे बांधकाम विभागाने साडे तीन करोड रुपयाचे एस्टिमेट दिले. ह्याच्यावर आपण काय निर्णय घेणार? कारण की, ऑलरेडी एस्टिमेट तुमच्यासमोर आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, बऱ्याचशा नाल्यावर स्लॅब टाकले गेले आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

आयुक्त साहेब, मी आपल्याला थोडक्यात सांगतो की, ही रक्कम का वाढली, माझ्या माहितीप्रमाणे सन २००१ मध्ये आपल्याकडे जे पक्के गटर होते त्याची लांबी १ कि.मी. असेल, कच्चे नाल्यांची असेल २ कि.मी. त्यानंतर बांधकाममध्ये विकास झाला आपण पक्के नाले अजून वाढविले. कच्चे नाले कमी केले. आपण पक्के नाल्यांना पण ज्यावेळी वॉर्डसाफ सफाई होती त्यावेळी रक्कम वाढवून दिली. दरवर्षी १० टक्के-२० टक्के वाढ हे पाच वर्षापासून वाढत चालले आहे. कच्चे नाले कमी होत चालले आहेत आणि ही रक्कम वाढत चालली आहे. म्हणजे जशी नॅचरल डिमांड असते. आता १० रु. खर्च झाला व आता १२ रु. होणार आहे ही रक्कम वाढत वाढत एवढा फरक आलेला आहे. दुसरे असे महत्त्वाचे होते की, मिरा भाईंदरचे मेजर पाणी वॉर्ड क्र. २५ मधून जाते. त्याबद्दल सन्मा. सदस्य शशिकांत भोईर ह्यांनी सांगितले की, सुलभ शौचालय बांधलेले आहे. त्यात असे महत्त्वाचे आहेकी, एकच नाला या साईडचा आपण ५० लाखाला बांधला व या साईडचा ५० लाख व मधे बाकी ठेवले. त्या नाल्याचा उपयोगच काय? दोन्ही साईडला बांधला व मधे बाकी ठेवला आणि त्याच नाल्यावर हे सुलभ शौचालय आहे. बिल्डिंगवाल्यांनी तीन शौचालयाला ताळा ही मारलेला आहे. पण वारंवार तक्रार करुन सुद्धा काही झालेले नाही. त्या बिल्डिंगवाल्यांना भरपूर त्रास होतो की, दोन फिटावर ती सर्व घाण पडते. आपण हे एस्टिमेट घेणार व त्यानंतर पाईप टाकण्यासाठी करणार. सुरुवातीला पाईप येतात ते सर्व पाईप टाकले जातात आणि ते पाईप जास्तीत जास्त २० दिवसात २७ किंवा २५ दिवसात खटून जातात आणि त्या पाईपमध्ये आतमध्ये माती कोसळल्यानंतर पाणी पास होत नाही. ह्याच्यातून जी काही रक्कम वाढेल ते क्रॉस डेन जेवढे महत्त्वाचे आहेत ते क्रॉस डेन बांधले तर उपयोग होईल. कारण आपले पाईप असे आहेत की, पहिले आले ते आले त्यानंतर परत कधी पाईप येत नाही आणि आपल्याकडे स्टॉक ही नसतो. ट्रक गेल्यानंतर ते पाईप नेहमी फूटतात. त्यापेक्षा क्रॉस डेन महत्त्वाचे आहेत. ते आपण बांधून घ्यावे. तसेच, मी गेल्यावेळी बोललो की, पी.एफ. लागतो. ह्या कामाला १०.२४ टक्के एवढा तुम्हाला सर्व्हिस टॅक्स लागणार आहेते आपण ह्याच्यामध्ये पहिल्यांदा बघून घ्या. श्री. कांबळे साहेब , ती रक्कम विथ सर्व्हिस टॅक्स आहेकी, विदाउट सर्व्हिस टॅक्स आहे. सर्व्हिस टॅक्स कोण भरणार आहे, आपण की ते? तसेच, महत्त्वाची गोष्ट अशी की, अजूनपर्यंत आपण कुठलीही डिझाईन केली नाही की, कुठले पाणी कुठे जाणार आहे? नुसते जे.सी.बी. मागवायचे रोड खोदायचे आणि पाणी जावू द्या की, नको महत्वाचा गोल्डन नेस्टचा विषय असा आहेकी, दरवेळी उपमहापौर साहेब, महापौर साहेब, पूर्ण आपले संबंधित सर्व डिपार्टमेंट क्वीन्स पार्क, रामदेव पार्कला जातो त्याला काही इलाज नसतो. पाणी भरलेले असते. उपायुक्त शेख साहेबांचे असे म्हणणे आहेकी, गोल्डन नेस्टला श्री. भरत जैनने जी बॉन्ड्री बंद केलेली आहेव त्याने स्वतःच्या खर्चाने गटर बांधलेले आहेत त्याची हाईट जास्त आहे, आपली खाली आहे. तर श्री. भरत जैन ह्यांची अशी मागणी आहेकी, आम्ही आमच्या खर्चाने बांधले आहेव महानगरपालिकेने त्यांच्या खर्चाने बांधून द्या तर ते तोडायला माझी काहीच हरकत नाही. त्याशिवाय ते पाणीच जाणार नाही. आजच्या तारखेला क्वीन्स पार्कला अशी परिस्थिती आहेकी, बिफोर १५ डेज ओनली श्री. घेवारे साहेब, श्री. कांबळे साहेब बांधकामचे अधिकारी सर्व क्वीन्स पार्कला जावून आले. सर्वांनी आपल्यापरिने वचन दिले पण काहीही होत नाही. शेवटी ते मला भूगतायला लागते. कारण ते जावून सांगतात की, होणार आणि मी जावून सांगतो की, होणार नाही. हे महत्त्वाचे चार काम होत नाही. एक आपण क्रॉस डेन बांधून घ्या जे महत्त्वाचे रस्ते आहेते, दुसरे शौचालय काढून घेण्यात यावे. तिसरे आपण नाला ह्या साईडला बांधला आहेव त्या साईडला बांधला व मधले शंभर मीटर सोडलेले आहेते पूर्ण केल्याशिवाय पाणी जाणारच नाही. ते जरा बघून घ्यावे, धन्यवाद.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

उपायुक्त साहेब, आपण यावर डिसीजन काय घेतला?

**मा. उपमहापौर तथा पिठासिन अधिकारी :-**

सन्मा. सदस्य नरेंद्र मेहता साहेब, आपले कॅल्क्युलेशन पक्के असतात ते या सभागृहाला माहित आहे. या विषयात नालेसफाईसाठी काही राजकीय कारणास्तव आपली सभा उशिरा होत आहे. ती उशिराने सुरु झाल्यानंतर पुन्हा राजकिय कारणास्तव आजच्या सभेला उशिर होत आहे. या शहरामध्ये ३५ एम.एल.डी. पाणी आले पाहिजे. नाले सफाईचा विषय झाला पाहिजे म्हणून सगळ्यांच्या मिन्नतवाऱ्या करुन जवळ जवळ प्रत्येक सदस्यांनी एकमेकाला समजवण्याचा प्रयत्न केला. विषय पटलावर विषय आल्यानंतर सदस्यांनी देखिल मोठं मन ठेवून जास्त चर्चा न घडवता हा विषय आपण लेखी सुचनांसह आणण्याचे ठरविले. पुन्हा त्याच्यामध्ये सुज्ञ नगरसेवकांकडून माहिती आली की, या आकडेवारीमध्ये बराच मोठा फरक आहे. आपण या विषयाचा ठराव मांडलेला आहे. ठराव ही पारित झालेला आहे. तर या विषयामध्ये सन्मा. सदस्य रोहिदास पाटील (काका) यांच्या भाषेत सांगायचे तर ह्याच्यामध्ये आपल्याला किती काटकसर करता येईल. आरोग्य खात्याकडून तयार केलेली आकडेवारी आहे. ती आकडेवारी बांधकाम खात्याने आणि आयुक्त साहेबांनी प्रसंग पडल्यास लेखाधिकाऱ्यांकडून देखिल ह्यांचे सहकार्य घेउन ह्याच्यामध्ये काय काय रक्कमा आपल्याला मोडीत काढता येतील त्या कमी करता येतील त्या कमी करुन सदरबाबत पुढील कार्यवाही व्हावी. सदस्यांच्या लेखी सुचना आपल्याला उद्या, परवा दोन दिवसात प्राप्त होतील. सन्मा. सदस्य नरेंद्र मेहता साहेबांनी जे क्रॉस डेन आहे. त्या क्रॉस डेनने किती फायदा येतो आणि सर्व सदस्यांचा ह्या सुचनांमध्ये सुचनांचा समावेश व्हावा. सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल ह्यांनी सुचना मांडली होती की, अशाप्रकारे बोर्ड लावावेत. परंतु, असे बोर्ड आपल्याला लावता येणार नाही. महापालिकेने याबाबत नागरिकांनी काय काळजी घ्यावयाची आहे किंवा त्यांच्या सुचना काय आहे. त्याबाबत एखाद्या वृत्तपत्रामध्ये किंवा केबलच्या माध्यमातून आपल्याला जाहिरातींमधून ही गोष्ट निर्दशनात आणावी किंवा पेपर जाहिरातींसाठी फार मोठा खर्च होत असेल तर आपण पाण्याच्या सुचनेसाठी जसे रिक्षामधून ॲनाउन्समेंट करत असतो. अशाप्रकारची ॲनाउन्समेंट करावी आणि पुढील कामकाजाला सुरुवात करावी. सभागृहाने ह्याच्यात योगदान करावे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. उपमहापौर साहेब, आमच्या रुलिंगचे काय? सोयिस्करपणे आयुक्तांनी ही काही सांगितले नाही आपण ही काही रुलिंग दिली नाही.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर साहेब, याठिकाणी सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील ह्यांनी मुद्दा मांडला की, बांधकाम खात्याने जे एस्टिमेट दिले ते आरोग्य विभागापेक्षा जास्त दिले आणि आता आपण परत बांधकाम विभाग सांगता म्हणजे नेमके कोण? आरोग्य खाते टेंडर काढणार की, बांधकाम विभाग टेंडर काढणार.

**मा. उपमहापौर तथा पिठासिन अधिकारी :-**

आपण परत टेंडर काढत नाही. ह्याच्यात जेवढी काटकसर करता येईल. त्याच्यामध्ये करणार आणि जे टेंडर आहेत तेच आपल्याला ठेवायला लागतील. कारण आपल्याकडे खूप उशिर झालेला आहे.

**प्रकाश दुबोले :-**

साहेब, आहेत ती म्हणजे कोणती टेंडर?

**मा. उपमहापौर तथा पिठासिन अधिकारी :-**

आत्ता सध्या जे आपल्यासमोर आलेले आहेत त्याच्यामध्ये जे.सी.बी. च्या तासीकांमध्ये जो फरक आहे, जी तफावत आहेती तफावत दूर करण्यात येईल आणि सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे ह्यांनी खुलासा मागितला होता की, स्थायी समितीची परवानगी न घेता दोन सभागृह अस्तित्वात असताना दोन्ही सभागृहांची परवानगी न घेता निविदा काढण्यात आल्या याबाबतचे पत्र त्यांनी मला दिले होते आणि मी आयुक्त महोदयांशी बोललो होतो. त्यावेळेला आयुक्त साहेबांनी सदरच्या निविदा रद्द करण्यात आल्याचे मला सांगितले होते तर याबाबत त्या कशा काढण्यात आल्या याचा खुलासा सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांना पाहिजे होता. त्यांच्यावर काय कार्यवाही करता येईल तेही आयुक्त साहेबांनी येथे निवेदन करावे.

**प्रकाश दुबोले :-**

पिठासिन अधिकारी साहेब, यामध्ये आता जे टेंडर आपल्याकडे आलेले आहे की, याप्रमाणे टेंडर काढायचे तर आरोग्य खात्याचे टेंडर काढून बांधकाम खात्याच्या चार इंजिनिअर यांना देखभालीसाठी ठेवावेत आणि ही प्रोसीजर लवकरात लवकर करुन घ्यावी असे आपण रुलिंग दिले तर जास्त फायदेशीर होईल.

**दिपक खांबित :-**

बांधकाम विभागाने जे एस्टिमेट तयार केले ते आरोग्य विभागाने जे मेजरमेन्ट दिले होते त्यानुसार डी.एस.आर. रेटने करुन दिले. बांधकाम विभागाने प्रत्यक्ष जागेवर जावून मोजमाप घेतलेले नाही. त्यांनी आम्हाला नाल्याची यादी दिली आणि मेजरमेन्ट दिले. त्याप्रमाणे एस्टीमेट करुन दिले.

**प्रकाश दुबोले :-**

आता तुमच्या हाताततले चार अधिकारी त्यांच्याकडे द्या आणि त्यांनी प्रत्यक्षात पाहणी करुन द्या. जर त्यांनी चुकीचे मेजरमेन्ट दिले असेल तर प्रत्यक्ष तुमचे चार इंजिनिअर त्यांच्या खात्यामध्ये द्या. त्यांच्याबरोबर ते इंजिनिअर व्यवस्थित काम करतील ना. खाते बदला करण्यापेक्षा त्यांच्या देखरेखीखाली द्या.

**नितीन ठाकूर :-**

पिठासीन अधिकारी साहेब, माझी अशी सुचना आहे की, आपण जे सांगितले ते टेंडर आपण कन्टीन्यु करु. ते ठिक आहे. पण माझी तुमच्याकडे अशी सुचना, विनंती आहे की, झोन वाईस, प्रत्येक वॉर्ड वाईस जो काही गाळ निघणार आहे त्याचे तुम्ही मोजमाप ठेवा. आपल्याला ही आयडीया आली पाहिजे की, कुठल्या नाल्यामधून किती गाळ निघतो कुठल्या नाल्यामधून आपण जे पेमेन्ट देत आहोत ते कळले पाहिजे ना. आपण रेकॉर्ड ठेवा.

**शरद पाटील :-**

पिठासीन अधिकारी साहेब, मी सांगितलेली सुचना आपण लक्षात ठेवा. प्रभागनिहाय जिथे जे.सी.बी. लागत नाही तिथे त्याचा खर्च नाही झाला पाहिजे. प्रभाग क्र. ७, २२, २३ आणि २४ मध्ये कुठेही जे.सी.बी. लागत नाही. सगळी झाकलेली गटार आहेत. जिथे जे.सी.बी. लागलेच नाही पाहिजे व त्याचे पेमेन्ट निघायला नको. हे सर्व लक्षात घेवून जे.सी.बी. चा खर्च काढा. डम्पर मंजुर आहेत. डम्पर आणि मजुरांनी तिथे रोज साफसफाई होते.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे ह्यांनी जो प्रश्न विचारलेला होता की, स्थायी समितीच्या नाले सफाईची जी टेंडर प्रक्रिया होती त्याचे टेंडर वर्तमानपत्रामध्ये पब्लीश झालेले होते आणि त्या संदर्भामध्ये मी संबंधित अधिकाऱ्यांशी बोललो तर संबंधित अधिकाऱ्यांनी मला असे सांगितले की, स्थायी समितीमध्ये अशाप्रकारची चर्चा झालेली होती आणि त्याप्रमाणे आपण निविदा सुचना प्रसिध्द केलेल्या होत्या. परंतु, तसे करणे अयोग्य होते. महापालिकेला जे अधिकार आहेत किंवा महापालिकेच्या समक्ष अशाप्रकारचे प्रशासकीय आणि वित्तीय मंजुरी देण्यासाठी प्रस्ताव सादर करणे आवश्यक होते. आणि त्याप्रमाणे तो प्रस्ताव मा. महासभेमध्येच यायला पाहिजे होता. सन्मा. स्थायी समितीच्या सदस्यांनी आग्रह धरला असेल की, ह्या प्रकारच्या निविदा सुचना लवकरात लवकर प्रसिध्द करव्यात जेणेकरुन जास्तीत जास्त वेळ मिळाला तर आपल्याला काम अधिक चांगल्या पध्दतीने करता येईल. परंतु, संबंधित अधिकाऱ्यांनी मात्र मा. महासभेची मंजुरी घेतल्याशिवाय अशाप्रकारची निविदा सुचना प्रसिध्द करणे अयोग्य होते. त्याबाबतीमध्ये मी त्यांना लेखी स्वरुपामध्ये त्यांना विचारणा करेन. परंतु, त्यांच्याकडून मी जी काही माहिती घेतलेली आहे ती माहिती म्हणजे, महापालिकेचा विचार करुनच त्यांनी त्याप्रकारे निविदा सुचना प्रसिध्द केलेल्या होत्या. तरी या बाबतीमध्ये पुन्हा त्यांना आदेश देतो की, अशाप्रकारच्या ज्या ज्या मंजुऱ्या मा. महासभेच्या अखत्यारीत असतील किंवा सगळ्यांच मंजूऱ्या मा. महासभेच्या अखत्यारित असतील. मा. महासभेचे जे स्थायी समितीला अधिकार प्राप्त करुन दिलेले आहेत. त्या अधिकारामध्ये जर प्रशासकीय आणि वित्तीय मंजुरचे प्रस्ताव असतील तर ते स्थायी समोर सादर करावेत आणि त्याच्यावरचे सगळे जे प्रस्ताव असतील त्यांना मा. महासभेची मंजुरी झाल्याशिवाय अशाप्रकारची कार्यवाही करणे बरोबर होणार नाही की पुन्हा त्यांना समज देणे.

**मिलन म्हात्रे :-**

समज देणे हा भाग वेगळा आहे. पण आपण त्याच्यावर कायदेशीर कारवाई काय केली? त्याचे बोला. त्यांच्यावर चौकशीची नोटीस काढली का? चौकशी बसवली का? त्यांना इन्क्वायरी करण्याकरिता नोटीस दिली, कारणे दाखवा नोटीस दिली असे काय दिले आहे का? ते द्या. आपण समज दयायची नाही.

**मा. आयुक्त :-**

मी त्यांना लेखी स्वरुपामध्ये विचारणा करणार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

१ करोड एवढी रक्कम समज देण्यासारखी नाही. साहेब, जर मी एक रुपया टम्क्सचा भरला नाही तर माझे नगरसेवक पद रद्द होते. हा महापालिकेचा कायदा आहे आणि एक करोड रुपयाचे टेंडर आपले अधिकारी तुम्हाला न विचारता तुम्ही फोनवरुन मला बोललात की, मला ह्याची कल्पना नाही. मा. महापौर सो. आम्हाला कल्पना नाही आणि मा. उपमहापौरांना भेटलो आणि त्यांना विचारले की, मला काही माहित नाही. ह्याच्यावर आपण बी.पी.एम.सी. ॲक्टच्यानुसार त्या कायद्यामध्ये असलेल्या संपूर्ण जेवढ्या तरतुदी आहेत त्या ५६ नुसार आपण त्यांच्यावर नोटीस काढली पाहिजे असे आयुक्तांचे कर्तव्य आहे. हे आपण केले का? नसेल तर ते करा. आम्हाला त्याची रुलिंग पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

संबंधित अधिकाऱ्यांना शोकॉज नोटीस काढण्यात येईल आणि त्यांचा खुलासा प्राप्त झाल्यानंतर त्याच्यावर कार्यवाही करण्यांत येईल.

**मिलन म्हात्रे :-**

५६ नुसार कार्यवाही करण्यांत यावी.

**मा. उपमहापौर तथा पिठासिन अधिकारी :-**

सन्मा. आयुक्त महोदयांनी या विषयामध्ये संबंधित अधिकाऱ्यांना नोटीस काढावी आणि प्रकरण क्र.२ महानगरपालिका क्षेत्रातील कच्चे पक्के नाले सफाई कामाच्या प्रस्तावास सभागृहाने सर्वानुमते मंजुरी दिलेली आहे. त्याच्यामध्ये अनावश्यक ठिकाणी जे.सी.बी. चा उल्लेख आहे तो काढून घ्यावा. जे.सी.बी. च्या तासिका

निश्चित कराव्यात आणि बांधकाम खात्याच्या माध्यमातून ह्याच्यावर कंट्रोल करुन त्या रक्कमा कमी करण्यात याव्यात आणि हा ठराव सर्वानुमते मंजुर आहे. सचिव पुढील विषयाला सुरुवात करावी.

**प्रकरण क्र. ०२ :-**

मनपा क्षेत्रातील कच्चे / पक्के नाले सफाई कामाचे प्रस्तावास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणे.

**ठराव क्र. ०२ :-**

महापालिका क्षेत्रातील कच्चे पक्के नाले सफाई / खोदाईची कामे समाधानकारक होण्याच्या दृष्टीने आरोग्य विभागामार्फत शहराची आठ गटात विभागणी करुन प्रत्येक गटाकरीता भाड्याने जे.सी.बी., पोकलन, बोटीसह पोकलन आदी मशिनरी पुरवठा करणे कामाच्या निविदा मागविण्यास मान्यता देत आहे. त्याचप्रमाणे वॉर्ड साफसफाई कामी कार्यरत निविदाकाराकडून गोषवाऱ्यात नमुद केल्या प्रमाणे नालेसफाई कामी मंजुर दरात मजुर व डम्पर घेण्यात यावे. तसेच पावसाळ्या दरम्यान गटारातील, उंच सखल भागातील पाण्याचा निचरा जलदगतीने होण्याच्या दृष्टीने ठिकठिकाणी इमारती, सोसायट्या, संकुलने आदींच्या प्रवेशद्वारी तसेच काही ठिकाणी रोड क्रॉसींग करीता आर.सी.सी. पाईप खरेदी करणे आदी कामी आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सन २००७-०८ या आर्थिक वर्षात नालेसफाई कामासाठी केलेली तरतुद अपूरी पडल्यास घनकचरा व्यवस्थापन (प्रक्रिया व विल्हेवाट) या लेखाशिर्षातुन करण्यास मान्यता देत आहे. सदरची कामे तातडीने करावयाची असल्याने इतिवृत्तांच्या मंजुरीची वाट न पाहता तात्काल अंमलबजावणी करावी.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्रीम. रीटा शाह.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ३ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. ३ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**प्रेमनाथ पाटील :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. उपमहापौर तथा पिठासिन अधिकारी :-**

ठराव सर्वानुमते मंजुर. ह्याच्यानंतर आपले जे उर्वरीत विषय आहेत ते आपल्याला तहकुब करायचे आहेत आणि पाण्यासाठी जी खास सभा आहे. परंतु खास सभा सुरु करण्यासाठी आपल्याला....

**प्रफुल्ल पाटील :-**

पिठासीन अधिकारी, आपल्याला माझी विनंती आहे की, अजून एक तास आहे. आपले ७.०० वा. कामकाज संपते. बरेचसे विषय आता पुढे येणारे आहेत तेव्हा ह्या सभागृहापुढे जेवढे विषय बाकी आहेत ते घेण्यात यावे त्याच्यात जास्त चर्चा करण्यासारखे नाही.

**मा. उपमहापौर तथा पिठासिन अधिकारी :-**

सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेब, या सर्व सदस्यांच्या फार मोठ्या भावनांना आवर घालून सर्व सदस्यांनी कमीत कमी चर्चा केलेली आहे. आपल्याकडे वेळेचा अभाव नाही. तर आपण वेळेची काटकसर करून सर्व सदस्यांना कमीत कमी बोलायला सांगीतले आणि महत्वाचे दोन विषय पुढे घेतले आणि पुढील विषयाला हफ्त्याभराने पुन्हा दुसरी विशेष सभा लावून त्या सभेत घेण्यात येतील. आता पाण्याची खास सभा आपण सुरू करावी आणि हे सर्व विषय आपल्याला तहकूब करायचे आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

मा. उपमहापौर साहेब, हॉस्पीटलच्या पेमेन्टचे तुम्हाला लिमिटेशन आहेत. हे आयुक्त साहेबांना चांगले माहित आहे आणि आपण ऑलरेडी दोन महिने लेट केले आहे.

**मा. उपमहापौर तथा पिठासिन अधिकारी :-**

त्यांना आपण तसा अधिकार दिलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

कसले?

**मा. उपमहापौर तथा पिठासिन अधिकारी :-**

आपल्या अनुपस्थितीमध्ये ठराव मंजुर झाला.

**मिलन म्हात्रे :-**

ठिक आहे.

**प्रकरण क्र. ०३ :-**

भाईंदर (प.) टेंभा व उत्तन येथील प्राथमिक आरोग्य केंद्र इमारती व जागा मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार महानगरपालिकेकडे हस्तांतर करणे करिता जिल्हापरिषद ठाणे यांना इमारती व जागेची किंमत अदा करणे व भाईंदर (प.) टेंभा येथे अद्ययावत इमारत बांधणे कामी खर्चास प्रशासकिय / आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. ०३ :-**

प्रशासनाने सदर प्रकरणाबाबत सविस्तर गोषवारा दिलेला आहे. त्यानुसार भाईंदर (प.) टेंभा प्राथमिक आरोग्य केंद्र इमारत व जागा जिल्हा परिषद ठाणे यांजकडून हस्तांतर करुन घेण्याकरीता नियमानुसार जागेची व इमारतीची किंमत जिल्हा परिषद ठाणे यांच्या सोबत आयुक्त यांनी बैठक घेउन अंतिम होणारी रक्कम सुलभ हप्त्यात प्रदान करण्याचे अधिकार आयुक्त यांना देण्यांत येत आहेत. तसेच भाईंदर (प.) टेंभा हॉस्पीटल इमारत स्टाफ क्वार्टर बांधणे कामी महानगरपालिकेचे तांत्रिक सल्लगार मे. आर्कीझम यांनी तयसार केलेल्या रु. ८,९१,५१,९८४/- रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. सदर हॉस्पीटल इमारत कशाप्रकारे बांधून घ्यावी याबाबत आयुक्त यांनी त्यांच्या स्तरावर महानगरपालिकेच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक ते निर्णय घेवून कार्यवाही करावी.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यांत आला**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रफुल्ल पाटील :-**

एस.ई.झेड. च्या प्रकरणामध्ये आपल्याला फार घाई करावी लागणार आहे. कारण त्यांनी जो कालावधी दिलेला आहे तो कालावधी ऑलरेडी संपुष्ठात आलेला आहे. आणि मा. महासभेमध्ये पुढे तो विषय आला नाही. तो विषय यायला पुन्हा एक महिना लागेल आणि एक महिन्यानंतर जेव्हा मिटींग लागेल तेव्हा हा सगळा कालावधी संपलेला असेल. नगरपालिकेच्या वतीने काही ऑब्जेक्शन घ्यायचे असतील तर सभागृहात त्याच्यावर चर्चा होउन ठराव व्हायला पाहिजे आणि एक महिन्यांनी मिटींग लावून आपण जर असा ठराव करणार असाल तर त्या ठरावाला काय अर्थ राहणार नाही आणि एस.ई.झेड. ह्या विषयाला अतिशय गांर्भियाने घेतले पाहिजे. कारण इथल्या परिसरातील जनतेची तशी मागणी आहे. आपण जर त्यांच्या मागणीनुसार वागलो नाही तर आपण लोकांसाठी काही केले नाही असा त्याचा अर्थ होतो. खर म्हणजे हा विषय दोन महिन्यांपुर्वीच यायला पाहिजे होता. मगाशी सन्मा. सदस्य रोहिदास पाटील (काकानी) सुद्धा तुम्हाला सांगितले आता तुमच्याकडे फार विषय राहिलेले नाही. आणि फार महत्वाचे विषयही नाहीत. एकदम त्रोटक विषय आहेत. तेव्हा हे सगळे विषय आपण घ्या आणि ही मा. महासभा संपवा. अजेन्ड्यावरील विषय बाकी ठेवू नका अशी मी तुम्हाला विनंती करतो.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. पिठासिन अधिकारी साहेब, आजच्या या मा. महासभेमध्ये जे उर्वरीत विषय आहेत ते विषय आणि सभा सुरू होण्याआधी सन्मा. सदस्य रोहिदास पाटील ह्यांनी सन्मा. पिठासिन अधिकाऱ्यांना पत्र सुद्धा दिले होते की, ह्या महासभेवर एस.ई.झेड. बाबतच्या विषयाची प्रशासनाकडून रितसर माहिती मिळवून तो विषय विषयपत्रिकेवर घ्यावा. परंतु, हा विषय सुद्धा आलेला नाही. उर्वरित विषय आणि एस.ई . झेड चा विषय असे विषय एकत्रित करून पुढील महासभा जेवढ्या लवकरात लवकर घेता येईल ती महासभा आपण आयोजित करावी आणि एस.इ.झेड चा विषय त्याच्यामध्ये समाविष्ट करावा व उरलेल्या कालावधीसाठी पाण्यासाठी ३५ एम.एल.डी चा जो विषय आहे त्या विषयावर कृपया महासभेचे कामकाज सुरु करावे अशी मी आपणांस विनंती करतो.

**प्रफुल्ल पाटील :-**

सभागृहाच्या सभेचे काही नियम असतात. सभागृह नेते ते तुम्हांला माहित असायला पाहिजे आपण जेव्हा काही विषय बाकी ठेवतो आणि त्या विषयासाठी आपण जेव्हा मिंटीग लावतो तेव्हा त्या मिटींगमध्ये तुम्हांला नविन विषय घेता येत नाही. तहकुब सभेला तहकुब सभेचेच विषय घ्यावे लागतात. त्याला तुम्हाला नविन विषय घेता येणार नाही. याच्यामुळे एस.ई.झेड चा विषय हा तुम्हांला पुढच्या सभेमध्ये घेता येणार नाही.

**शिवप्रकाश भुदेका :-**

सभागृह नेते आपण उत्तन मे रहते हो और उत्तन, राई, मुर्धा, मोर्वा मे इतनी दहशत है और आप उस विषय को गंभिरपणा से नही ले रहे हो।

**मा. उपमहापौर तथा पिठासीन अधिकारी :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील आणि इतर सदस्यांनी एक सुचना केली होती. सभेला बराच उशीर झाला होता आणि म्हणुन आपण महत्वाचे दोन विषय प्राधान्यक्रमाने घेतले आणि त्या विषयांवर चर्चा झालेली आहे. पुढील तहकुब सभेचे जे विषय आहेत ते पुढील सभेमध्ये घेवुन ही सभा संपली असे घोषित करित आहे.

**जोजफ घोन्सालविस :-**

सचिव साहेब, आजच्या विषयपटलावर एस.ई.झेड चा विषय नाही तर पुढचा तहकुब सभेत घेता येईल का?

**नगरसचिव :-**

तो विषय तहकुब सभेत घेता येणार नाही.

**जोजफ घोन्सालविस :-**

मग, हा विषय कधी घेणार? आमचे सगळं संपल्यावर.

**नगरसचिव :-**

आपल्याला विशेष सभा लावता येईल.

**जोजफ घोन्सालविस :-**

पण कधी?

**नगरसचिव :-**

गोषवारा दिल्यानंतर सभा लावता येईल.

**जोजफ घोन्सालविस :-**

साहेब, त्याला एक महिना जाईल.

**मा. उपमहापौर तथा पिठासीन अधिकारी :-**

सन्मा. सदस्य आपल्याला महिन्यातुन कितीही सभा लावता येतील. सदस्यांनी एस.ई.झेड साठी मागणी केली तर आपण विशेष सभा लावु. परंतु, तहकुब सभेमध्ये नियमानुसार तो विषय घेता येणार नाही.

**रोहिदास पाटील :-**

आजच्या सारखी सकाळी तहकूब सभा लावा व दुपारी विशेष सभा लावा तसे चालेल.

**मा. उपमहापौर तथा पिठासीन अधिकारी :-**

ठिक आहे.

**सभा तहकुब झाल्याची वेळ :- सायं :- ५.१० वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**